.

Rakshit Madan Bagde

▶ To cite this version:

Rakshit Madan Bagde. . . 2019. hprints-03336682

HAL Id: hprints-03336682

https://hal-hprints.archives-ouvertes.fr/hprints-03336682v1

Submitted on 7 Sep 2021

**HAL** is a multi-disciplinary open access archive for the deposit and dissemination of scientific research documents, whether they are published or not. The documents may come from teaching and research institutions in France or abroad, or from public or private research centers.

L'archive ouverte pluridisciplinaire **HAL**, est destinée au dépôt et à la diffusion de documents scientifiques de niveau recherche, publiés ou non, émanant des établissements d'enseignement et de recherche français ou étrangers, des laboratoires publics ou privés.

# डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक चिंतनावर
# बुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव



डॉ. रक्षित मदन बागडे

# डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक चिंतनावर बुद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव

**डॉ. रक्षित मदन बागडे**

लोटस् ॲन्ड कोब्रा पब्लिशिंग हाऊस
नागपूर–17

Dr. Ambedkaranchya Arthik Chintanavar Buddha Tatatvadhnyanacha Prabhav
**डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक चिंतनावर बुद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव**

Dr. Rakshit Madan Bagde
**डॉ. रक्षित मदन बागडे**

© लेखक

**प्रकाशक**
Lotus & Cobra Publishing House
C/o. Ashwajit Patil, 425, New Khadan, Lashkaribagh, Nagpur-17
M : 9096924808 / 9405238458
e-mail : lotusandcobraph@gmail.com

प्रथम आवृत्ती – 2019
ISBN – 978-93-87250-25-3

---

Author is responsible for contents and corrections.

---

***DTP & Layout***
Kalatmak Printing & Binding Bureau
425, New Khadan, Lashkaribagh, Nagpur-17
M : 9373178748, e-mail : p28ashwa@gmail.com

***Cover Design***
Nirmal Computers, Indroa, Nagpur-14

***Printed at :***
Kalatmak Printing & Binding Bureau
425, New Khadan, Lashkaribagh, Nagpur-17
M : 9373178748, e-mail : p28ashwa@gmail.com

# समर्पण

माझ्या उच्चशिक्षणाचे मार्गदर्शक



स्व. डॉ. एस. पी. कुलकर्णी सर यांना.

# ऋणनिर्देश

**"डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक चिंतनावर बुद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव"** या पुस्तकाची प्रथम आवृत्ती सुज्ञ वाचकांच्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे. कोणतेही कार्य असो, एकटा व्यक्ती ते कार्य चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकत नाही. तर कार्य उत्तम होण्यासाठी अनेकांचे सहकार्य, मार्गदर्शन, सदिच्छा, प्रेरणा आणि आर्शिवाद आवश्यक असतो. त्यानुसार माझ्या लेखनाच्या कार्यास अनेकांची मदत आणि सहकार्य लाभल्यामुळे मी हे कार्य वेळेवर पूर्ण करू शकलो. आणि त्यामुळेच अशा सर्व आदरणीय मान्यवरांचे आभार आणि ऋणनिर्देश व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य मानतो.

पुस्तक निर्मितीचे मुळ प्रेरणास्थान स्व. डॉ. एस.पी. कुलकर्णी यांचा सदैव ऋणी राहिल. सदर विषयाची मांडणी करण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. सत्यप्रिय ह. इंदुरवाडे, सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, रा. तु. म. नागपूर, विद्यापीठ, नागपूर. यांनी मला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन आणि मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत लेखन कार्य पूर्ण करण्यासाठी अनेक मान्यवर विचारवंतांनी केलेल्या अभ्यासाचा मुक्तपणे उपयोग करण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे, प्रा. डॉ. विजय बन्सोड तसेच प्रा. डॉ. स्नेहा देशपांडे अर्थशास्त्र विभाग प्रमुख, रा. तु. म. नागपूर, विद्यापीठ, नागपूर. तसेच अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांनी सुद्धा अभ्यास पूर्ण करण्याकरीता मदत केली, मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

प्रस्तुत लेखन पूर्ण करण्याकरीता माझे आई-वडील आणि माझी अर्धांगिणी सौ. समता यांच्या प्रेरनेतुन हे लेखन पूर्ण करू शकलो. तसेच माझे मित्र प्रा. राहूल मेश्राम यांनी लेखानाकरीता मदत केली त्यामूळे मी त्यांचा आभारी आहे. प्रकाशकांचेही आभार व्यक्त करतो. अभ्यास परीपूर्ण आहे असा माझा मुळीच दावा नाही. भविष्यात कुणीतरी हा अभ्यास पुढे नेतील हिच अपेक्षा.

ठिकाण : नागपूर प्रा. डॉ. रक्षित मदन बागडे

# अनुक्रमणिका


**ऋणनिर्देष**

**प्रस्तावना**

**बुद्धाचे अर्थोपार्जन विषयक विचार**

**डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार**

**बुद्ध आणि डॉ. आंबेडकर : वर्तमान समस्या**

**संदर्भ ग्रंथसूची**

# डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक चिंतनावर बुद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव

# प्रस्तावना

आज मानवी सभ्यतेचा जो विकास झालेला दिसून येतो त्याचा पाया 'अर्थ' हा आहे. मानव जातोच्या आर्थिक इतिहासावर दृष्टी टाकल्यास मानव समाजाला विविध अशा अवस्थातून जावे लागले. त्या म्हणजे, शिकारी अवस्था, पशुपालन अवस्था, कृषी अवस्था आणि औद्योगिक अवस्था होय[1].

दोन पायावर उभे होणारा (इरेक्ट्स) मनुष्य वन्य अवस्थेत अनेक अर्थाने पशू सारखाच होता. शक्तिशाली पशू ज्याप्रमाणे लहान प्राण्यांची शिकार करतो त्याचप्रमाणे वन्य अवस्थेत मनुष्यसुद्धा शिकारीवरच जगत होता. मोठ्या पशूंची एकट्याने शिकार करणे शक्य नव्हते म्हणून समुहात राहून शिकार करायला लागला. मांसाहाराला मानवी अन्नात स्थान मिळाल्यामुळे मनुष्य प्राण्यांच्या कळपामागे शिकारीसाठी भटकू लागला.[2] ही अवस्था हिमयुगातील अवस्थेपेक्षा सुधारित होती. शिकारीचे स्वरूप केवळ प्राण्यांच्या 'पाठलागा'चे राहिले नाही तर त्याचे रूपांतर एका प्रदेशाकडून दुसऱ्या प्रदेशाकडे 'भ्रमण' असे झाले.

मनुष्यात जेव्हा बुद्धीचा विकास होवू लागला तेव्हा त्याने मांस मिळविण्याचा नवोन मार्ग शोधून काढला. वन्य पशूंच्या लहान पिल्लांना पकडून त्यांना पाळायला सुरुवात केली. ही अवस्था म्हणजे 'पशुपालना'ची अवस्था होय. प्रजननाद्वारे पशूंच्या संख्येत वाढ होत राहिली आणि शिकार न मिळाल्यास पाळलेल्या पशूंचे मांस तो खात असे, दुधाचाही अन्न म्हणून वापर करीत असे. ह्या काळात पशूंच्या चाऱ्याकरिता एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत स्थानांतरण होत असे. ह्या काळात बीज गाडल्याने त्यापासून अन्नप्राप्त होत याचा शोध त्याने लावला. आणि त्यानंतर त्याने एका ठिकाणी काही काळ थांबून व झाडे कापून जमिनीत बीज परायला सुरुवात केली.
हा काळ सुमारे बारा हजार वर्षापूर्वीचा आहे. याच काळात मनुष्य छोट्या छोट्या झोपड्या बनवून राहू लागला. याच

काळात तांबे आणि कासे या धातूंचा शोध लागला. पशुपालनाच्या शेवटच्या काळात मनुष्याने ‘नांगर’ शोधून काढला. वन्य वनस्पतीतून जी वनस्पतो आणि बीज खाण्यायोग्य होती त्याचे बीज पेरून शेती करायला सुरुवात केली.[3] शेतीचा शोध ही मानवी जोवनात केवळ शेती उत्पादनातील क्रांती नव्हती तर जैविक क्रांतीही होती.

शेतीने मानवी टोळ्यांना स्थिर केले. शेती करण्याकरिता ज्या लोखंडी आणि लाकडी उपकरणाचा उपयोग होत असे ती निर्माण करण्याचा स्वतंत्र व्यवसाय निर्माण झाला. अशाप्रकारे विविध लहान व्यवसायाला सुरुवात झाली. मानवी सभ्यतेच्या विकासात ‘कृषी अवस्थे’चे संयोग महत्त्वपूर्ण असे आहे.

व्यापाराची सुरुवात याच काळात झाली. एका व्यक्तोद्वारे विविध ठिकाणी वस्तू विकणे तेव्हाही सुविधाजनक नव्हते. त्यातूनच व्यापारी वर्गाचा उदय झाला, त्यास ‘वणिक’ असे म्हणत. हा वणिक उत्पादकाकडून वस्तू विकत घेऊन उपभोक्त्याला नफा जोडून विकत असे. मुद्रा चलनात येवून वणिक लोकांनी धनसंचय करण्यास सुरुवात केली. अधिक मात्रेत वस्तू विकत घेऊन जल आणि थल मार्गाने दूर–दूर पर्यंत व्यापार होऊ लागला. वणिक लोक अधिक धनसंचय करुन ‘श्रेष्ठी’ बनले जे लोकांना व्याजाने कर्ज देऊ लागले.[4]

कृषीयुगोन सभ्यता जस–जशो वाढत गेली तस–तसा मानवी चेतनेचा विकास होत गेला. आता मनुष्य साहित्य, कला आणि विज्ञानाच्या क्षेत्रात तीव्र गतीने समोर आला. भांडवलाचा संचय आणि सामाजिक प्रभावाच्या परिणाम स्वरूप औद्योगिकरणाचा प्रारंभ झाला. सामाजिक जीवनात उच्च–निचता निर्माण होऊन भांडवलवादाला सुरुवात झाली.

सामाजिक आणि राजकीय अंगापेक्षा आर्थिक अंग महत्त्वाचे असते. मनुष्याचे यश त्याच्याशी निगडित असलेल्या आर्थिक बाबींची तुलना करून ठरविले जाण्याची परंपरा भारतात आदिकालापासूनच आहे. आपल्या कौटुंबिक आणि सामाजिक वलयात आर्थिक निकषांच्या आधारे माणसाची प्रतिष्ठा ठरविली जाते. ह्या प्रतिष्ठेसाठी मनुष्य अनेकदा वाममार्गाचा वापर

करतो. बुद्धाच्या काळातही हीच परिस्थिती असावी म्हणून 'आष्टांगीक मार्गा'त बुद्धाने 'सम्यक आजिवीके'चा विचार केला असावा.

बुद्धाचा काळ म्हणजे इ.स.पूर्व सहावे शतक होय. भारतीय इतिहासाच्या दृष्टोने ते 'सम्यक क्रांती'चे युग होते. गौतम बुद्धाच्या मानवतावादो विचारसरणीने तत्कालीन समाजात मूलभूत परिवर्तन घडून आले. बुद्धाच्या धम्मात व्यवहारोपयोगी आणि समाजोपयोगी तत्त्वज्ञान दिसून येते. 'बहुजन हिताय– बहुजन सुखाय' असा लोकल्याणकारी संदेश देणारे बुद्ध लोकशाहीचे प्रथम प्रणेते होत.

आर्य भारतात येण्यापूर्वी जी सिंधू संस्कृती भारत भूमीत अस्तित्वात होती ती सुमेरियन संस्कृतीच्या वळणाची होती. राजेशाही आणि नोकरशाही हा तिचा आधार होता. इ.स.पूर्व १५०० च्या आसपास भारतातून सिंधू संस्कृतीचा विनाश झाला.[5]

बुद्धपूर्वकालीन आर्थिक जीवन मुख्यतः कृषीवर अवलंबून होते. वैदिक संस्कृतीत सुद्धा शेतीला महत्त्वाचा व्यवसाय म्हणून मान्यता होती. आर्य भारतात आले तेव्हा ते पशुपालन अवस्थेत होते. प्रदोर्घ संघर्षानंतर जेव्हा ते भारतात स्थिर झाले[6] तेव्हा त्यांनी शेती आणि पशुपालनावर आधारित असलेल्या अर्थव्यवस्थेला जन्म दिला.

बुद्धपूर्वकालीन आर्थिक व्यवस्थेत गाय ही त्यांची संपत्ती आणि विनीमयाचे साधन होते. गाईच्या कातडीच्या पखाली आणि दही, मद्य ठेवण्यासाठी 'पिसका' तयार करीत असत. एकमेकांच्या गाई परस्परांपासून भिन्न राहण्याकरिता गाईच्या कानाला निरनिराळ्या संख्येने काप पाडले जात असत. याबद्दल 'अष्टकर्णी' म्हणून ऋग्वेदात उल्लेख दिसून येतो.[7]

बुद्धपूर्वकालीन आर्थिक जीवनात व्यापार दखील दृष्टोस पडतो. गांधारची लोकर चारही दिशेला प्रसिद्ध होती. वस्त्र, चादर आणि चामडे विकत घेण्याचे उल्लेख आढळून येतात. त्याचप्रमाण व्यापारात शर्त लावण्याचेही निदर्शनास येते. बुद्धपूर्वकालीन अर्थव्यवस्था ही यज्ञ संस्थेशी निगडित होती. पुरोहिताला ज्या दक्षिणा दिल्या जात त्या सर्व व्यवहारोपयोगी

असल्या पाहिजे असा दंडक होता. ह्या वस्तूंमध्ये धान्य, गाय, बैल, बोकड, अश्व, शेळी, गाढवे, पिकांसह जमीन, नांगर, घर, गाव, सोन्याची माळ, हरणाचे कातडे, वस्त्र, दास, सुगंधीत द्रव्ये इ.चा समावेश होता.

बुद्धपूर्वकालीन भारतीय समाज हा श्रमविभागणीच्या सामान्य तत्त्वाप्रमाणे वर्गीय बनला होता. एखाद्या समाजात श्रमविभागणी का आणि कशी निर्माण होते? तिचे वस्तुविनीमयात काय स्थान असत हे अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून नोट समजून घेतले तर प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेच्या वर्गीय स्वरूपाची अधिक चांगल्या प्रकारे ओळख होऊ शकते.

ह्यावरून असे लक्षात येते की, बुद्धपूर्वकाळात भारतीय समाज हा आर्थिकदृष्ट्या शेती, पशुपालन, व्यापारधंदे आणि कला इ. उद्योगांवर अवलंबून होता. परंतु समाजाचा केंद्रबिंदू 'अर्थ' नसून 'धर्म' होता.

## बुद्धकालीन आर्थिक व्यवस्था

बुद्धाचा जन्म इ.स.पूर्व ५६३ ला झाला. बुद्धकाळात लोकसंख्या मुख्यतः नगरात वसलेली होती. बुद्धकालीन भारतात लहान मोठ्या नगरांची संख्या (पालो–परंपरेनुसार) ८४,००० सांगितली जाते.[8] बुद्धकालीन भारताची लोकसंख्या ३० करोड होती. 'अभिधानप्पदीपिका' नुसार बुद्धकाळात भारतात वोस मोठी शहरे होती.[9]

बुद्धकाळात लहान लहान गावेही होती. 'जातक कथां'नुसार गावात पाचशे ते एक हजार कुटुंबे राहत होती. सर्वात लहान गावास 'गामक' तर थोड्या मोठ्या गावाला 'गाव' म्हणत. 'द्वार गाव' त्या गावास म्हणत जे नगरांच्या मार्गावर वसलेली होती. 'पच्चन्तगाम' दोन देशांच्या सिमेवरील गावास म्हणत असत. गावाचे जोवन युद्धकाळात अस्ताव्यस्त होत त्यांतील लोकसंख्या विखुरलेली होती.[10] 'अगुत्तरनिकायातील' एका सुत्ताप्रमाणे पुष्कळशी जमीन जंगलाने व्यापलेली होती.

आजच्या प्रमाणेच बुद्धाच्या काळात भारतीय समाजाचा मुख्य व्यवसाय शेती होता. राजाचे कर्तव्य होते की जे लोक

शेती करतात त्यांना बोज उपलब्ध करून द्यावे. कृषी कार्यात जातिविशेष नव्हता. बुद्धकाळात जमीन लहान–लहान भागात विभागलेली होती ज्यावर विविध लोक शेती करत असत. शेती सामुहिक स्वरूपात केली. जायची त्यास ‘गाम खेत्त’ म्हणत. यासबंधी विशेष कर्तव्य आणि अधिकार ‘गामभोजका’ला असायचे. आपल्या स्वामीत्वातोल शेती विकण्याचे अधिकार मर्यादित होते.[11]

बुद्धकाळात बैलांच्या सहाय्याने शेती केली जायची. शेतीच्या पेरणीचा उत्सव होत असे. बैलांना विविध प्रकारे सजवून पहिला नांगर राजाद्वारे चालविला जायचा. पेरणीचा उत्सव म्हणजे नगराला मेजवाणी असे. बुद्धकालीन भारतीय शेतकरी सुखी आणि समृद्ध होता.[12]

बुद्धकाळात भारतीय शेतकरी कोणकोणते पिक घ्यायचे यासबंधीचे वर्णन पालि–त्रिपीटकात दिसून येते. मगध आणि पूर्वी उत्तर प्रदेश यांचे वर्णन दिसून येतात. मुख्यतः पिकात धान पेरले जायचे. धानाच्या प्रकारात सालो, वीहो मोठ्या प्रमाणात पेरले जायचे. ‘शालि–मांस–ओदन’ स्वादिष्ट आणि मोठ्या लोकांच्या खाण्यायोग्य भोजन समजले जायचे. ‘तुण्डीलजातकात’ सांगितल्याप्रमाणे धान व्यतिरिक्त यव, बाजरा, पान, लसून, सुपारी अशी विविध पिके काढली जायची.[13] असे उल्लेख आलेले आहे.

पाटली, किंशूल, कर्णिकार, जयसूमन आणि केतकासारख्या फुलांची शेती केली जायची. विविध फुलांच्या माला तयार केल्या जायच्या तसेच फुलांच्या विक्रीचा व्यवसायही केला जायचा.[14]

शेती पूर्णतः पावसावर अवलंबून होती. बुद्धकाळात मजूर व श्रमीक यांची आर्थिक स्थिती हालाखीची होती. जातक विवरणामध्ये शेतात काम करणाऱ्या आणि शेतीची रखवाली करणाऱ्या अशा मजुरांचा उल्लेख आढळतो. शेतीची रखवाली करणाऱ्या श्रमीकास आणि अन्य व्यवसायातील श्रमीकास कामाच्या मोबदल्यात प्रतिदिवस ‘एक मासक’ एवढी मजुरी मिळत असे.

बुद्धकालीन भारतात राजसेवा एक महत्त्वपूर्ण पेशा होता. ‘कुटदन्तसुत्ता’ प्रमाणे अनेक मनुष्य त्या वेळी राजसेवा करण्यास उत्साही असत. राजा सेवकांना भत्ता आणि वेतन देऊन संतुष्ट ठेवायचा. राजसेवेतील मुख्य पद पुरोहित, अमात्य आणि सेनापती होते. शिपाई आणि सेनाध्यक्षाच्या नियुक्त्या योग्यतेनुसार केल्या जायच्या.[15] ‘वर्णा’ला महत्त्व नव्हते. अध्यापनाचा व्यवसाय आदरणीय होता. विद्यार्थी शुल्काच्या स्वरूपात शारीरिक सेवेद्वारा शुल्कातून मुक्त व्हायचे.

स्त्रियासुद्धा मजुरी करीत होत्या. ज्या दास्या होत्या त्या राजमहालात विविध कामे करायच्या. धान कुटने, पाणी भरण, मुलांचे पालन पोषण करण्याची सर्व कामे स्त्रिया करीत असत.[16]

बुद्धकाळात शेतीवर राजाद्वारे कर लावले जायचे या कराला ‘रज्जोभोग’ म्हणत. कर मुख्यतः उत्पादनाच्या एका अंशातून घेतले जायचे. या करातून राजा लोकल्याणकारी कार्य करीत असे.[17] शेतीशिवाय इतरही व्यवसाय बुद्धकाळात अस्तित्वात होते. त्यात पशुपालन, शिल्पकला आणि वस्तूंचा व्यापार इ. चा प्रामुख्याने समावेश होतो.

पशुपालन व्यवसायास समाजात मानाचे स्थान होते. पशूंना चारण्याकरिता ‘गोचर –भूमी’ असे. लोकांच्या खाद्यान्नात लोणी, दही, दुधाचा समावेश होता. बुद्धाने भिक्खुंना पाच गोरसांची अनुमती औषध म्हणून वापरण्यास दिली होती. बुद्धकाळात साडेबाराशे गाईचे धनी असणारे ‘मेडक’ समाजात होते.[18]

गाई चारणाऱ्यास ‘अजपाल’ आणि गवत कापणाऱ्यास ‘तृणहारक’ म्हणत. गुराख्यांचा त्यावेळी एक व्यवसाय होऊन बसला होता. अजपाल शेळ्या मेंढ्यांना चारायला नेत शिवाय लोकर गोळा करीत असत. ह्या लोकरापासून वस्त्र तयार करीत[19] एकंदरीत शेतीशिवाय पशुपालन व्यवसाय महत्त्वाचा समजला जात होता.

बुद्धकाळात गावाची अर्थव्यवस्था ही स्वनियंत्रित आणि स्वयंपूर्ण होती. ग्रामाच्या मानाने नगरे पुढारलेली आणि माणसांनी गजबजलेली होती. तृण, काष्ठ, उदक आणि धान्यांने

परिपूर्ण होती. नगरांचा आर्थिक व्याप वाढलेला होता. तेथील सामाजिक जीवन सुखी आणि समाधानी होते. ‘सामयफलसुत्ता’ तील यादीप्रमाण घोडेस्वार, सारथी, धनुधर, सैन्यातील व्यवस्थापन, शूर सैनीक, दासीपुत्र, आचारी, न्हावी, मिठाईवाले, परिट, कुंभार व गवंडी, सुतार हे सर्व व्यवसाय नगरात उपलब्ध होते.[20]

बुद्धकाळात काही श्रमीक हे दास होते. दासांना नेहमी घरची कामे तसेच शेतीची कामे करावी लागत असत. दासांचे जीवन फार दुःखमय होते. दासांचे पुत्रही दास बनत असत त्यामुळेच दासप्रथा ही वंशपरंपरागत बनली होती. युद्धबंदी आणि दंडित व्यक्तींनाही दास बनविल्या जायचे.

शिल्पकलेचा व्यवसाय वृद्धींगत होत होता. व्यापार उद्योग हा शिल्पकारीवर आधारित होता. बहुतेकांची उपजीविका ही शिल्पकलेशी निगडित होती. स्वतः सिद्धार्थ गौतम शिल्पकला जानत होते.[21] शिल्पकलेचे एकंदर २५ प्रकार त्या काळात अस्तित्वात होते. स्वतः शिल्प शिकून उदरनिर्वाह करण्याकडे समाजाची प्रवृत्ती होती.

या काळात ‘नवकर्म’ करण्याकडे लोकांचा भर होता. घर, शाळा, सभागृहे, भिक्खुविहार ह्यांचे बांधकाम म्हणजे ‘नवकर्म’. लोकांच्या कल्याणाकरिता राजे चार दिशेला चार भवन बांधीत. या सर्व नवकर्म कार्यात हजारो मजूर, कुशल आणि अकुशल कामगार काम करीत असत.[22] नवकर्माची कामे मुख्यतः व्यापारी दृष्टोने प्रगल्भ नगरे आणि राजधानीतून आढळून येते परंतु यावर काम करणारा वर्ग सुखी होता असे म्हणता येत नाही.

कनिष्ठ दर्जाच्या व्यवसायामध्ये दुतकर्म, जुगाराचे अड्डे, दारूची दुकाने, वेश्याव्यवसाय, ठकबाजी, चोरी इ. चा उल्लेख करता येईल. जुगाराच्या व दारूच्या व्यवसायावर कर लादला होता.[23] बुद्धकाळात दासप्रथेला मान्यता होती. दासाचे जीवन हे दुःखमय व हालअपेष्ठेने भरलेले होते. बुद्धकाळात व्यापारही होत असल्याचे दिसून यते. आर्थिक उन्नतीचे प्रमुख साधन म्हणून व्यापाराकडे पाहिले जात असे. आंतरदेशीय व्यापारही होत असे.

संपूर्ण व्यापार हा वणिक म्हणजे वैश्यांच्या हातात होता.[24] व्यापार हा जल आणि स्थल मार्गाने हात असे, व्यापार समुहाने केला जायचा. मुख्य व्यापाऱ्यास 'जेट्ठक' म्हणत. व्यापारासबंधीचे निर्णय घेण्याचा अधिकार जेट्ठकांना असे.

समुद्री मार्गाद्वारे होणाऱ्या विदेशी व्यापाराचा उल्लेख 'अट्ठकथां'मधून दिसून येतो. भारताचा व्यापारीक सबंध बॅबिलॉन, अरबस्थान, इरान, इराक, जावा, मालद्विप आणि चीन इ. देशांशी होत होता.[25] जलयात्रा सबंधी अधिकाऱ्यास 'जलनिय्यमक' म्हणत. भारतीय व्यापारी विदशातून सोने, रत्न, मानिक इ. वस्तूंची आयात करीत. निर्यातीच्या वस्तुमध्ये रेशीम, बहुमूल्य वस्त्र, हस्तीदंत वस्तू, सुवर्ण आभूषण, काश्यापासून बनविलेल्या थाळ्या, तलवारी, मोरासारखे पक्षी, हत्ती–घोडे इ.[26] वस्तूंचा समावेश होता.

बुद्धकाळात वस्तुविनीमय पद्धत अस्तित्वात होती. परंतु नागरी समाजात मुद्राविनीमय पद्धती वापरली जायची. सुवर्ण मुद्रा अस्तित्वात होत्या. सर्वात प्रचलित नाणे 'कर्षापण' हे होते. तसेच अर्द्धकहापण, पाठ कहापण, मासक, अर्द्धमासक, काकनिका ही नाणी ही प्रचलित होती. 'मासक' हे नाणे तांबे, लाकुड व लाख यापासून बनविले जात अस.[27]

गृहपती स्वतः वस्तूचे मूल्य निर्धारित करीत नसत. त्यांची अशी धारणा होती की, वस्तूचे मूल्य स्वतः निर्धारित करणे हे मनुष्याचा जीव घेण्यासारखे आहे. वस्तूचे मूल्य निर्धारण करण्याकरिता विशेष अधिकारी असत. बाहेरून आलेल्या व्यापाऱ्याला सुद्धा विशेष अधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या मूल्यावरच व्यापार करावा लागत असे.

एकंदरीत बुद्धकालीन आर्थिक जीवन सुखी व समाधानकारक असल्याचे दिसून येते. कर्म हे तत्कालीन अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंग होते. समाजातील उत्पन्नाची विषमता आणि दासांचे दुःख तेवढ्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. बुद्धकाळात शेती आणि व्यापार आपल्या शेवटच्या अवस्थेत प्रगती करीत असल्याचे दिसून येते.

## गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर

या जगात जनतेला भाळून टाकणारे तथागत गौतम बुद्ध, येशु खिस्त, महंमद पैगंबर आणि श्रीकष्ण असे चार धर्म संस्थापक होऊन गेले. या सर्व धर्म संस्थापकांनी धर्म स्थापनेकरिता जे मार्ग स्वोकारले त्यांचा आपण विचार करता, बुद्धाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य दिसून येते. ते महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे बुद्धाने आपला 'अहंकार' पूर्णपणे जिंकून टाकला होता[28]

गौतम बुद्ध स्वतःला देव मानत नसत, ते शेवटपर्यंत एक साधारण मानव म्हणूनच आचरण करीत आणि गौतम बुद्धाच्या धम्माचा पाया हा 'नैतिक आचरण' हाच राहिला आहे. देवाची जागा बुद्धाच्या धम्मात 'नैतिक आचरणा'ने भरून काढली आहे. बुद्धाचा धम्म समतेवर आधारित होता. बुद्धाने आपल्या भिक्खुसंघाचे द्वार स्त्रिया व शूद्रांना मुक्त करून दिले होते. धर्म व नैतिक आचरण यांची सांगड ही अभेद्य समजली जाते. धर्मामध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या त्रयींचाही समावेश आवश्यक असता. सामाजिक जीवनास आवश्यक वरील तत्त्वे फक्त 'बुद्धाच्या धम्मात' दिसून येतात.

डॉ. आंबेडकरांचा बुद्ध धम्माशी संपर्क आल्याची पहिली नोंदलेली घटना १९०८ सालची आहे. तेव्हा ते सोळा वर्षाचे होते. त्यांनी नुकतीच मुंबई विद्यापोठाची मॅट्रिकची परीक्षा पास केली होती. एका अस्पृश्य मुलाच्या दृष्टोने हे विशेष महत्त्वाचे यश होते की, महार समाजाने त्यांच्या सन्मानार्थ एक जाहीर सभा आयोजित केली. ही सभा श्री. एस. के. बेले यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. वक्त्यांमध्ये स्थानिक हायस्कूलचे शिक्षक श्री. कृष्णजी अर्जुन केळूसकर हेही होते. त्यावेळी त्यांनी नुकतेच प्रकाशित केलेले 'बुद्ध चरित्र' नावाचे पुस्तक भिमरावांना भेट दिले.[29]

सन १९०८ पासून १९१७ पर्यंत अस्पृश्यांचा हा नेता आपल्या अध्ययनात पूर्णपणे गढून गेलेला होता. शिक्षण काळात डॉ. आंबेडकर बुद्धधम्माच्या दिशेने वाटचाल करताना दिसत नसले तरीसुद्धा ते अशा प्रकारचा दृष्टिकोण, इतकेच नव्हेतर

तत्त्वज्ञान विकसित करीत होते जे काही बाबतीत, पूर्णतः बुद्धाचे तत्त्वज्ञान होते.

चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी पिण्याचा अधिकार मिळवून देत असताना सवर्ण हिंदूनी अनेक अडथळे उभे केलेत. प्रचलित सामाजिक पद्धतीचा धिक्कार म्हणून २५ डिसेंबर १९२६ च्या रात्री डॉ. आंबेडकर आणि अनुयायांनी हिंदूच्या पवित्र धर्मगंथापैकी कुप्रसिद्ध अशा 'मनुस्मृतीची' होळी केली. मनुस्मृतीचे दहन करून डॉ. आंबडकर आणि त्यांचा लाजमा महाड जवळ असलेली बुद्धकालीन लेणी पाहण्यासाठी गेलेत.[30] मनुस्मृतीचे दहन करून डॉ. आंबेडकर हिंदू धर्मापासून किती दूर गेले होते हे दर्शविते तर चवदार तळ्याच्या अन्य प्रसंगावरून ते बुद्धधम्माच्या किती जवळ पोहचले होते हे स्पष्ट होते.

डॉ. आंबेडकरांनी जेव्हा "आचार, विचार आणि उच्चार यांची शुद्धी होत नाही तोपर्यंत अस्पृश्य समाजात प्रगतीचे बोज कधीही रुजणार नाही" असे उद्‌गार काढले तेव्हा ते वस्तुतः बौद्धधम्मातील "काया, वाचा आणि मनाच्याशुद्धी" शिवाय अस्पृश्य समाजात प्रगतीचे बोज रूजणार नाही असेच म्हणत असावेत.[31] यावरून असे सूचित होते की, चवदार तळ्याच्या संघर्षाच्या अगोदरपासूनच आंबेडकरांनी केवळ बौद्ध वाङःमयाचा परिचय करून घेतला होता असे नाही, तर विशेषकरून बौद्ध तत्त्वज्ञानाच्या भाषेत विचार करायला सुरुवात केली होती.

१३ ऑक्टोबर १९३५ ला येवले येथे १०,००० प्रतिनिधी समोर डॉ. आंबेडकरांनी जाहीर करून टाकले की, "जरी मी हिंदू म्हणून जन्मास आलो तरी हिंदू म्हणून मुळीच मरणार नाही, अशी जाहीर प्रतिज्ञा करतो". जानेवारी १९३६ मध्ये महाराष्ट्र अस्पृश्ययुवक परिषद पुणे येथे त्यांनी म्हटले की, आता स्पृश्य हिंदूनी माझे मन वळविण्यासाठी प्रत्यक्ष देवळातले देव जरी आणून माझ्यापुढे उभे केले तरी मी हिंदूधर्मातून जाणारच! त्रिवार सांगतो जाणारच![32]

भारतीय संविधान सुधारणा समितीच्या अंतर्गत डॉ. आंबेडकर लंडनला गेले असता त्यांनी तेथून लिहून कळविले

की, "जरी आपण हिंदूधर्माचा त्याग करून अन्य धर्माचा स्वीकार करण्याचा ठाम निश्चय केला असला, तरी आपण मुस्लीम धर्माचा स्वीकार मुळीच करणार नाही आणि आपला कल सांप्रत बौद्धधम्माकडे आहे". यानंतर एका वर्षानंतर त्यांनी आपल्या निवासाचे नाव 'राजगृह' ठवले. राजगृह हे नाव राजा बिम्बिसार यांच्या राजधानीचे होते. तेथील उपवनात राहून बुद्धांनी उपदेश दिले होते.

१–३ सप्टेंबर १९३९ रोजी युरोपात दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला आणि त्यात भारत लवकरच ओढला गेला आणि पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी खंडित भारत देश स्वतंत्र झाला. या आठ वर्षाच्या काळात डॉ. आंबेडकर आपल्या राजकीय कारकिर्दीच्या अगदी शिखरावर पोहचले होते.

१९४० च्या फेब्रुवारीमध्ये त्यांनी मुंबईच्या एका वृत्तपत्र प्रतिनिधीला मुलाखत देतांना म्हटले की, "इतरांनी बौद्धधम्माचा त्याग केल्यानंतरही जे त्यांना चिकटून राहिले त्यांच्यावर विजेत्यांनी शिक्षा म्हणून मूळतः अस्पृश्यता लादली."[३३] डॉ. आंबेडकरांनी हाच सिद्धांत पुढे विकसित करून 'दि अनटचेबल्स्' या नावाने १९४८ साली प्रसिद्ध केला. अस्पृश्यतेच्या या गुन्ह्याचे खलनायक अर्थातच 'ब्राम्हण' होते.

१९४५ च्या नोव्हेंबर महिन्यात अहमदाबादमध्ये साबरमती नदीच्या काळावर भरलेल्या 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'च्या प्रांतीक सभेत डॉ. आंबेडकरांनी भाषण दिले त्या मंडपास 'बुद्धनगर' असे नाव दिले होते. त्यानंतरच्याच वर्षी 'पीपल एज्युकेशन सोसायटी'च्या वतीने मुंबईमध्ये नव्याने सुरू केलेल्या महाविद्यालयाचे नामकरण त्यांनी 'सिद्धार्थ महाविद्यालय' असे केले. सिद्धार्थ हे नाव अर्थातच बुद्धाचे व्यक्तिगत नाव होते.

पी. एल. नरसू यांच्या 'दि इसेन्स ऑफ बुद्धिझम' या मूलतः १९०७ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकाची १९२८ साली नवीन आवृत्ती प्रकाशित केली. १९४९ च्या नोव्हेंबरमध्ये डॉ. आंबेडकर घटनासमितीसमोर बोलतांना म्हणाले की, "भारताला लोकसभा आणि लोकशाही पद्धत माहोत नव्हती असे नाही. बुद्धाच्या भिक्खुसंघाच्या अभ्यासावरून असे दिसून येते की,

त्यांना लोकसभेची माहिती होती. नव्हे भिक्खुसंघच एक लोकसभा होती. त्यांचे बसण्याच्या व्यवस्थेचे नियम होते, प्रस्ताव मांडण्याचे, ठराव करण्याचे, गणसंख्या, पक्षप्रतोद, मतमोजणो, गुप्तमतदान पद्धती इ. सर्व गोष्टीचे नियम हाते. जरी हे नियम बुद्धाने आपल्या भिक्षुसंघाला लागू केले असले तरी त्यांनी ते तेव्हा देशात प्रचलित असलेल्या राजकीय सभागृहांच्या कार्य पद्धतीवरूनच घतले असावे"[34] म्हणजेच आधुनिक जगास माहोत असलेले लोकशाहीच्या कार्यपद्धतीचे सर्व नियम त्यांना माहोत होते.

२ मे १९५० रोजी नव्या दिल्लीतील बुद्धविहारामध्ये बुद्धजयंतीच्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांनी भाषण द्यावे यात मुळीच आश्चर्य नव्हते. त्यांचे ते भाषण, किमान वृत्तपत्रांनी "भारतातील ७ कोटी हरिजनांना बौद्धधम्म स्वोकारण्याचे आवाहन"[35] या शोर्षकाखाली प्रसिद्ध केले.

'महाबोधिसोसायटी' च्या एप्रिल–मे १९५० च्या 'महाबोधि पत्रिकेच्या' अंकात लिहिलेल्या 'भगवान बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' या अत्यंत महत्त्वाच्या लेखात जगाला घेण्यासारखा धर्म म्हणजे केवळ बुद्धाचाच धम्म आहे असे त्यांनी जाहीरपणे सांगितले. 'जर नव्या जगाला–आणि हे जग जुण्या जगापेक्षा अत्यंत वेगळे आहे याची जाणोव ठेवली पाहिजे–धर्मच घ्यायचा असेल–व जुण्या जगापेक्षा कितीतरी पटीने नव्या जगाला धर्माची गरज आहे–तर केवळ बुद्धाचाच धम्म योग्य आहे.' असेही त्यांनी जाहिरपणे सांगितले होते.

२५ मे १९५० रोजी डॉ. आंबेडकर आणि पत्नी सौ. सविता आंबेडकर कोलंबोला विमानाने पोहचले आणि त्याच दिवशी कॅंडीच्या दंतधातू विहारात भरलेल्या जागतिक बौद्ध भ्रातृसंघ परिषदेच्या उद्‌घाटन समारंभास ते उपस्थित राहिले. जमलेल्या प्रतिनिधीसमोर त्यांनी भाषण दिले की, "भारतात असे काही लोक आहेत की ज्यांना भारतात आता बौद्धधम्माचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सुरू करण्याची वेळ आता आलेली आहे असे वाटते. आणि भारतातील लोकांना बौद्धधम्माचे

संस्कार आणि विधी कसे असतात ते पाहण्याची काही सोय नसल्याने ते पाहण्यासाठी आपण आलेलो आहोत.”

‘यंग मेन बुद्धिस्ट असोसिएशन’ च्या कोलंबोत भरलेल्या परिषदेत ‘भारतातील बौद्धधम्माचा उदय आणि अस्त’ या विषयावर व्याख्यान दिले. भारतातून बौद्धधम्माचा अस्त झालेला नव्हता असे प्रतिपादन करून ते म्हणाले की, “जरी लौकिक अर्थाने बौद्धधम्माचे अस्तित्व भारतातून नष्ट झाले असले तरी एक आध्यात्मिक शक्ती म्हणून त्याचे अजूनही भारतात अस्तित्व आहे. भारतात बौद्धधम्माच्या अस्ताचे कारण म्हणजे वष्णव आणि शैव संप्रदायाच्या उदयामुळे आणि भारतावर झालेल्या मुस्लिमांच्या स्वाऱ्यामुळे भारतातील बौद्धधम्माचे अस्तित्व लोप पावले. जेव्हा अल्लाउद्दीन बिहारमध्ये पोहचला, तेव्हा त्याने पाच ते सहा हजार बौद्ध भिक्खंची कत्तल केली. बचावलेले भिक्खु शेजारच्या देशात पळून गेले”.[36] भारतात हिंदूधर्म का टिकला आणि बौद्धधम्म का टिकला नाही याचे उत्तर देतांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ‘बौद्धधम्म हा आचरणास कठीण असून हिंदूधर्म मात्र तसा नाही’.[37]

२९ जुलै रोजी ‘रॉयल एशियाटिक सोसायटी’च्या सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले की, ‘बौद्धधम्माच्या बाबतीत आपण मुळीच संधिसाधुपणा केला नाही कारण आपणास बौद्धधम्माची लहानपणापासूनच गोडी होती.’

वरळो मुंबईच्या बुद्ध विहारात बोलताना ‘राजकीय स्वातंत्र्य म्हणजे देशाच्या सर्व दुःखाचा परिहार होय. जोपर्यंत माणसाच्या जीवनात शुद्धी येत नाही, तोपर्यत गैरवर्तन आणि नीतिमत्तेबद्दलचा भयंकर अनादर दररोजच्या जीवनात चालूच राहील, आणि जोपर्यत माणसाला माणसाशी कस वागावे हे कळत नाही, तोपर्यंत भरताचा विकास कधीच होऊ शकत नाही. या सर्व त्रासातून मुक्त हाण्यासाठी भारताने बौद्धधम्माचाच स्वोकार केला पाहिजे.’ यातून डॉ. आंबेडकराची ‘प्रबुद्ध भारताची’ संकल्पना आपल्या लक्षात येते.

१९५४ च्या ऑक्टोबर महिन्यात डॉ. आंबेडकरांनी माझे व्यक्तिगत तत्त्वज्ञान या विषयावर बोलतांना जाहीर केले की,

‘माझ सामाजिक तत्त्वज्ञान तीन शब्दात गुंफले जाण्याचा संभव आहे. ते शब्द म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव होत. तथापि माझे हे तत्त्वज्ञान मी फ्रेंच राज्यक्रांती पासून उसने घेतले आहे असे समजू नये. मी ते उसने घेतलेले नाही. माझे गुरू भगवान बुद्ध यांच्या शिकवणीपासून मी ते काढले आहे.’[३८] डॉ. आंबेडकराची बुद्धधम्माचे किती सखोल अध्ययन केलेले होते ते यावरून लक्षात येते.

डिसेंबर १९५४ ला रंगूनमध्ये बौद्ध परिषद आयोजित केली होती. डॉ. आंबेडकर जातीने तिथे उपस्थित होते. परिषदेला उद्देशून त्यांनी म्हटले होते की, ‘मला हे सांगताना अत्यंत दु:ख होते की बुद्धाच्या जन्मभूमीतच त्यांच्या धम्माचा ऱ्हास झाला आहे.’ २५ तारखेला पुण्याजवळील देहूरोड येथे दलितांनी बांधलेल्या विहारात बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना केली. ही मूर्ती डॉ. आंबेडकरांना रंगूनमध्ये बौद्ध परिषदेत भेट देण्यात आली होती. जमलेल्या ४००० श्रोत्यांना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ‘बाराशे वर्षानंतर भगवान बुद्धाची मूर्ती स्थापन करण्याचा पहिला मान आपल्याला मिळाला आहे. ज्याची इतिहासात नोंद केली जाईल असा हा महान प्रसंग आहे.’[३९]

निवासाचे नाव राजगृह, कॉलेजची नावे सिद्धार्थ आणि मोलिन्द, नागसेनवन परिसर, संविधानात पालो भाषेची तरतुद, राष्ट्रध्वजावर अशाक चक्र, भारतीय मुद्रेवर ‘अशोक चक्रांकीत सिंहमूर्ती, राष्ट्रपतीच्या आसनामागे ‘धम्मचक्रप्रवर्तनाय’[40] ही अक्षरे त्यांच्या बुद्धासक्तोची प्रतीक होती. यात तिळमात्रही शंका नाहो.

२३ सप्टेंबरला एका वृत्तपत्रात निवेदन सादर करून आपण १४ ऑक्टोंबर ला नागपूर येथे बौद्धधम्माचा स्वोकार करणार आहोत असे जाहीर केले. अशाप्रकारे १४ ऑक्टोंबर १९५६ ला सकाळी आपल्या ३,८०,००० अनुयायांसोबत डॉ. आंबेडकर बुद्धमय झाले. इतिहासात पुन्हा एका नव्या क्रांतीची ती एक नवी सुरुवात होती.

संदर्भ – टीपा


1. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृष्ठ ४९
2. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ.२
3. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. ५०
4. तत्रव पृ. ५
5. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. ६
6. तत्रैव पृ. ७
7. तत्रैव पृ. ८
8. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४१३
9. तत्रैव पृ. ४१७
10. तत्रैव पृ. ४१५
11. तत्रैव पृ. ४१८
12. तत्रैव पृ. ४३३
13. तत्रैव पृ. ४२१
14. तत्रैव पृ. ४२१
15. तत्रैव पृ. ४२५
16. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १५७
17. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. १९
18. तत्रैव पृ. १३
19. तत्रैव पृ. १३
20. तत्रैव पृ. १४

21. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४३४
22. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. १९
23. डॉ. भरतसिंह उपाध्याय – बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४२३
24. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. १६
25. तत्रैव पृ. १८
26. तत्रैव पृ. १८
27. तत्रैव पृ. १८
28. सुनिल पुनवटकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर बुद्ध धम्माचा प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९. पृ. ९०
29. महास्थविर संघरक्षित अनु.धम्मचारी विमलकिर्ती– डॉ. आंबेडकर आणि बौद्धधम्म, बुद्ध एज्युकेशन सोसायटी, तायवान. पृ. ५९
30. तत्रैव पृ. ५९
31. तत्रैव पृ. ६५
32. तत्रैव पृ. ६४
33. तत्रैव पृ. ७३
34. तत्रैव पृ. ७४
35. तत्रैव पृ. ७५
36. तत्रैव पृ. ७७
37. तत्रैव पृ. ७८
38. सुनिल पुनवटकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर बुद्ध धम्माचा प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९. पृ. १०६

39. महास्थविर संघरक्षित अनु.धम्मचारी विमलकिर्ती– डॉ. आंबेडकर आणि बौद्धधम्म, बुद्ध एज्युकेशन सोसायटी, तायवान. पृ. ८२
40. संपादक, लोकराज्य– महाराष्ट्र शासन, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, ऑक्टोबर २००६. पृ. ११

1

# बुद्धाचे अर्थोपार्जन विषयक विचार

आर्थिक व्यवस्था ही सामाजिक विकासाची आधारशिला आहे. मानवी सभ्यतेच्या उत्तरोत्तर विकासाच्या मुळात त्याची आर्थिक व्यवस्थाच राहिली आहे. एखादा देश, समाज किंवा जातीची; सामाजिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक उन्नती मुख्यतः त्याच्या आर्थिक व्यवस्थेसबंधी स्त्रोत आणि सुविधांच्या प्रगतीवर आधारित असते. ज्या देशात या सुविधा नसतात तेथील मानवी समाज आपल्या सभ्यता आणि संस्कृतीचा विकास घडवून आणू शकत नाही. मानवी जीवनात अर्थाला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच आता आणि पूर्वीही अर्थ हा कधी–कधी धर्मापेक्षाही अप्रत्यक्षपणे प्रथम स्थानी गणल्या जातो. मनुष्य स्वभावाचा हा कमकुवतपणा सर्वप्रथम गौतम बुद्धाने जानला.

सर्व दु:खाचे मूळ तृष्णा होय हे सांगताना द्रव्यलालसेलाही गौतम बुद्धाने तृष्णेत अंतर्भूत केले आहे. सारनाथ येथे ज्ञान प्राप्ती नंतर पंचपरिव्राजकांना प्रथम उपदेश देताना बुद्ध म्हणतात, “मानवी जीवनाचे दोन धृव आहेत. त्यातील पहिले म्हणजे भोगविलासाचे जीवन आणि दुसरे म्हणजे काया क्लेषाचे जीवन.”[1] एक म्हणतो खाऊ–पिऊ आणि मौज करू कारण उद्या आपण सर्व मरणार आहोत दुसरा म्हणतो वासनांचा अंत करा कारण वासना पुनर्जन्माचे निमित्त आहे. बुद्धाने जीवनाचे दोन्ही मार्ग नाकारलेत कारण त्यांच्या मते दोन्ही मार्ग मनुष्य जीवनास अयोग्य आहेत. मध्यम मार्गावर त्यांचा विश्वास होता. हा मध्यम मार्ग काया क्लेषाचा नाही किंवा भोगविलासाचाही नाही.

बुद्ध म्हणतात, “हे परिव्राजकांनो हे समजून घ्या की, दोन धृवावर असलेल्या या दोन जीवनप्रणालीचे अनुकरण कदापिही करू नये. ज्यांचे आकर्षण कामयोगाची तृष्णा आहे अशा वस्तूंच्या माध्यमाने तृप्ती प्राप्त करण्याचे प्रयास हे हीन

प्रयास होत. ते अकुशल आहेत. ते हानिकारक आहेत. या दोन्ही धृवांच्या मध्ये एक जीवनमार्ग आहे, तो मध्यम मार्ग आहे. मी ह्या मध्यम मार्गाचा उपदेशक आहे. दुःखाचा विनाश हा या धम्माचा एकमेव हेतू आहे."[2] ही तथागताची प्रथम धम्मदिशा आहे.

सामाजिक दुःखाची निर्मिती ही श्रेष्ठ व कनिष्ठ या दोन टोकाच्या भावनेतून झालेली आहे. समाजात शोषक व शोषित, श्रीमंत व गरीब अशी दोन टोके आहेत. श्रेष्ठत्वाच्या त्यांच्या अहंकाराला धक्का लागताच दुःखाची निर्मिती होते. कनिष्ठतेचा ज्यांच्यावर शिक्का मारला आहे ते लोक न्यूनगंडातच अडकून असतात. म्हणून समाज सुखी व्हायचा असेल तर मध्यम मार्गी जीवन दृष्टीचे अनुसरण आवश्यक आहे. गौतम बुद्ध मध्यम मार्गी जीवन दृष्टीतून 'समतेचा' संदेश देतात,

"नेकेचि मनुस्सा सेट्ठा
न केचि मनुस्सा हिना"[3]

म्हणजेच, कुणीही मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही. बुद्धाच्या ह्या समतादृष्टीत मानवी जीवनाचे अप्रतीम सौंदर्य दडलेले आहे.

## सम्यक आजीविका

अष्टांगिक मार्गातील 'सम्यक आजीविका' मध्ये बुद्धाचा आर्थिक जीवनाविषयी विचार अंतर्भूत आहे. माणसाला आपली आजीविका अर्जित करावीच लागते, ही आजीविका अर्जित करण्याचे अनेक मार्ग आहेत. काही हीन मार्ग इतरांना आहत करतात, इतरांवर अन्याय करतात. श्रेष्ठ मार्ग इतरांना आहत करीत नाही, इतरांवर अन्याय करीत नाही. या श्रेष्ठ मार्गानी प्राप्त आजीविकेलाच 'सम्यक आजीविका' म्हणतात.

बुद्ध काळात दोन दार्शनिक विचार प्रवाह समाजात होते. त्यातील पहिला म्हणजे 'यावज्जीवेत सुखं जीवेत ऋण कृत्वा घृतं पिवेत' म्हणजेच कर्ज काढा आणि जिवंत आहात तोपर्यंत तूप रोटी खाऊन घ्या. दुसरा म्हणजे 'निराहार राहून मोक्ष प्राप्तीची ईच्छा बाळगणे.' गौतम बुद्धाने दोन्ही विचार प्रवाहाला विरोध करून 'मज्झिमापटिपदा' मध्यम मार्ग सांगितला आहे.[4]

साधारणतः सर्वांचा असा समज आहे की, बुद्ध हे फक्त धार्मिक महापुरुष होते परंतु हे पूर्ण सत्य नाही. तत्कालीन सामाजिक, आर्थिक व धार्मिक विषमतेमुळे बुद्धाच्या समतावादी तत्त्वज्ञानाचा उदय झाला. आर्थिक बाबींवरील बुद्धाचे विवेचन हे अर्थार्जन कल्याणकारी मार्गाचा वापर करूनच करावे यावर भर देणारे होते. उलट अनैतिक मार्गाचा वापर करून जी संपत्ती आपण मिळवतो ती नक्कीच समाजासाठी घातक ठरत असते. बुद्धाने सम्यक आजीविका आर्य आष्टांगिक मार्गात समाविष्ट केली ती आजही अनुसरणीय आहे.

सम्यक आजीविका हे केवळ सामाजिक जीवनाच्या आर्थिक अंगापुर्ते मार्यादित नाही तर आपल्या समग्र सामुहिक जीवनाच्या संपूर्ण परिवर्तनाचे निर्देशक आहे. ते आदर्श समाजाच्या निर्मितीचे प्रतीक आहे. मानवी कल्याणासाठी गौतम बुद्धाने आष्टांगिक मार्गाचा उपदेश केला. ती आठ तत्त्वे म्हणजे "सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक वाणी, सम्यक कर्मात, सम्यक आजीविका, सम्यक समाधी"[5] ही होत. हा आष्टांगिक मार्ग दुःखाचा निरोध करण्याचा मार्ग होय. म्हणजेच सुखाकडे नेणारा मार्ग होय.

बुद्धाने नैतिकदृष्ट्या चुकीचे असणारे आपल्या उपजीविकेचे किफायतशीर मार्ग सोडून देण्यास सांगितले. बौद्धधम्माच्या विकासातील ही एक निकोप घटना आहे. बुद्धांनी सर्वप्रथम चुकीच्या मार्गाने प्राप्त आजीविकेपासून अलिप्त राहण्याचा खुलासा केला. अनेक प्रकारच्या व्यवसायापासून प्राप्त उपजीविकेचा बुद्धाने विरोध केला आहे. ते खालील प्रमाणे –

१) कत्तलखाण्यापासून प्राप्त केलेली उपजीविका.
२) विष पुरविण्याच्या व्यवसायापासून प्राप्त केलेली उपजीविका.
३) युद्धात वापरण्यात येणाऱ्या शस्त्र निर्मितीच्या व्यवसायापासून प्राप्त केलेली उपजीविका.

'ब्रम्हजालसुत्ता'च्या काही भागात वाममार्गी आजीविकेचे वर्णन दिसून येते. तो आशय असा की, "निष्ठावान व्यक्तींनी दिलेल्या भोजनावर निर्वाह करणारे ब्राम्हण आणि परिव्रांजक आपली आजीविका कमविण्याकरिता चुकीच्या साधनाचा वापर

करीत आहे. जसे हस्तरेखा– विज्ञान, भविष्यवाणी, शुभ–अशुभ सांगणे, साप–विंचू–पक्षी यांच्या विषयीच्या तंत्रविद्येचा वापर करणे."[6] बुद्ध म्हणतात की ह्या क्षुद्रकला आजीविका कमविण्याचे तुच्छ साधन होय. बुद्ध पुढे म्हणतात की, 'ग्रहण, नक्षत्र, उल्कापाताविषयी भविष्यवाणी, चुकीचा उपचार करणे इ. अनुचित प्रकारातून जे आपली उपजीविका करतात ते ब्राम्हण आणि परिव्रांजक चुकीच्या साधनाचा वापर करतात.' ते सर्वांसाठी हानिकारक असून, बुद्ध स्वतःला मात्र या क्षुद्रकलापासून अलिप्त ठेवतात.

एकदा 'तालपुत्तो' नावाचा नट बुद्धाकडे आला आणि म्हणाला की, "आम्हा अभिनय करणाऱ्यामध्ये अशी समजूत आहे की, आम्ही मरतो तेव्हा आम्ही देवलोकात जातो कारण आमच्या अभिनयामुळे आम्ही लोकांना हसविलेले असते. यावर गौतम बुद्ध उत्तर देतात की, मृत्यूनंतर नट नव्या स्वर्गात जात नाही. याचे कारण असे की, ते स्वतः लोभ, द्वेष आणि मोहाने भरलेले असतात आणि आपल्या अभिनयाद्वारे लोकांच्या मनातील लोभ, द्वेष आणि मोहाला उत्तेजित करतात. इतरांना ते पतित करतात आणि अशा प्रकारचा मोबदला दुःखाशिवाय असूच शकत नाही"[7]

बुद्धकाळात लोक जीवनातील जास्तीत–जास्त काळ उपजीविका कमविण्यात घालवत असत. बुद्ध म्हणतात, "माणसाने आपली उपजीविका कमवावी आणि उरलेला वेळ धम्मकार्य व धम्मसाधनेसाठी द्यावा. यातून सांसारिक व धार्मिक ही दोन्ही टोके साधता येतात." सम्यक प्रकाशात सम्यक आजीविका केल्यास समाजात परिवर्तन घडून येण्यास मदत होते.

गौतम बुद्धाने सदाचार आणि नीती ह्या दोन तत्त्वावर सम्यक आजीविकेच्या बाबतीत विशेष भर असल्याचे दिसून येते. बुद्धाचा उपदेश रचनात्मक आहे. उच्च आदर्श जीवनाकरिता सम्यक आजीविकेचे महत्त्व कशाप्रकारे असते याचे विश्लेषण आपणास बुद्धतत्त्वज्ञानात दिसून येते.

## संपत्ती विषयक विचार

गौतम बुद्धाचे संपत्ती विषयक विचार हे त्यांनी वेळोवेळी केलेल्या उपदेशातून दिसून येतात. संपत्ती हे ऐहिक सुखप्राप्तीचे मुख्य साधन होय. स्वतः व स्वतःच्या कुटुंबाला सुखी बनविण्याकरिता संपत्तीची गरज असते. संपत्ती दान करणेही गरजेचे असते. तृष्णेपासून लोभ, लोभपासून ओढ–कामना–आग्रह–स्वामीत्व अशी प्रतित्यसमुत्पादाची श्रृंखला तयार होते. जेथे तृष्णा नाही तेथे स्वामीत्वाची भावनाही नाही. भिक्खुंनी भौतिक संपदेचे नव्हे तर धम्मसंपदेचे उत्तराधिकारी व्हावे, अशी ईच्छा बुद्ध व्यक्त करतात.

बुद्धकाळात जनतेचे आर्थिक जीवन सुखी व समृद्ध होते. चम्पा निवासी श्रेष्ठी पुत्र 'सोणकोटिविंश' वीस करोडचा धनी होता, अंशी गाडी असर्फी त्याच्याकडे होती. साकेत सेठ 'धनंजय' याने आपली मुलगी 'विशाखा' करीता ९ करोड मूल्याचा 'महालता' नावाचा आभूषण बनविला होता, त्याच्या मुल्याकरिता ५,४०० गाडी धन दिले होते. तसच विशाखा करिता तिचा सासरा 'मृगार श्रेष्ठी' याने एक आभूषण एका लाखात बनविले होते. 'पिप्पलि माणवक' यांच्याकडे ८७ करोड संपत्ती होती.[8]

संघातील भिक्खुंसाठी बुद्धाने नियम आखून दिले होते. त्या नियमानुसार भिक्खुं केवळ आठ वस्तुंनाच व्यक्तिगत संपत्तीच्या स्वरूपात स्वतःजवळ बाळगू शकत असत.

१) अन्तर–वासक (आतले वस्त्र)
२) उत्तरासंग (वरचे वस्त्र)
३) संघाटी (थंडीपासून बचावाचे वस्त्र)
४) कंबरेस बांधावयाचे कटिबंध
५) भिक्षापात्र
६) वाती (वस्तरा)
७) सुई–धागा
८) अलक्षाधक (पाणी गाळण्याचे वस्त्र)[9]

सोने–चांदी यासारख्या गोष्टी भिक्खुंकरिता निषिद्ध होत्या. भिक्खुं संघाची मालमत्ता ही सामुहिक स्वरूपाची असे.

भिक्खुं संघाला जे दानस्वरूपात मिळे त्या सर्वावर भिक्खुं संघाची सामुहिक मालकी असायची. बुद्धाने भिक्खुं संघासाठी व्यक्तिगत संपत्ती संग्रहाचा विरोध केला आहे. व्यक्तिगत संपत्ती ही नेहमीच असुरक्षितता निर्माण करीत असते. अनाथपिंडकाने जेतवन तयार करून ते बुद्धाला समर्पित करण्याची ईच्छा व्यक्त केली तेव्हा बुद्ध म्हणाले, 'श्रेष्ठी हे बुद्धासाठी नाही तर संपूर्ण संघास दान करावे.'

बुद्ध संपत्तीचे चार भागात विभाजन करतात. ते म्हणतात,

"एकेन भोगे भुज्जेय्य, द्वोहि कम्मं पयोजये।
चतुत्थच्च निधापेय्य, आपदासु भविस्सती, ति।।"[10]

म्हणजेच –

१) संपत्तीच्या एका भागाने आपले व कुटुंबाचे पालनपोषन करावे.
२) संपत्तीच्या दुसऱ्या भागाची आपल्या व्यवसायात गुंतवणूक करावी.
३) संपत्तीच्या तिसऱ्या भागाचे दान करावे.
४) संपत्तीचा चवथा भाग येणाऱ्या आपत्तीकरिता सुरक्षित व संरक्षित ठेवावा.

गौतम बुद्धानी श्रमण व उपासक संघ असे दोन वर्ग आचरणाच्या आधारावर निर्धारित केलेत. ह्यापैकी श्रमण म्हणजे भिक्खु ज्यांनी संसाराचा त्याग केलेला होता. धम्माचा प्रसार हेच मुख्य कार्य त्यांना दिलेले होते. उपासक म्हणजे सांसारिक मनुष्य जो संसारात राहून पंचशील आणि आर्य आष्टांगिक मार्गाचे पालन करीत होता. माता–पिता व पुत्र ह्यांना उपदेश देतांना बुद्ध म्हणतात, "माता–पित्याने पुत्रास शिल्पशास्त्राचे शिक्षण दिले पाहिजे. ह्याशिवाय आपल्या संपत्तीचा पौत्रिक वारसाहक्क दिला पाहिजे. पुत्राने पित्याच्या संपत्तीचे रक्षण करावे व त्यांचा योग्य वारसदार व्हावे."[11] मित्रांसबंधी उपदेश करताना बुद्ध म्हणतात, "सभ्य मनुष्याने आपल्या मित्रांना भेटवस्तू द्याव्यात, त्यांना लाभ होईल असाच व्यवहार करावा,

मित्रांच्या संपत्तीचे रक्षण करावे तसेच संकट समयी त्यांना मदत करावी."[12]

अनाथपिंडकास एकदा प्रश्न पडला की, सुखी गृहस्थ कोणास म्हणावे? त्याचे समाधान करताना बुद्ध म्हणाले की, "सुखी गृहस्थ धन– धान्य संपन्न असतो. ही संपदा त्याने बाहुबलाने, निढळाच्या घामाने संपादन केलेली असते आणि जेव्हा तो असा विचार करतो की ही धनसंपदा त्याच मार्गाने अर्जित केलेली आहे, तेव्हा तो सुखी होतो. ह्या धनसंपदेचा उपयोग जेव्हा तो पुण्यकर्म करण्यासाठी करतो, तेव्हा त्याला अधिक सुख प्राप्त होते. ज्या गृहस्थावर कोणाचेही ऋण देणे लागत नाही ह्याशिवाय जो मनुष्य काया, वाचा आणि मनाने निष्कलंक असतो, तो सुखी गृहस्थ असतो."[13] अशाप्रकारे गृहस्थाचे सुख कशात निहित आहे हे गौतम बुद्धाने विस्तारपूर्वक सांगितले.

गौतम बुद्धाने अर्जित संपत्तीचा विनाश कोणकोणत्या कारणांनी होते याची सखोल चिकित्सा केलेली आहे. बुद्ध संपत्तीच्या विनाशाची खालील कारणे सांगतात.

१) मादक पदार्थाच सेवन :–

गौतम बुद्ध म्हणतात की, 'मादक पदार्थाच्या सेवनाने आजार, कलह, प्रज्ञानाश ह्याशिवाय संपत्तीचा नाश हे सर्व दुष्परिणाम संभवतात.'

२) अयोग्य वेळी भटकणे :–

गौतम बुद्ध म्हणतात की, 'गृहपतीने रस्त्यावर अवेळी भटकत फिरणे अयोग्य आहे. त्यामुळे त्याचे पत्नी व मुल संरक्षण विरहित आणि असुरक्षित असतात. त्याची धनसंपत्ती धोक्यात असते. त्याला अनेक समस्यांना सामोर जावे लागते.'

३) समज्याभिचरण (नृत्य–तमाशा) :–

गौतम बुद्ध म्हणतात की, 'समज्याभिचरण अनेक चिंताचे कारण बनून संपत्तीच्या विनाशाचे कारण बनत असते. मनुष्य सतत आज कोठे वाद–प्रतिवाद आहे, कोठे खेळ आहे, कोठे गायनाचा कार्यक्रम आहे याच विचारात राहून त्याला सम्यक विचाराचे विस्मरण होते.'

४) जुगार :–

गौतम बुद्ध म्हणतात की, ‘जुगाराने संपत्तीची तत्काल हानी होते. जुगार खेळणारा दुसऱ्याचे वैरत्व ओढवत असतो, न्यायालयाचा त्याच्यावर विश्वास नसतो, पैशाच्या हानीवर व्याकुळ बनतो आणि त्याचे मित्र त्याला हीन समजतात–त्याचा तिरस्कार करतात.’

५) दुष्ट लोकांचा सहवास :–

गौतम बुद्ध म्हणतात की, ‘दुष्ट, धूर्त लोकांचा सहवास संपत्तीच्या ऱ्हासाला जबाबदार असते. दुष्ट आणि धूर्त लोकांच्या सहवासाने मनुष्य धोकेबाज व दंगलखोर बनत असतो आणि त्याचा परिणाम त्याच्या संपत्तीच्या ऱ्हासाचे कारण बनते.’

६) आळस :–

गौतम बुद्ध म्हणतात की, ‘आळशी मनुष्य नाना कारणे दाखवून काम करण्याकडे दुर्लक्ष करतो, त्यामुळे अनुत्पन्न संपदेचे नवनिर्माण होत नाही आणि उत्पन्न संपदा नष्ट होते.’

७) इतर कारणे :–

गौतम बुद्ध म्हणतात की, ‘फसव्या आणि अहितकारी स्त्री सोबत संबंध ठेवणे, परस्त्रीगमण करणे, सत्पुरुषांची संगत टाळणे, आपल्या कुटुंबाची बदनामी करणे’ इ.[14] कारणांनी अर्जित संपत्तीचा विनाश होतो.

गौतम बुद्धांनी सांगितलेली ही कारणे अडीच हजार वर्षापूर्वीची आहेत, तरी आजही ती तितकीच शाश्वत आहेत.

## कृषीविषयक विचार

बुद्धाचा काळ हा भारतीय इतिहासातील आर्थिकदृष्ट्या संपन्नतेचा काळ होता. कृषी, शिल्प, व्यापार हे सर्व उन्नत अवस्थेत होते. बुद्ध काळात भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. ‘जातक कथे’नुसार वनभूमीला साफ करून तिचा वापर कृषी कार्याकरिता होत असे.[15] राजाचे हे कर्तव्य असायचे की, कृषकाला वेळेवर बीज उपलब्ध करून देणे. बुद्ध काळात शेती कोण्या एका जाती–धर्माचा व्यवसाय नव्हता. मगधचे एकनाला गावचे काशिभारतद्वाज ५०० नांगराने शेती

करायचा. संपूर्ण ग्राम मिळून शेती करायचे त्याला 'ग्रामकृषी' म्हणायचे. नांगर चालविणे हे राष्ट्रीय महत्त्वाचे कार्य समजले जायचे.

कृषकाने शेती कशी करावी यावर उपदेश करताना गौतम बुद्ध म्हणतात की, "पहिल्याने शेती नांगरावी, त्यात बीयांची पेरणी करावी, पेरणी केल्यावर पाणी द्यावे, पीक आल्यावर त्याला काटावे, त्याला पिसवून त्यातील धूळ दूर करावी, त्याला फटकून बाकीचे पीक एकत्र करावे."[16] शाक्य लोक शेतात बी पेरण्याकरिता 'वप्पमंगल' उत्सव साजरे करीत. ज्यात एक हजार नांगर एकाच वेळी चालवायचे, राजासुद्धा स्वतः नांगर चालवीत असे. यावरून निदर्शनास यते की, कृषी हा त्यावेळचा गौरवास्पद व्यवसाय होता.

उदय ब्राम्हणाला उपदेश करताना बुद्ध म्हणतात की, "कृषक पुन्हा–पुन्हा बी पेरतात, पुन्हा–पुन्हा पाऊस पडतो, पुन्हा–पुन्हा कृषक नांगर
चालवितो."[17] कृषी ही विधिवत केली जायची. गहू, जवस इ. पिकांच्या पेरणी करिता कार्तिक, मार्गशिर्षच्या शुक्ल पक्षातील पंचमी, षष्ठी, सप्तमी या दिवसात पेरणी अधिक चांगली समजली जायची.

१) शेतीची पूर्वतयारी :–

शेतीच्या पूर्वतयारी बाबत गौतम बुद्ध गृहपतींच्या कर्तव्याचे उपदेश करताना भिक्खुंना म्हणतात की, "भिक्खुंनो! कृषक गृहस्थ नांगरणी करून मातीला नीट करतो, नंतर त्यात बीज टाकतो आणि लवकरात लवकर पाणी देतो व गरज नसताना पाणी देणे थांबवितो. ही तीन कर्तव्ये त्याला पार पाडावी लागतात."

२) बीज :–

चांगले बीज पेरण्याच्या बाबतीत गौतम बुद्ध म्हणतात की, "भिक्खुंनो! जसे धानाचे बीज असा, अंगुराचे बीज असो त्याला ओल्या जमिनीत पेरावे; तो जे काही जमिनीतून रस

शोषून घेईल, जे पाणी शोषून घेईल ते माधुर्यासाठी राहणार. असे कशा करिता? भिक्खुंनो ते बीज उत्तम आहे.” कृषक शेतीकरिता चांगले उत्पादन देणारे बीज पेरायचे.

३) सिंचनाची व्यवस्था :–

पाणी हे शेतीचे मुख्य अंग असते. पाण्याअभावी शेती केलीच जाऊ शकत नाही. प्राचीन काळात सिंचनाचे विविध उपाय दिसून येतात. बुद्ध काळात सिंचनाच्या सोयी फार नव्हत्या, शेती पावसाच्या पाण्यावर विसंबून होती. पाऊस पडला नाही तर सुख–सुविधांचा ऱ्हास व्हायचा.

“मच्छजातकात शास्ता पाऊसाला उद्देशून म्हणतो की, एके काळी कोशल प्रदेशात पाऊस पडला नाही तर, कृषी वाळली, जिथे तिथे तलाव, पुष्करणी आटले.” यावरून समजते की, विहिरी, तलाव, पुष्करणी, सरोवर यासारखे सिंचनाचे साधन उपलब्ध होते. शेतीला पाणी देण्याकरिता
मातीच्या मडक्यांचा वापर केला जायचा.

४) पिकांची कापणी आणि मळणी :–

बीज पेरण्याकरिता कृषीला व्यवस्थीत करणे तसेच जमिनीची निवड, सिंचन आणि पीक आल्यावर पिकांची कापणी आणि मळणी इ. कार्य आवश्यक असते. बुद्धाच्या उपदेशात याबाबतीत असे वचन आहे की, “काशी राज्यातील एका गावात दोन मित्र असायचे. ते पाण्याचे तुंबे घेऊन शेतीवर जायचे, पाण्याचे तुंबे एकीकडे ठेवून पिकांच्या कापणी आणि मळणीचे कार्य करायचे आणि तहान लागल्यावर तुंब्यातले पाणी प्यायचे. ”[१८] पिकांची कापणी आणि मळणीचे कार्य लोक अंगमेहनतीने आणि सामुहिक रूपाने करत असत.

पिकाच्याकापणी विषयी बुद्ध भिक्खुंना उपदेश करतात की, “भिक्खुंनो! एखाद्या कृषकाचे धान असो, कृषकाने पिकांची कापणी करावी, पीक एकत्र करावे, पिकाची मळणी करावी, मळणी करताना भुसा वेगळे कारावा. असे केल्याने

भिक्खुंनो! त्या कृषकाला पीक लवकर मिळून, सारवान् होतील, शुद्ध होतील."[19]

९) कृषीची सुरक्षा :–

शेतीच्या सुरक्षेचे कार्य महत्त्वाचे असते. 'लक्खनजातकात' कृषीच्या सुरक्षेसंबंधीत एक प्रसंग असा आहे की, "मगध प्रदेशात शेतीच्या दिवसात पीक उभे झाल्यावर जंगलातील मृगापासून धोका असायचा. मृगांना शेतापासून दूर ठेवण्याकरिता लोक शेतीच्या आवारात खड्डे खोदत असत. गुलेल वापरायचे, फास लावायचे."[20] अशाप्रकारे जंगलातील प्राण्यापासून शेतीतील पिकाचे रक्षण केले जायचे.

३.३.१ बुद्धाकालीन पिकांचे प्रकार

बुद्धकाळात विविध पिके काढली जायची. तसेच फळांचेही उत्पादन केले जायचे.

१) धानाची शेती :–

बुद्धाच्या उपदेशात धानाच्या पेरणीविषयी अनेक उल्लेख आलेले आहेत. बुद्ध भिक्खुंना उपदेश देतो की, धानाचे लोंब चांगले ठेवले नाही तर त्याच्यावर हातपाय पडून रक्त लागते. कपिजातकातील एका प्रसंगानुसार, "एक दिवस धान मळणाऱ्या दासीने उन्हात वाळवत ठेवलेले धान खाणाऱ्या बकरीला जळत्या काठीने मारले."[21] बुद्ध काळात धानाची शेती मोठ्या प्रमाणात होत असे.

२) जवस :–

धानासोबतच जवसाचे उत्पादन घेतले जात असे.

३) ईख :–

बुद्ध भिक्खुंना उपदेश देतात की, "भिक्खुंनो! जसे ईखाचे बीज असो ते ओल्या मातीत पेरल्याने ते पृथ्वीतील रस ग्रहण करतात.....ते मधूर बनतात." ईखातून तेल काढण्याविषयी

बुद्ध उपदेश देतात की, "महाराज! रस काढण्याकरिता ईख कोल्हुमध्ये घालतात."[22]

४) इतर पिके :–

धान, जवस, ईख व्यतिरिक्त उडिद, मुंग, बाजरा, कापूस, गहू, कोदा, तीळ, सरसोच्या शेतीचे उल्लेख आहेत. खाद्यपदार्थात ककुनी, डांगर, कुशूंभ, वरक, कुल्थी, वटाण्याचे[23] उत्पादन होत असे.

५) आंबे :–

बुद्ध भिक्खुंना उपदेश देतात की, "भिक्खुंनो! आंबे चार प्रकारचे असतात. कच्चे परंतु पिकल्यासारखे, पिकलेले परंतु कच्चे असल्यासारखे, कच्चे आणि कच्चे असलेले तसेच पिकलेले आणि पिकलेले दिसणारे." मीलिंद प्रश्न या ग्रंथात नागसेन म्हणतात, "व्यक्ती पिकलेले आंबे खाऊन, त्याचे बी पेरले तर एक वृक्ष तयार होईल, त्याला फळे येतील, तेव्हा तोच मनुष्य पुन्हा फळांना खाऊन, बी पेरले तर आणखी वृक्ष तयार होईल, पुन्हा त्याला फळे येतील. याच कमाने अन्ताला कुठेच ज्ञान नाही."[24]

६) जांभुळ :–

बौद्ध साहित्यात जम्बुद्विपाची जी संकलपना दिसून येते त्याचे नामकरण जांभळापासूनच झालेले आहे. 'विनयपीटका'तील एका प्रसंगानुसार "काश्यप! मी तुला ज्या जम्बु साठी 'जम्बुद्विपाला' पाठवले त्या फळापूर्वीच येवून या अग्निशाळेत बसलो आहे. काश्यप ही तीच सुंदर, वर्ण, रस आणि गंधयुक्त जम्बु फळ आहेत."[25] जांभळाचा रस व माधुर्याचे वर्णन तर आहेच शिवाय जांभळाच्या पानापासून पेय तयार व्हायची.

७) अंगुर :–

अंगुराचे फळ रसयुक्त असून त्याचे पेय तयार केल जायचे.

८) इतर फळे :–

इतर फळांमध्ये मोच (केळ), चोच, फालसा, मोह, पुरसा, ढांक, नारळ, ताड, नीम, आवळे, हर्रे इ. चे उत्पादनात घेतले जयचे.

९) वृक्ष :–

बौद्ध साहित्यात साल, तमाल, चन्दन, पिंपळ, पाकर, वड, कच्छक, नील, पहरी असे नाना प्रकारच्या वृक्षांचे वर्णन आहेत. वेळूचा उपयोग सीढी बनविणे, घर बनविणे यासाठी व्हायचा. नागसेन मीलिंदला म्हणतो की, "महाराज केळाचे वृक्ष, वेळूचे वृक्ष हे स्वतःच नष्ट होत असतात ज्याला ते स्वतः निर्माण करतात."[26]

कृषी कार्याकरिता गाय, बैल, उंट, घोडे इ. पशूंचा वापर केल्या जायचा. बुद्ध कृषी कार्याला विशेष सन्मानाने पाहतात. त्यामुळेच आजीविका कृषीच्या माध्यमातून मिळविण्याचा उपदेश करतात. बुद्धकाळात कृषी कार्याशिवाय जोडव्यवसाय म्हणून पशुपालनाचा व्यवसायाचा उल्लेख आहे. पशुपालन करणाऱ्याला "पशुपालक/गोपालक/गोपाल/पशुपाल"[27] अशा विविध नावांनी संबोधत असत. लोक लहान मोठ्या प्रमाणात उद्योगही करीत असत.

## व्यापारविषयक विचार

बुद्धकाळात लोक आपली जीविका अर्जित करणे आणि संपत्ती कमविण्याकरिता लहान–मोठ्या प्रमाणात उद्योग, व्यवसाय करीत असत. बुद्धकाळात आंतरदेशी आणि परदेशी व्यापार केला जायचा. अनेक प्रकारचे घडे आणि भांडे जे उपयोगी तर होतेच परंतु कलापुर्ण होते, बुद्धकाळात कुंभार बनवीत असत. धातूचे काम करणाऱ्यास 'कम्मार' म्हणत.

लोहकाम करणाऱ्यास 'लोहकार' आणि सुवर्णकारास 'सोण्णकार' म्हणत असत.

गौतम बुद्ध व्यवसाय कसा आणि कोणता करावा ते सांगतात. या बाबतीत व्यवसायाचे दोन भागात विभाजन करता येईल.

१) अनुचित व्यवसाय :–

गौतम बुद्धनुसार असे व्यवसाय जे समाजाला हानी पोहचविणारे असतात अनुचित व्यवसाय होत. अनुचित व्यवसाय कोणते ते सांगताना बुद्ध खालील व्यवसायांचा समावेश करतात.
अ) पशूंची कत्तल करणारे व्यवसाय.
ब) चैनीचे आणि गरज नसणारे व्यवसाय.
क) विषाचा व्यवसाय.
ड) युद्धाची शस्त्रे निर्माण करणारे व्यवसाय.
इ) शकुन–अपशकुन सांगणारे व्यवसाय.
ई) हस्तरेखा विज्ञान सांगणारे व्यवसाय.

२) उचित व्यवसाय :–

गौतम बुद्धनुसार असे व्यवसाय जे समाजाला हानी पोहचविणारे नसतात ते समाजाला उपयोगी असतात ते सर्व व्यवसाय उचित व्यवसाय होत. उचित व्यवसाय मानसिक तणाव निर्माण करीत नाही. रोग्यांची सेवा करण्यासारखे व्यवसाय उचित व्यवसाय होत.[28]

बुद्धकाळात वेगवेगळे व्यवसाय करणारे कौशल्यपूर्ण लोक असत. त्यांना त्यांच्या व्यवसायाच्या माध्यमातून उपनाम असत. बुद्धकाळात नवीन व्यवसायाचा उदय झालेला होता.

## बुद्धकालीन व्यवसाय

बुद्धकाळात खलील प्रकारचे व्यवसाय चालत असत.

१) कृषी :–

कृषी करणाऱ्यास 'कर्षक' असे म्हणत. कृषक समाजाचा अभिन्न अंग होते. बहुतेक लोकांची आजीविका कृषीवरच

आधारित होती. कृषीवर आधारित इतर अनेक व्यवसाय ही चालत असत.

२) शिल्पकला व्यवसाय :–

बुद्धकाळात शिल्पकलेचा उदय झालेला होता. लाकडापासून पादफलक, भद्रपीठक, भाण्ड निर्माण होत असत.[29] लाकडाचे खेळणे सुद्धा बनविले जायचे.

३) भांडे निर्मिती व्यवसाय :–

कुंभकार मातीची भांडी तयार करीत. भांडी तयार करण्याकरिता चक्क (चाक) यंत्राचा वापर व्हायचा. भांड्यावर रंग–बिरंगी चित्रकारी केली जायची.

४) बागकाम :–

फुलांची शेती करून पाटली, किंशुक, जयसुमन, केतक यासारखे फुलांचे उत्पादन केले जायचे. फुलांच्या माळा तयार करून त्या विकण्याचा व्यवसाय केला जायचा.[30] माला तयार करणाऱ्यास 'मालाकार' आणि फूल, काशिक, चन्दन, अगरू सारखे सुगंधीत वस्तू विकणाऱ्यास गन्धिका म्हणत. गन्धिकांचे व्यवसाय करणाऱ्यांची संख्या समाजात मोठ्या प्रमाणात होती.[31]

५) वस्त्र व्यवसाय :–

कापसापासून वस्त्र तयार करणारे 'कुविन्द' म्हणून ओळखले जायचे. क्षौम आणि कापसापासून सूक्ष्म वस्त्र तयार होत असत. काशीचे कोमल वस्त्र (कासिकंच मुदृवत्थं) विदेशात प्रसिद्ध होते. त्याचे मूल्य 'एकलाख कहापण' पर्यंत असायचे. गन्धार आणि कोटुम्बर जनपद बहुमूल्य उनीवस्त्रांकरिता प्रसिद्ध होते.[32]

बुद्ध अगुत्तरनिकायात म्हणतात की, "भिक्खुंनो! काशीचे नवीन वस्त्र फार सुंदर आहे. काशीचे वस्त्र रत्नजडित आहेत." बुद्ध स्वतः विषयी सांगताना म्हणतात की, "भिक्खुंनो! जेव्हा मी कुमार होतो तेव्हा माझी पगडी, निवसन (वापरायचे

वस्त्र) आणि उत्तारखन्ङ (चादर) काशीचे असायचे."[33] काशीचे रेशीमही प्रसिद्ध होते. स्त्रिया काशीच रेशमी वस्त्र वापरायला उत्सुक असायच्या.

वस्त्र निर्मिती करिता सोन्याचा सुद्धा वापर व्हायचा. राजाची पगडी सुवर्णजडीत वस्त्राची असायची. मोठ्या धाग्यांची आसने, चित्रीत वस्त्रे, फूलदार वस्त्रे, लम्बी दरी, रथांचे साज, मृगाच्या चामड्याची आसने इ. वस्तू पूर्ण कलात्मकतेने तयार व्हायच्या. पाचशे मूल्यापर्यंतचे क्षौम–मिश्रित चादरी तयार व्हायच्या.[34]

कापड विकणाऱ्या व्यापाऱ्यास 'दुस्सिक' म्हणत. सूक्ष्म सूत कातण्याची कला लोकांना अवगत होती. कपड्यांना रंग देण्याचे काम सुद्धा केले जायचे. विनय–पिटकात भिक्खुंचे चिवर रंगविण्यासबंधी जे निर्देश आहेत त्यावरून लक्षात येते की, कपडे रंगविण्याची कला अत्यंतउच्च दर्जाची होती.

६) धातू उद्योग :–

धातूचे काम करणाऱ्यास 'कम्मार' तसेच 'सोण्णकार' संबोधले जायचे. बुद्धकाळात आभूषण बनविण्याची कला अवगत होती. अनेक प्रकारचे आभूषण हत्थत्थरण, (बांगडी) मुद्दिका, (मुद्रिका) माला, कुण्डल, मेखला, सुवर्णमाला तयार केली जायची. सुवर्णाचे आभूषण रत्नांनी जडीत असायचे.

तांबे, कासे आणि लोहासारख्या धातूंचे भांडे बनवित असत. कृषीची अवजारे लोहाची असायची. बारीक नक्षिकामाकरिता धातूचा वापर केला जायचा.[35] 'जातककथे'तील एका वर्णनानुसार एक कुशल लोहार वारानशीच्या बाजारात आपली सुई विकताना म्हणतो की, "कोण आहे जो ही सुई विकत घेणार."[36]

७) मत्सव्यवसाय :–

बुद्धकाळात मासे पकडण्याचा व्यवसाय केला जायचा. अनेक जातींचे मासे पकडले जायचे त्यात रोहित, नलपी,

संतवङक, अलिगगार, पाठी, काकमच्छ, शंकुल, संबक, सिंगी इ. [37] चा समावेश होता.

८) चिकित्सा व्यवसाय :–

चिकित्सा व्यवसाय करणारे वृक्षाच्या जड–मुळापासून औषध तयार करून लोकांवर उपचार करायचे आणि प्राप्त धनातून जीविका चालवायचे. हे चिकित्सक सापाच्या विषावर सुद्धा औषध द्यायचे.[38]

९) इतर व्यवसाय :–

बुद्धकाळात वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया ज्या स्त्रीयत्व विकून जीविका करायच्या, हस्तीदंताचा व्यवसाय असे एकूण २५ प्रकारचे व्यवसाय आणि शिल्पकारी अस्तित्वात होती.

१ हत्थारोहा – हत्तीच्या सवारीचा व्यवसाय करणारे.
२ अस्सारोहा – अश्वरोही.
३ रथिका – रथ चालविणारे.
४ धनुग्गहा – धनुष्य चालविणारे.
५ – १३ चेलका....थोधिनो – युद्धाचे काम करणारे.
१४ दासकपुत्ता – दास लोक.
१५ अलारिका – जेवण तयार करणारे.
१६ कप्पका – केस कापणारे.
१७ नहापका – स्नान करून देणारे.
१८ सुदा – हलवाई.
१९ मालाकारा – फुलांची माला बनविणारे.
२० रजका – धोबी.
२१ पेसकारा – रंगकाम करणारे.
२२ नलकारा – वेळूपासून वस्तू बनविणारे.
२३ कुम्भकारा – कुम्भार.
२४ गणका – हिसाब–किताब करणारे.
२५ मुदिदका – मुनीम.[39]

वरील सर्व पेशे बुद्धकाळात प्रसिद्ध होते.

**व्यापाराचे प्रकार**

बुद्धकाळात देशी आणि विदेशो स्वरूपाचा व्यापार होत असे.

१) स्थलमार्गाने होणारा व्यापार :–

बुद्धकाळात स्थल मार्गाने जास्तीत जास्त व्यापार होत असे. 'अपण्णकजातकात' ५०० गाड्या माल व्यापाराकरिता पूर्व देशातून अपरान्त देशापर्यंत नेण्याचा उल्लेख आहे. ६० योजन एवढा लांब प्रवास व्यापाराकरिता करीत असत. तीळ, धान, खाद्य सामग्रीचा व्यपार होत असे. बाजारात वस्तूचे मूल्य निर्धारित करण्याकरिता 'अर्थकारक' होते. वस्तूचे मूल्य घोडा, हत्ती, सुवर्ण[40] इ. मध्ये मोजले जायचे.

व्यापारी वर्ग जंगलातील रक्षकांना सुवर्ण देऊन जंगलातून प्रवास करायचे. आपसात मिळून संघटीत व्यापार करीत असत. व्यापाराकरिता रथ, बैल, उंटाचा वापर करीत. पाच–पाचशे व्यापारी एकाचवेळी समुहाने व्यापार करायचे, त्यांना 'सत्थवाह' म्हणत. बुद्धकाळात श्रावस्ती, काशी, राजगृह नगरे व्यापाराची मुख्य केंद्रे होती. अनाथपिंडक त्यावेळी सर्वात मोठा धनी व्यक्ती होता.[41] बुद्धकाळात व्यापाराकरिता मुख्यतः तीन राजमार्गाचा वापर केला जायचा. १) मगधची राजधानी राजगृहापासून ते गन्धारची राजधनी तक्षशिला पर्यंत. २) राजगृहापासून श्रावस्तीपर्यंत. ३) दक्षिणापथ, उत्तर भारत ते दक्षिण भारत पर्यंत.[42]

२) जलमार्गाने होणारा व्यापार :–

बुद्धकाळात जलमार्गाने व्यापार करणे कष्टदायक स्वरूपाचे होते. सहा–सहा महिन्याच्या कालावधीचा लांब प्रवास होत असे.[43] भारतीय व्यापारी फारशची खाडी पार करून बेबीलान पर्यंत व्यापाराकरिता जात असत. भरूकच्छचे व्यापारी संपूर्ण पश्चिम आणि पूर्व समुद्रतटी प्रवास करून 'सुवण्णभूमीला' (दक्षिण बर्मा) पोहचायचे. बुद्धकाळात भारताचा जलमार्गाने विविध देशांशी व्यापार होत असे. त्यात पूर्वेकडील

काल–मुख, (अराकान) सुवण्णभुमी, (दक्षिण बर्मा) वेसुंग, वेरापथ, तल्लोक, तमलि, चीन मलय प्रायद्वीप बेबीलान इ.[44] देशांचा समावेश होत असे.

दिशेचे ज्ञान होण्याकरिता नाविक लोक दिसाकाका (कावळे) सोबत न्यायचे. ताऱ्यांचा सुद्धा दिशा शोधण्याकरिता वापर व्हायचा. जलमार्गाने व्यापार करणाऱ्यास 'जलपथ–कम्मिका' संबोधित असत. तर जलमार्गाने होणाऱ्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्याकरिता 'जल–निय्यामक' अधिकारी असत.[45]

## चलन

बुद्धकाळात चलन–प्रणाली प्रचलित होती. 'अट्ठकथे'नुसार "राजगृहात एक कहापण २० मासकाएवढा होता आणि एक पाद पाच मासकाएवढा होता." म्हणजेच एक कहापणाचा चतुर्थ भाग पाद होय. पाच मासकाचा एक पाद आणि चार पादचा एक कहापण होत असे.

बैलाची एक जोडी चोवीस कहापणाला मिळायची. एक गधा आठ कहापणाला मिळायचा. गवताचा एक गठ्ठा एक मासक आणि एका श्रमिकाची एक दिवसाची मजुरी एक मासक किंवा अर्धामासक होती. तांबे, लोह, रजत आणि सुवर्णाच्या मुद्रा प्रचलित होत्या. सुवर्णमुद्रेला हिरण्य म्हणत, सर्वात मोठा सुवर्णसिक्का २५ धरण म्हणजेच १० औंसाचा होता.[46] बुद्धाच्या उपदेशातून कहापण आणि मासकांचे वारंवार उल्लेख आलेले आहे.

## वजन आणि माप

बुद्धकाळात खाद्यान्न मोजण्याकरिता 'नाली' हे लोकप्रिय माप होते. नालीचे वजन १२½ पल एवढा होता. खाद्यान्न मोजण्याचा लहान माप 'पत्थ' होता. बुद्धकाळात मोजमापाकरिता इतरही साधने होती त्यात दोण, तुम्ब, अम्मण यांचा समावेश होतो. बुद्ध उपदेशात नाली आणि दोण यांचा उल्लेख आलेलाच आहे.

लांबी आणि दुरीचे मोजमाप बुद्धकाळात अंगुल, विदट्ठि, यट्ठि, कुक्कु, हत्थ, उसभ, धनू, गावुत, आणि योजनाद्वारे मोजले जायचे. 'अभिधानप्पदीपिका' नुसार ७ अंगुल = १ रतन, ७ रतन = १ यट्ठि, २० यट्ठि = १ उसभ , ८० उसभ = १ गावुत, ४ गावुत = १ योजन, १ योजन = ८ मैल अंतर.[47]

बुद्धकाळात अधर्मापेक्षा धर्माने जीविका कमविण्यावर भर होता. समाजातील लोक धर्माच्या माध्यमातून धनलाभ करायचे. त्यावेळीही गरीब आणि श्रीमंत असे दोन पक्ष होते परंतु आर्थिक जीवनात ईमानदारी कमी नव्हती.

## श्रमविषयक विचार

बुद्धकालीन भारत हा समृद्धशाली होता. बुद्धकाळात लोकांनी श्रमाचे महत्त्व जानले होते किंबहुना बुद्धानी ते पटवून दिले होते. देशाची आर्थिक समृद्धी केवळ उत्पादनावर नाही तर मनाच्या शुद्धतेवर व एकाग्रतेवर अवलंबून असते. मन एकाग्र नसेल तर चांगल्या दर्जाची उत्पादन निर्मिती अधिक शक्य नसते. उत्पादनासबंधी बुद्धाचा कठोर आदेश आणि निर्देश असा आहे की, "कोणी व्यक्ती जर काहीच श्रम न करता राष्ट्राचे अन्न खत असेल तर तो लोहाचा तप्त गोळा खातो असे त्याने समजावे."[48]

गौतम बुद्ध श्रमप्रतिष्ठेचे कसे पुरस्कर्ते होते हे सांगणारे एक उदाहरण म्हणजे "एकनाला येथील काशी भारतद्वाज आपले शेत नांगरत असताना बुद्ध चारिका करीत तेथे पोहचले. काशी भारतद्वाज तेव्हा आपल्या मजुरांना भोजन देत होता, काशी भारतद्वाज बुद्धाला म्हणाला 'मी जमिनीची नांगरणी, वखरणी, पेरणो करून जेवतो तू सुद्धा काही श्रम करून मगच जेवावे'. बुद्ध काशी भारतद्वाजाला म्हणाले मी सुद्धा शेती करतो परंतु ती वेगळ्या प्रकारची आणि बुद्ध त्याला उपदेश करतात. बुद्धाच्या उपदेशाने प्रभावीत होवून काशी भारतद्वाज बुद्धाला एक काश्याचे भांडे भरून खीर देतो. परंतु बुद्ध ते नाकारतात व म्हणतात 'निव्वळ शाब्दिक उपदेशाने उपजीविका करणे योग्य

नाही, प्रज्ञावंत अशा अन्नावर जगत नाही.”[49] यावरून बुद्धालाही श्रमाचे महत्त्व कसे होते हे आपणास समजते.

बुद्धाने आचरणाविषयी जे उपदेश केलेत त्यात त्यांनी मालक व नोकर ह्यांचे संबंध कसे असावेत याबद्दल सांगितले आहे.

अ) मालकाची नोकराविषयीची आचारसंहिता :–

१) नोकरांच्या क्षमतेला झेपेल, त्यांना पार पाडता येईल तेवढीच कामे सोपवावित.

२) नोकरांच्या भोजनाची व योग्य मजुरीची सोय कारवी.

३) नोकरांच्या आजारपणात योग्य ती काळजी घ्यावी. औषधाची सोय करावी.

४) स्वादिष्ट, विशेष प्रकारचे खाद्य पदार्थ मिळाल्यास किंवा तसे तयार केल्यास त्यातून काही हिस्सा नोकरांना द्यावा.

५) आवश्यक त्या योग्य वेळी नोकरांना रजा द्यावी.

ब) नोकराची मालकाविषयीची आचारसंहिता :–

१) ते मालकाच्या झोपून उठण्यापूर्वीच झोपून उठत असतात.

२) ते मालकाच्या झापी गेल्यावरच झोपायला जात असतात.

३) त्यांना जे काही दिले जाईल ते घेत असतात, फसवेगिरी करीत नाही.

४) त्यांना सोपवून दिलेले कामकाज प्रमाणिकपणे कर्तव्य म्हणून पार पाडतात.

५) ते आपल्या मालकाची चांगली किर्ती पसरवितात, मालकांना ईमानदार असतात.[50]

वरील आचारसंहितेतून बुद्धाला श्रमाचे किती महत्त्व होते आणि श्रमिकांचे हित याबाबद कल्पना येते.

## संपत्ती दान विषयक विचार

दानाचा शाब्दिक अर्थ ‘देणे’ असा आहे. दान म्हणजे श्रद्धाभावनेने व यथाशक्ती आपल्याजवळील काही प्रमाणात गरजुंना ज्या वस्तू किंवा संपत्ती दिल्या जातात त्यास दान

म्हणतात.[51] ‘दिघनिकायात’ दानाचे चार प्रकाराचे वर्णन दिसून येते.

१) सत्कृत्य दानं – चांगल्या तऱ्हेने केलेले दान.

२) स्वहस्त दानं – स्वतःच्या हाताने दान करणे.

३) चित्तीकृत दानं – मनःपूर्वक दिलेले दान.

४) अनपविद्ध दानं – अखंडित दान.

अगुत्तर निकायात दानाचे विविध प्रकाराचे वर्णन आलेले दिसून येते.

१) असंगदानं – अनासक्तीचे दान.

२) भयादानं – भयमुक्त दान.

३) आदसि मे ति दानं – अदृश्य दान.

४) दस्सति मे ति दानं – दृश्य दान.

५) साहुदानं – चांगले दान.

६) सद्धाय दानं – श्रद्धापूर्वक दान.

७) सक्कच्च दानं – सावधानपूर्वक दिलेले दान.

८) सुचिदानं – पवित्र दान.

९) पणीत दानं – प्रणीत दान.

१०) कालेन दानं – वेळेवर केलेले दान.

११) वचेय्य दानं – निवडून दिलेले दान.

१२) अभिव्ह दानं – रोज दिलेले दान.

१३) दत्वा अत्तमनो होति – दिल्यावर संतुष्टी मिळणारे दान.[52]

गौतम बुद्धानुसार विविध अंगांनी दान देत असताना विवेक व प्रज्ञा बुद्धी जागृत असावी. केवळ दान देण्याकरिता म्हणून दान देणे महत्त्वाचे नसते. दान स्वीकारणाऱ्याच्या गरजा कोणत्या, कोणते दान योग्य याचा प्रज्ञा बुद्धीने विचार करून दान करावे.

गौतम बुद्ध दान करणाऱ्याने कोणती काळजी घ्यावी ह्याविषयी खालील प्रमाणे उपदेश करतात.

१) श्रेष्ठ व्यक्तीस दान करतेवेळी सन्मानपूर्वक, आदर व पूज्य भावनेने दान द्यावे.

२) दान कोणत्याही लोभ आणि प्रलोभनाने प्रेरित नसावे.

३) दान करताना स्वीकारणाऱ्याला आनंद व सुख मिळाले पाहिजे.
४) गरजेच्या वेळीच दान करावे.
५) दानात ह्या वस्तू नसाव्यात. –
 अ) शस्त्र व प्राणघातक औजार.
 ब) मादक द्रव्ये.
 क) अनुपयोगी वस्तू.
 ड) पाळीव जनावरे.
६) कंटाळून किंवा त्रासून दान देऊ नये.
७) दान करतांना आर्थिक नुकसान होत असेल अशी मनःस्थिती नसावी.[53]

दान ह्या सत्कर्माविषयी गौतम बुद्ध विशाखाला उपदेश करताना म्हणाले की, "जे दानास पात्र आहत त्यांना दान करणे हे सुपिक मातीत बीज पेरण्यासरखे आहे. उलट जे राग–लोभादी मनोविकाराच्या अधिन आहेत त्यांना दान करणे अयोग्य भूमीत बीज पेरण्यासारखे आहे."[54] दानाचा स्वीकार करणाऱ्यांचे मनोविकार गुण विकासास कुंठित करून टाकतात, श्रद्धायुक्त मनाने आणि निस्वार्थी वृत्तीने जे काही दान देईल ते दान दिव्य दुःखनाशक आणि सुखकारक ठरेल.

दक्खिणाविभंग सुत्तात बुद्ध म्हणतात –

यो सीलवा दुस्सिलेसु ददाति दानं,
धम्मेन लध्देन सुपसन्न चित्तो.
अभिसध्दाहं कम्मफलेनं उल्लारं,
सा दक्खिना दायकतो विसुज्झति.[55]

म्हणजेच– दान देणारा व्यक्ती सद्‌गुणी आणि सदाचारी असेल, तो कुशल कार्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून आपल्या शुभकार्यावर विश्वास ठेवून दुर्गुणी व्यक्तीला जरी दान देत असेल तरी दान देणाऱ्याला कुशल कार्याचा लाभ होतो.

तथागत बुद्धाच्या काळात त्यांच्या भिक्खु संघास अनेक श्रद्धावान उपासक, उपासिकेंनी दान दिलेले आहे. त्यात –

१) अनाथपिंडक :–

अनाथपिंडकाने करोडो सुवर्णमुद्रा खर्च करून जेतवनात अतिविशाल विहार बांधून भिक्खु संघास दान दिले.

२) विशाखा :–

मिगारमाता विशाखा भिक्खु संघास दर वर्षी चिवर दान करीत असे. तसेच जेतवनात 'पूर्वाराम' विहार बांधून भिक्खु संघास दान दिले.

३) आम्रपाली :–

आम्रपाली एक गणिका होती. भिक्खु संघाला भोजनास आमंत्रीत करून 'आम्रवन' भिक्खु संघास दान केले.

४) राजा बिंबिसार :–

राजा बिंबिसार राजगृह नगराचा नरेश होता. राजा बिंबिसाराने 'वेळूवन उद्यान' भिक्खु संघास दान केले.

५) जीवक :–

जीवक शल्यचिकित्सक होता. त्याने 'आम्रवन उद्यान' भिक्खु संघास दान केले.[56]

बुद्धकाळात विहाराचे दान तसेच जमिनीचे दान हे श्रेष्ठ दान होते. मानवी जीवनात दान करणे हे उच्चतम कर्म समजले जाते म्हणूनच दानाला दानधर्म म्हटले जाते. मानसाच्या अंगी सुप्तपणे वाढत चाललेला लोभ हा विकार दान केल्यामुळे नाहीसा होत असतो.

## भूख व दारिद्र्य विषयक विचार

गौतम बुद्धाने समाजजीवनाचे अगदी जवळून निरीक्षण केले. त्यात त्यांनी पाहिले की, माणूस पशुचीच नव्हे तर मानवाशीही अमानवीय वर्तन करतो. पोटापाण्याचा प्रश्न हा नेहमीच प्रत्येक मानसापुढे आ–वासून उभा असतो.[57] भुकेलेल्या

मनुष्यास धम्माविषयी काय जाणीव होणार म्हणून बुद्धानी भुकेस सर्वात मोठा रोग मानले आहे.

## भूख विषयक विचार

"एक दिवस आलविस गावी एका शेतकऱ्याचा बैल हरविला. खूप शोध घेतल्यावर त्याला बैल सापडला. त्याने त्या बैलास घरी बांधून ठेवले व काहीच न खाता–पिता तो शेतकरी गौतम बुद्धाचा उपदेश ऐकण्यास गेला. परंतु पोटात भुकेने थैमान घातले असताना उपदेशाकडे त्याचे लक्ष लागेना. बुद्धाने ते जानले व एका भिक्खूला त्या माणसाला भोजन देण्यास सांगितले. भोजनानंतर त्या माणसाने शांतचित्ताने धम्मश्रवण केले."[58]

'खुद्दकपाठा'तही गौतम बुद्धाने मानवी जीवनामध्ये भोजनास महत्त्व दिले आहे. सर्व प्राणिमात्र जीवितासाठी भोजनावरच अवलंबून असतात. बुद्ध म्हणतात की, "ज्याच्या शारीरिक बळाचा ऱ्हास होतो, जो भूख आणि तहानेने परेशान आहे अशा व्यक्तींना नवीन ज्ञान प्राप्त होत नाही." अन्न ही प्राथमिक गरज कमविण्याकरिता स्वतःच्या उपजीविकेचे काही ना काही साधन असणे गरजेचे असते.

## दारिद्र्य विषयक विचार

दारिद्र्यात धन्यता मानावी असे बुद्धाने कधीही म्हटले नाही. दारिद्र्य हे जीवनाचे सौभाग्य आहे आणि दारिद्रींना तुम्ही पृथ्वीचे उत्तराधिकारी व्हाल असेही म्हटले नाही.[59] याविपरीत ऐश्वर्य संपन्न व्हा असेच म्हटले आहे. जीवनात दारिद्र्यता आणि कर्ज सर्वात मोठे दुःख होय असे बुद्ध म्हणतात.[60] बुद्धाचा आग्रह होता की धनसंपदा पाप्तीचे प्रयत्न हे विनयशासीत असले पाहिजेत.

विषमतायुक्त समाजाचा बुद्धाने निषेध केला व प्रत्येकाने काही ना काही उद्योग करून आपले दारिद्र्य घालवावे असे सांगितले. बुद्ध म्हणतात आळस हा दारिद्र्याचे सर्वात मोठे कारण होय. दारिद्र्याचे आणखी एक कारण म्हणजे धनाचा

याग्य तऱ्हेने वापर न करने होय. आपल्या मिळकतीचा काही भाग संकट काळाकरिता संग्रहीत करावा त्यामुळे ऐनवेळी कर्ज काढावे लागणार नाही, असे बुद्ध सांगतात.

अनाथपिंडक जेव्हा बुद्धाला प्रश्न विचारतात की, "कृपया सांगावे की कोणती गोष्ट गृहस्थाला अनुकूल आणि ती प्राप्त करणे कठीन आहे. गौतम बुद्ध यावर उत्तर देताना सांगतात की, अशा गोष्टीत न्यायपूर्वक धन प्राप्त करणे पहिली गोष्ट होय. दुसरी गोष्ट म्हणजे त्याच्या नातेवाईकाने सुद्धा न्यायपूर्वक धन प्राप्त करणे होय."[61]

विषम व्यवस्थेवर उपाय म्हणून बुद्धाने 'सार्वजनिकस्वामीत्व' ह्या संकल्पनेवर भर दिला. बुद्धाने सर्वसामान्य माणसाला समजेल अशी सोपी भाषा व व्यवहारिक उदाहरणे देवून आपले तत्त्व मांडले आहे. बुद्धाचे समाजोपयोगी विचार निव्वळ वाचून किंवा ऐकून काहीच होणार नाही तर ते प्रत्यक्ष आचरणात आणले तर त्यांची योग्यता सिद्ध होईल.

**समाजवाद**

बुद्धाने वेद आणि ब्राम्हणे यांच्या तत्त्वज्ञानाला तीव्र विरोध केला होता. बुद्धाने वेदाचा विरोध केला कारण वेद वाळवंटासारखे ओसाड आहे. वेदामुळे सामाजिक मूल्ये निर्माण होण्यास बाधा येते. बुद्धाच्या मते विचार स्वातंत्र्य ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. आणि सत्य शोधून काढण्याचा विचार स्वातंत्र्य हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे वेद हे अपौरुषेय आहेत, असे मानणे याचा अर्थ विचार स्वातंत्र्याला संपूर्ण नकार देणे होय.[62]

ब्राम्हणी समाजरचना बुद्धाला नैसर्गिक वाटली नाही. ती विशिष्ट समाजाचे हित बाळगणारी होती. बुद्धाला मुक्त आणि स्वतंत्र समाजव्यवस्था अभिप्रेत होती. ब्राम्हणी समाजरचनेत विषमता ही वर्गवार विषमता होती. त्यात चढत्याप्रमाणात द्वेष आणि उतरत्या प्रमाणात तिरस्कार होता. बुद्धाने कोणत्याही काल्पनिक, दैवी, आत्मा, पुनर्जन्म या गोष्टींना प्राधान्य न देता

वास्तविकता, सत्य, सामाजिक समता, विचारस्वातंत्र्य, सर्वांचे हित इ. गोष्टींना महत्त्व दिले.

विषम समाजव्यवस्थेस विरोध करीत असतानाच बुद्धाने नवसमाजरचनेची कल्पना मांडली. नवीन समाजाबाबतची त्यांची कल्पना ही समाजाच्या सर्व स्तरातील लोकांच्या हिताची होती. एक असा नवा समाज ज्यात कुठेही दुःख वा अन्याय नाही; जेथे स्वातंत्र्य, समता व बंधुता मूल्याची जोपासना; ज्यात सदाचार, सहयोग व सद्‌भावना परस्परात प्रेम वाढवील. बुद्धाच्या संघात गरीब–श्रीमंत, स्त्री–पुरुष, ब्राम्हण–शूद्र असा भेदभाव नव्हता. तेथे हुकूमशाही नावाची राज्यव्यवस्थाही नव्हती.[63] सर्वानुमते निर्णयास प्राधान्य होते.

सामाजिक भेद किंवा विषमतेने उत्पन्न झालेले निर्बंध नाहीसे केले पाहिजे असे बुद्धाचे मत होते. त्याकरिता बुद्धाने खालील उपदेश केला.

१) माणसा–माणसात भेद करू नये :–

उच्च कुळात जन्म घेण्यापेक्षा उच्च आदर्श असणे महत्त्वाचे असते.
बुद्धाचा उपदेश होता की, “जसे दुसरे तसाच मी! जसे आम्ही तसेच दुसरे! या विचाराने दुसऱ्याशी एकरूप व्हा.” जाती, विषमता, उच्चता, कनिष्ठता हे भेदभाव करू नये,[64] सर्व सारखेच आहेत.

२) कर्मावरून मोठेपण ठरवावे :–

चातुर्वण्यामध्ये व्यक्तीचे मोठेपण जीतीतील जन्मावरून ठरते. बुद्धाने ह्या तत्त्वाला विरोध केला. बुद्ध उपदेश करतात की, माणसाचे मोठेपण हे त्याच्या जन्मावरून ठरवता कामा नये. तर ती व्यक्ती कसे कार्य करते, त्या कार्यावरून ती व्यक्ती लहान की मोठी हे ठरवायला पाहिजे.

३) समता निर्माण करणे :–

बुद्ध म्हणतात, विषमता हा स्वाभाविक नियम मानला तर दुबळ्यांना जीवन जगणे कठीन होईल. बद्ध उपदेश करतात की, "जो धर्म स्वतःच्या सुखाबरोबर दुसऱ्याच्याही सुखाची वाढ करण्याचा आणि कोणताही अत्याचार सहन न करण्याचा उपदेश करतो तो श्रेष्ठतम धर्म नव्हे काय?"[65] अशाप्रकारे बुद्धाने आपल्या धम्माद्वारे सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा पुरस्कार केला.

अशाप्रकारे समाजहीत जोपासणारे, सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा पुरस्कार करणारे बुद्ध हे जगातील पहिले समाजवादी, समातवादी विचारवंत होते. बुद्धाच्या वैचारिक कांतीला इतिहासात तोड नाही.

## संदर्भ – टीपा


1. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६.पृ. ३१
2. तत्रैव पृ. ३१
3. तत्रैव पृ. ३२
4. तत्रैव पृ. ३३
5. तत्रैव पृ. ३३
6. तत्रैव पृ. ३९
7. तत्रैव पृ. ३९
8. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४३१
9. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, अनु.डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन– भगवान बुद्ध और उनका धर्म, बुद्धभूमि प्रकाशन, नागपुर १९९७. पृ.३३४
10. भदन्त राहुल बोधी–आदर्श बौद्धांचो आचारसंहीता, भिक्खु संघाचे युनायटेड बुद्धिस्ट मिशन, मुंबई,१९९७. पृ.२०
11. तत्रैव पृ. २२
12. तत्रैव पृ. १८
13. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, अनु. प्रा.देवीदास घोडेस्वार– बुद्ध आणि त्यांचा धम्म, बुद्ध आणि त्यांचा धम्म सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, नागपूर, २००५. पृ. २१८
14. भदन्त राहुल बोधी–आदर्श बौद्धांची आचारसंहीता, भिक्खु संघाचे युनायटेड बुद्धिस्ट मिशन, मुंबई, १९९७. पृ. १३
15. डॉ.भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४१७
16. डॉ.परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १३८
17. तत्रैव पृ. १३८
18. तत्रैव पृ. १३९

19. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४१९
20. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन,वाराणसी. १९९६. पृ. १३९
21. तत्रैव पृ. १४०
22. तत्रैव पृ. १४१
23. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४२१
24 डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १४२
25. तत्रैव पृ. १४२
26. तत्रैव पृ. १४३
27. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४२४
28. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६.पृ. ३५
29. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १४७
30. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४२१
31. तत्रैव पृ. ४४०
32. तत्रैव पृ. ४३६
33. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १५४
34. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४३६
35. तत्रैव पृ. ४३८
36. तत्रैव पृ. ४३९
37. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १४६
38. तत्रैव पृ. १४८

39. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४३५
40. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १५०
41. तत्रैव पृ. १५१
42. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४४६
43. डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६. पृ. १५२
44. डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१. पृ. ४५१
45. तत्रैव पृ. ४५२
46. तत्रैव पृ. ४५५
47. तत्रैव पृ. ४६०
48. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. ४०
49. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, अन. प्रा.देवीदास घोडेस्वार– बुद्ध आणि त्यांचा धम्म, बुद्ध आणि त्यांचा धम्म सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, नागपूर, २००५. पृ. २७३
50. भदन्त राहुल बोधी–आदर्श बौद्धांची आचारसंहीता, भिक्खु संघाचे युनायटेड बुद्धिस्ट मिशन, मुंबई, १९९७. पृ. २६
51. आर. एस. सोनवणे– धम्मनिनाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५. पृ.४८
52. डॉ. भदन्त सावंगी मेधंकर– पालि वाङःमय मे बोधिसत्व सिद्धांत, बुद्ध भुमि प्रकाशन नागपूर १९९२. पृ. १४९
53. भदन्त राहुल बोधी–आदर्श बौद्धांचो आचारसंहीता, भिक्खु संघाचे युनायटेड बुद्धिस्ट मिशन, मुंबई, १९९७. पृ. ७८
54. आर. एस. सोनवणे– धम्मनिनाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५. पृ.४९

55. भदन्त राहुल बोधी–आदर्श बौद्धांचो आचारसंहीता, भिक्खु संघाचे युनायटेड बुद्धिस्ट मिशन, मुंबई, १९९७. पृ. ८०
56. आर. एस. सोनवणे– धम्मनिनाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५. पृ.५०
57. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. ४८
58. तत्रैव पृ. ४९
59. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, अनु.डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन– भगवान बुद्ध और उनका धर्म, बुद्धभूमि प्रकाशन, नागपुर १९९७. पृ. ३६१
60. तत्रैव पृ. ३९९
61. तत्रैव पृ. ३६१
62. डॉ.प्रदीप आगलावे– समाजशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१. पृ. ३६
63. डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६. पृ. ८९
64. डॉ. प्रदीप आगलावे– समाजशास्त्रज्ञ डॉ.आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१. पृ. ३८
65. तत्रैव पृ. ३९

2

# डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारतमातेचे एक महान सुपुत्र. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ते सर्वज्ञात आहेत. कायदेशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्रापासून ते मानववंशशास्त्र आणि तुलनात्मक धर्मशास्त्र अशा भिन्न–भिन्न ज्ञान शाखामध्ये भराऱ्या घेऊन त्यांनी त्यामध्ये मोलाची भर घतली आणि त्याला विद्वन्मान्यताही मिळाली. एक महान समाजसुधारक, मानवी हक्कांचे कैवारी, पददलितांचे उद्धारकर्ते, शिक्षणतज्ञ, सांसद आणि पत्रकार म्हणूनही त्यांना जगन्मान्यता मिळाली.[1] त्यांच्या बहुविध व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वपूर्ण अंग मात्र दुर्दैवाने दुर्लक्षित राहिले – ते म्हणजे त्यांनी अर्थतज्ज्ञ म्हणून बजावलेली विलक्षण कामगिरी.

डॉ. आंबेडकर अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी आर्थिक विषयावरील शेकडो ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. डॉ. आंबेडकर खरोखर अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातून एम.ए. १९१५ साली आणि १९१७ साली पीएच. डी. ह्या पदव्या अर्थशास्त्र विषयातून घेतल्या. १९२१ साली 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'या विख्यात शिक्षण संस्थेत्‍न 'डॉक्टर ऑफ सायन्स'ही पदवी अर्थशास्त्रातील संशोधनाबद्दलच मिळाली. मुंबई येथील 'सिडनहॅम' कॉलेजमध्ये १९१८ ते १९२० या दरम्यान ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते.[2] जागतिक स्तरावरील अर्थशास्त्राचे प्रोफेसर सेलीग्मन आणि कॅन्नन यांच्याशी त्यांनी अर्थशास्त्रावर अनेकदा चर्चा केली.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात शासनाला वेळोवेळी सादर केलेलया निवेदनातून, तसेच अनेक आयोगापुढे त्यांनी दिलेल्या साक्षीतून भारतीय अर्थकारणाच्या समस्यांबाबतचा त्यांचा अभ्यास व ज्ञान दिसून येते. त्यांची भाषणे आर्थिक विचारांनी ओतप्रोत भरलेली आहत. अस्पृश्यता

आणि जातिव्यवस्थेच्या आर्थिक पैलूवर भर टाकणारे ते देशातील पहिले अभ्यासक होते. भारतीय राज्यघटनेमध्ये आर्थिक आणि वित्तीय तरतुदींचा अंतर्भाव करण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. डॉ. आंबेडकर अर्थशास्त्राचे संशोधक आणि अभ्यासक असल्यामुळे त्यांच्या आर्थिक विचारांना अर्थशास्त्रीय पार्श्वभूमी आहे. डॉ. आंबेडकरांचे अर्थिक विचार हे केवळ तात्कालीन स्वरूपाचे नाहीत, त्यांच्या अर्थिक विचारांना वैश्विक महत्त्व आहे.

अर्थशास्त्रावर डॉ. आंबेडकरांनी तीन विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले.

१) ईस्ट इंडिया कंपनी : प्रशासन आणि अर्थनीती.

२) ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती.

३) रुपयाचा प्रश्न – उद्गम आणि उपाय.

पहिल्या दोन पुस्तकात त्यांनी सार्वजनिक वित्त या अर्थशास्त्राच्या पोटशाखेत मोलाची भर घतली आहे. तिसरे पुस्तक मौद्रिक अर्थशास्त्रात भर टाकणारे आहे.

भारतात दादाभाई नौरोजी आणि न्यायमूर्ती रानडे या नेत्यांचा देशसेवक म्हणून गौरव झालाच परंतू अर्थतज्ञ म्हणूनही मान्यता मिळाली. दुर्दैवाने डॉ. आंबेडकरांना ते भाग्य लाभले नाही. भारतीय समाजाने डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर तर अन्याय केलाच, परंतु स्वतःचेच अपरिमीत नुकसान करून घेतले.[3] डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन हे संपूर्ण भारतदेशाला समोर ठेवून करण्यात आलेले आहे. कोणत्याही एका वर्गापुरते ते सिमीत नाही आणि म्हणूनच दलितांचे नेते असा त्यांच्यावर शिक्का मारून त्यांच्या विचारधनापासून इतर सर्व भारतीय समाजाने दूर राहणे हा त्या राष्ट्रपुरुषाचा अवमानच आहे.

डॉ. आंबेडकरांनी आपले आर्थिक चिंतन हिंदू समाज व्यवस्थेच्या विषमतेवर मात करण्यासाठी व सामाजिक समता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने व त्याद्वारे देशाचा आर्थिक विकास कसा होईल यावर चिंतन करून आपला आर्थिक कार्यक्रम राज्य समाजवादाच्या रूपाने या देशाला दिला होता. डॉ. आंबेडकरांनी

आर्थिक बाबतीत राष्ट्रवादी भूमिका घेवून आर्थिक परिवर्तनास सामाजिक समतेचा आधार व जातिभेदावर प्रहार केला. त्यांनी ग्रामीण जीवनाचे उदात्तीकरण केले नाही आणि आधुनिक उद्योगाचे महत्त्व ते मान्य करीत. दलित समाजाच्या स्वावलंबनासाठी ग्रामोद्योगाची उपयुक्तता ते मान्य करीत.

डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार चार स्वरूपात आढळून येतात.

१) प्रबंधलेखन.

२) लेख आणि भाषणे.

३) कमिशनच्या साक्षी आणि जाहिरनामे.

४) विधेयके.

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारामागे गौतम बुद्धाच्या धम्माची पार्श्वभूमी दिसून येते. 'बुद्ध की कार्ल मार्क्स' या निबंधात मार्क्सवादाची बुद्धिनिष्ठ आलोचना करून बुद्धाच्या लोकशाहीचा स्वीकार त्यांनी केला.[4] बुद्धाचा धम्म समतेवर आधारित होता. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही बुद्ध तत्त्वे पाळून डॉ. आंबेडकरांनी आपले तत्त्वज्ञान उभे केले ते समाजात आर्थिक आणि सामाजिक समता प्रस्थापित व्हावी म्हणून.

## शेतीविषयक विचार

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असूनही बहुसंख्य जनतेचे उपजीविकेचे साधन होऊ शकला नाही. भारतीय लोकसंख्येच्या एकतृतीयांश लोकसंख्या पोसण्याची क्षमता भारतीय शेतीत असूनही शेतीची प्रगती होऊ शकली नाही. डॉ. आंबेडकरप्रणित आर्थिक विचारात भूसुधारणा, भूमीचे अपखंडन आणि विभाजनाचे मुद्दे महत्त्वाचे आहेत. भारतीय शेतीच्या बाबतीत निर्माण समस्यांच्या निराकरणार्थ डॉ. आंबेडकरांनी भूमीचे एकत्रीकरण, सामुहिक शेती सारखे उपाय सांगितले.

डॉ. आंबेडकरांनी शेतीशी निगडित असलेले प्रश्न सोडविण्यासाठी शेतीचे राष्ट्रीयिकरण करावे यावर भर दिला होता. शेतीचे राष्ट्रीयीकरणातून आर्थिक गुलामगिरी नष्ट होऊन आर्थिक दृष्ट्या कल्याणकारी राज्य निर्मितीस मदत होईल.

सामुदायीक शेतीचा प्रयोग प्रत्यक्षात आणला तर त्यामुळे शेतीक्षेत्रातील उत्पादकता वाढण्यास मदत होईल. श्रमीक शेतमजूर यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होऊन त्यांचा आर्थिक विकास होईल. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावून त्यांना आर्थिक सुदृढता प्राप्त होईल.[5] वरील सर्व विचार महत्त्वाचे असून देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रकाश पाडणारे आहेत.

शेतीचे औद्योगिकरण केल्याशिवाय भूमीहीन मजुरांचा प्रश्न मूलतःसुटणार नाही असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. शेतीपासून उद्योगधंद्यांची फारकत होणे हे अर्थव्यवस्थेला धोकादायक असते. पण शेती बरोबर शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढविले तरच शेतकऱ्यांचा प्रश्न सूटेल. औद्योगिकरण विशेषतः ग्रामीण भागातील औद्योगिकरण त्याच प्रमाणे सुधारीत शेती यांचा उपयोग देशातील कामगारांना काम देण्यात होईल असे डॉ. आंबेडकरांना नेहमी वाटत होते.

## भूमीचे एकत्रीकरण

भारतीय शेतीच्या प्रश्नावर डॉ. आंबेडकरांचा १९१८ च्या 'जर्नल ऑफ इंडियन एकॉनामिक सोसायटी' च्या नियतकालिकात 'भारतातील लहान धारणक्षेत्र आणि त्यावरील उपाय' हा लेख प्रसिद्ध झाला.[6] भारतीय शेतीची धारणक्षेत्र लहानच नाही तर ती वेगवेगळ्या ठिकाणी विखुरली आहे. त्यामुळे एकत्रीकरणची समस्या अधिक बिकट झाली असल्याचे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

डॉ. आंबेडकरांचा भारतीय शेती कशा प्रकारची आहे, त्यामधून कोणत्या प्रकारचे पीक घ्यावे, ते किती घ्यावे, जमीन धारणा कशी असावी, भाडेपट्ट्याने घेतलेल्या जमिनीचा काळ किती असावा, उत्पादन घटकाचे एकमेकांशी प्रमाण किती असावे?[7] याबाबत चिकित्सक अभ्यास करून असे निदर्शनास आणून दिले की, अल्पभूधारणेमुळे शेती व्यवसायाला आणि शेतकऱ्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, असे डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन केले.

डॉ. आंबेडकर जमिनीच्या एकत्रीकरणाविषयी सांगताना म्हणतात, वारसा हक्काचा कायदा शेतीवर वारसाचा हक्कच प्रस्थापित करीत नाही तर जमिनीचे कितीही लहान लहान तुकडे होवोत, वारसाला त्याच्या हक्काप्रमाणे जमीन मिळालीच पाहिजे, अशी तरतुद आहे आणि यामुळेच जमिनीचे लहान लहान तुकडे होवून निरनिराळ्या भागामध्ये विखुरली गेली आहे.

जमिनीच्या एकत्रीकरणाविषयी उपाय सांगताना डॉ. आंबेडकर खालील मुद्दे सुचवितात.

१) स्वयंस्फूर्तीने जमिनीची देवाणघेवाण अथवा खरेदी विक्री करावी.

२) लहान तुकडे होत असतील अशा जमिनीच्या विक्रीवर बंधने घालावित.

३) शेजारच्या शेतकऱ्याची जमीन विकत घण्याचा अधिकार शेजारच्या शेतकऱ्यांनाच असावा.

४) शेतीचे सक्तीने एकत्रीकरण करावे.

वरील जमिनीच्या एकत्रीकरणाविषयी उपाय सुचवितांना डॉ. आंबेडकरांनी 'आर्थिक गट' महत्त्वाचा मानला होता.[8] ज्यामुळे जमीन किफायतशीर धारणा एवढी होईल. डॉ. आंबेडकरांच्या मते ''कमाल धारणा म्हणजे एका कुटुंबाला संपूर्ण रोजगार उपलब्ध करून देऊन त्या कुटुंबाची उपजीविका भागऊ शकेल एवढा जमिनीचा हिस्सा होय.''[9] ही बाब लक्षात घेऊन जमिनीचे एकत्रीकरण करावे असे सुचवले होते.

'बडोदा समिती'ने जमिनीच्या एकत्रीकरणाविषयी शिफारस केली होती की, एखाद्या भागातील अर्ध्यापेक्षा जास्त शेतकरी जोपर्यंत या एकत्रीकरणाला प्रतिसाद देत नाही तोपर्यंत शासनाने जमिनीच्या एकत्रीकरणाला सक्ती करू नये. डॉ. आंबेडकरांच्या मते जमिनीच्या एकत्रीकरणाचे प्रयत्न अशाच पद्धतीने करायला हवे की, जी पद्धत शास्त्रोक्त असेल आणि त्याच पद्धतीचा पुढे कायदा संमत करून जमिनीचे एकत्रीकरण घडवून आणावे.[10]

डॉ. आंबेडकरांच्या मते किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे जमीन, भांडवल व श्रम हे सर्व उत्पादक घटक इष्टतम प्रमाणात

उपलब्ध असणे होय. कारण तसे झाले तरच एक उत्पादक घटक इतर घटकाच्या सहाय्याने अधिकतम योगदान करू शकतो. धारणक्षत्राचा आकार मोठा करणे ह्या समस्येसोबतच भांडवल आणि तत्सम साधनसामुग्रीची उपलब्धता वाढविणे ही देखील मोठी समस्या आहे.[11] शेतीकरिता भांडवलाचा तुटवडा होत असल्याने मशागत करताना श्रमाचा अवाजवी उपयोग करणे अपरिहार्य होऊन बसते.

विसाव्या शतकापासून भारतात शतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जवळ जवळ तीनचतुर्थांश आहे. भारतीयांचा शेती मुख्य व्यवसाय असल्याने जमिनीची उत्पादकता वाढविण्याकरिता जमिनीचा आकार किफायतशीर क्षेत्रापेक्षा कमी असून चालणार नाही. जमिनीचा आकार लहान असल्याने जमिनीची उत्पादकता कमी होते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

भारतीय शेती विविध तुकड्यात विभागली गेल्याने जमिनीची उत्पादकता कमी झाली त्यासाठी सामुदायिक शेती करण्याचा आग्रह डॉ. आंबेडकरांचा होता. परंतु त्यासाठी खोती पद्धती, महार वतने, जुडी कर पद्धतीचा नायनाट करणे आवश्यक होते.[12] ही खोती पद्धत जमिनीच्या लहान–लहान तुकड्यांशी संबंधित होती.

## खोती पद्धती

कोकनातील रत्नागिरी, कुलाबा आणि ठाणे जिल्ह्यात त्यावेळी खोती पद्धत रूढ होती. कुळे आणि सरकार याच्यातील खोत हा मध्यस्थ होता. खोती पद्धतीखालील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती वाईट होती. खोत्यांच्या खोती अधिकाराखालील जमिनी शेतकरी कसायचे व त्या बदल्यात खोतांना जमीन महसूल देत या महसुलातील काही भाग खोत शासनाकडे जमा करीत. ही शुद्ध पिळवणूक होती. खोती पद्धतीखाली येणाऱ्या शेतकऱ्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांना खोताकडून पिढ्यानपिढ्या वेठबिगारीची वागणूक मिळत असे. खोती पद्धतीत शेतकऱ्यांवर कराचा बोजा अधिक पडायचा. कुळाने पैसे भरले

म्हणजे रीतसर पावती भरायची नाही, असा खोतांचा बाणा असल्यामुळे कुळांची शेंडी नेहमी खोतांच्या हातात राहायची.

महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे १४ एप्रिल १९१९ सालो भरलेल्या शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद डॉ. आंबेडकरांनी भूषविले होते. आपल्या भाषणातून त्यांनी पहिली तोफ खोती पद्धतीविरुद्ध डागली. शेतकऱ्यांना उद्‌देशून ते म्हणाले की, "तुमची गऱ्हानी मला माहीत आहेत, खोती पद्धती तुमचे रक्त पित आहे. जमीनधारणेची ही पद्धत माहोत केली पाहिजे ज्यामुळे तुम्हाला शांतता आणि प्रगतीचा लाभ होईल. खोती पद्धती नष्ट करतील अशीच माणसे तुम्ही विधिमंडळात पाठविली पाहिजे."[13]

खोती पद्धती विरुद्ध सामाजिक चळवळ उभारून दुहेरी हल्ला चढविणारे डॉ. आंबेडकर पहिलेच लोकप्रतिनिधी होते. डॉ. आंबेडकरांचो कार्यपद्धती खलील प्रमाणे होती.

१) डॉ. आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ ला खोती पद्धती नष्ट करण्यासबंधी विधेयक मुंबई विधिमंडळात सादर केला.

२) गरीब शेतकऱ्यांना इ.स. १८७९ च्या जमीन महसूल अधिनियमनाप्रमाणे वहिवाटदार म्हणून घोषीत करून रयतवारी पद्धत सुरू करण्याकरिता विधेयक सादर केले.

३) १० जानेवारी १९३८ रोजी डॉ. आंबेडकरांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळावर शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा नेला होता.

४) १४ मे १९३९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील 'कठानवली' येथे दलितांच्या परिषदेत खोती पद्धती विरुद्ध बोलताना दलितांना गुलामगिरीत्‌न मुक्त करण्याच्या आपल्या निर्धाराचा पुन्हा उच्चार केला.[14]

लोकनियुक्त मंत्रिमंडळाने सामुदायिक राजिनामे दिल्याने खोतीनिर्मुलनावर चर्चा होऊ शकली नाही. पण डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेली जागृती विझने शक्य नव्हते त्याचाच शेवट म्हणजे १९४९ मध्ये खोती निर्मुलनाचे उद्दिष्ट साध्य करता आले.

**महारवतने**

पूर्वी महाराष्ट्र आणि इतरही राज्यात वतनदारी पद्धत होती. वतनाच्या या पद्धतीमुळे गावातील अतिशय निकृष्ट प्रकारचे काम अस्पृश्यांना रात्रंदिवस करावे लागे. महाराष्ट्रात ‘महार लोक’ वतनाचे काम करायचे म्हणून यास ‘महारवतन’ असे नाव पडले.[15] वंशपरंपरागत सेवा कायद्यान्वये निम्न स्तरीय शासकीय कर्मचारी असलेले महार कुठल्याही शासकीय कामासाठी अष्टप्रहर फुकटात राबवून घेतले जात. प्रत्यक्ष महार कर्मचारी अनुपस्थित असेल तर त्याच्या ऐवजी त्याच्या कुटुंबावर कामे करण्याची सक्ती केली जाई.

मृत प्राण्याच्या शरीराची विल्हेवाट लावण्यापासून ते सरकारी अंमलदारांच्या टांग्यामागोमाग एका ठिकानाहून दुसऱ्या ठिकानापर्यंत धावत जाणे या दुष्कर व अविश्रांत कामाचा मोबदला म्हणून महारांपुढे जमिनीचा
एक तुकडा फेकला जाई, यालाच ‘वतन’ असे म्हणत.[16]

सन १८७४ च्या वतन ॲक्टमध्ये– कोणतीही वतनी मालमिळकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा व त्यासबंधीचे हक्क आणि अधिकार हे मिळून वतन होते.[17] वतन या शब्दामध्ये दोन गोष्टींचा समावेश होतो. १) वंशपरंपरेचा हुद्दा २) वतनी मालमिळकत (जमीन).

महारांना वतनाच्या जमिनी राजांनी इनाम म्हणून दिलेल्या होत्या आणि महार अगदी तुटपुंज्या साधनाद्वारे शेती करायचे. महारांना गावकऱ्यांकडून धान्य घेण्याचा अधिकार होता. त्या मोबदल्यात महार वतनदारांना गावकऱ्यांनी सांगितलेले कोणतेही काम निमुटपणे रात्रंदिवस करावे लागे. वतनदारीमुळे महारांचा स्वाभिमान नष्ट झाला होता. या गुलामीच्या परिस्थितीतून बाहेर पडावे असे कधी त्यांना वाटत नव्हते.[18] डॉ. आंबेडकरांच्या मते, या वतनामुळे महार हे भिकारी झालेत. या वतनदारांना जमीनदारांच्या तालावर नाचावे लागत होते.

डॉ. आंबेडकरांनी या बेड्या तोडून टाकण्याचे उत्तरदायित्व स्वीकारले. स्वतःच्या ‘बहिष्कृत भारत’ या

साप्ताहिकात २ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर १९२८ या काळात महार वतनावर त्यांनी विचार प्रक्षोभक लेखांची मालिका प्रसिद्ध केली. १९ मार्च १९२८ रोजी मुंबईच्या प्रांतिक विधिमंडळात १८७४ च्या वंशपरंपरागत सेवा नियमात सुधारणा सुचविणारे पहिले विधेयक डॉ. आंबेडकरांनी मांडले.[19]

डॉ. आंबडकरांनी लोकांना उपदेश केला की, वतने सोडून द्या. वतने नष्ट करणारा कायदा करण्यासाठी लोकांनी शासनावर दबाव आणावा. त्यांनी पुढे सुचविले की, जर शासनाची इच्छा असेल की लोकांनी शासनासाठी काम करावे. तर महारांना पगार देण्याची जबाबदारी स्वतः शासनाने घ्यावी. महार वतन नष्ट करण्यासबंधीचे दुसरे विधेयक डॉ. आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ मध्ये मांडले.[20]

डॉ. आंबेडकर आणि त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने केलेल्या प्रयत्नांमुळे शासनाने वतनधारक महारांच्या सेवाशर्ती निश्चित केल्या. अखेर
वतनाची पद्धत 'बॉम्बे इफिरियर व्हिलेज वतन्स ॲबॉलिशन ॲक्ट १९५९' अन्वये रद्द करण्यात आला.

४.१.१.४ : सामुहिक शेती

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक संबंधाचा अभ्यास सूक्ष्म आणि वैज्ञानिक असा होता. भारतीय शेतीच्या बाबतीत अनेक गावांचा त्यांनी अभ्यास केला होता. शेतीपासून मिळाणारे कमी उत्पन्न, येणारा खर्च, शेतमजुरांचा प्रश्न, बेकारी इ. दृष्टिकोणातून दिसून येते. डॉ. आंबेडकर ग्रामीण क्षेत्रालाच समाजवादी कांतीचा आधार मानत असत. शेती ही राष्ट्रीय संपत्ती आहे. केवळ पोट भरण्याचे साधन म्हणून शेतीकडे पाहणे सोडले पाहिजे. आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून शेतीचा विचार केला पाहिजे याकडे डॉ. आंबेडकरांनी आपले आर्थिक विचार प्रकट करतांना संपूर्ण समाजाचे हित बाळगले.

गौतम बुद्धाच्या 'ग्रामकृषी' या सामुहिक शेतीच्या संकल्पने प्रमाणेच सामाजिक, आर्थिक अमूलाग्र बदलाकरिता डॉ. आंबेडकरांनी सामुहिक शेतीचे समर्थन केले होते. रशियन

धर्तीवर परंतु भारतीय पद्धतीने शेती व्हावी असा त्यांचा विचार होता.

डॉ. आंबेडकरांनी सामुहिक शेतीच्या माध्यमातून शेती क्षेत्रात कांती घडून येईल, हे स्पष्ट करण्याकरिता खालील मुद्दे मांडले.

१) सामुहिक शेतीमुळे भूमीची मालकी नष्ट होईल.

२) सामुहिक शेतीमुळे कुणीही भूस्वामी राहणार नाही.

३) सामुहिक शेतीच्या माध्यमातून सर्व शेतकरी एकत्र शेती करतील.

४) सामुहिक शेतीमुळे जमीन कसण्याकरिता जमिनीचे हिस्से वाटप होतील.

५) सामुहिक शेतीमुळे जातिव्यवस्था आणि आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.[21]

वरील सर्व गोष्टीसाठी डॉ. आंबेडकरांनी आपल्या राजकीय पक्षाच्या वतीने संविधान समितीला सादर प्रबंधात विस्तारपूर्वक विवेचन केले.

भारतीय शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून डॉ. आंबेडकरांनी सामुहिक शेतीचा पुरस्कार केलेला दिसतो. विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्राच्या समस्येवर डॉ. आंबेडकर सामुहिक शेतीचा उपाय सांगतात. ते म्हणतात सामुहिक शेतीच्याद्वारे छोट्या शेतकऱ्यांना विनाशापासून वाचविता येईल. सामुहिक शेतीमुळे शेतकऱ्यांचा मालकी हक्क अबाधित राहील परंतु लागून असलेल्या धारणक्षेत्राला जोडल्याशिवाय त्याला आपले धारणक्षेत्र कसण्याची मुभा असणार नाही.[22] अशा तरतुदीमुळे शेतीचे लागवडीचे क्षेत्र वाढण्यास मदत होईल.

डॉ.आंबेडकरांनुसार शासनसंस्थेच्या हस्तक्षेपापासून स्वातंत्र्य हे खाजगी हुकूमशाही होय. त्यामुळेच शेती हा शासकीय उद्योग असावा असे त्यांचे मत होते. शासनाने सर्व शेतजमीन ताब्यात घेऊन (नुकसान भरपाई देऊन) तिचे ठराविक आकाराचे हिस्से करून गावातील रहिवाश्यांना खालील अटींवर कसण्याकरिता द्यावी.

१) सामुहिक शेती बाबत शासनाच्या अधिनियमनानुसार शेत कसण्यात यावे.
२) जात व तत्सम गोष्टीला महत्त्व न देता सर्वांना सामुहिक शेतीत समावून घ्यावे.

शेती उत्पादनातून शासनाला योग्य हिस्सा देऊन उरलेले उत्पादन जमीन कसणाऱ्यांनी आप–आपसात वाटून घ्यावे. याबाबत शासनाला काही अधिकार असतील.
१) शेतसारा घेणे, कर बसविणे.
२) सामुहिक शेतीच्या अटी भंग करणाऱ्यास शिक्षा करणे.[23]

डॉ. आंबेडकरांनी सामुहिक शेतीच्या माध्यमातून देशाला पुन्हा सहकाराची शिकवण दिली. गौतम बुद्धाच्या काळात शेतीला राष्ट्रीय महत्त्वाचे कार्य समजले जायचे आणि ग्रामकृषी केली जायची. राज्याची जमीन सर्व लोक मिळून कसायचे. डॉ. आंबेडकरांनी सुद्धा सरकारच्या अधिपत्याखाली सामुहिक शेती करण्यावर भर दिलेला आहे. बुद्धकाळात शेती हाच मुख्य व्यवसाय होता जो आजही आहे. डॉ. आंबेडकरांनी महार वतन आणि खोती पद्धतीपासून समाजाला होणाऱ्या त्रासातून मुक्तता मिळवून दिली. डॉ. आंबेडकरांचे कृषीविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत.

## लोकसंख्येविषयी विचार

बुद्ध काळात वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न नव्हता तरीसुद्धा बुद्धाने संघात प्रवेश करणाऱ्या भिक्खु वर्गासाठी संसार करणे आणि लैंगिक संबंध वर्ज्य ठेवले होते त्यामुळेच नव्याने मोठ्या प्रमाणत निर्माण होणारा भिक्खु वर्ग संसार करीत नसल्याने लोकसंख्या संतुलन आणि मानवीकल्याण साधल्या गेले. परंतु डॉ. आंबेडकरांच्या काळात ही परिस्थिती नव्हती म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपल्या आर्थिक विचारात दोन गोष्टींवर अधिक भर दिल्याचे दिसून येते. त्यांनी इ.स. १९३८ मध्ये जनसंख्या नियंत्रणावर भर दिला तर १९४३ मध्ये औद्योगिकरणावर भर दिला होता.[24] समकालीन राजकीय पुढाऱ्यापैकी डॉ. आंबेडकर असे एकमेव पुढारी होते की ज्यांनी कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाचा

धीरगंभीरपणे अभ्यास केला होता. त्यांचे विश्लेषण तर्कावर आधारित शास्त्रीय आणि व्यवहारवादी दृष्टिकोणातून होते. लोकसंख्या नियंत्रणाच्या संदर्भात त्यांचे विचार प्रतिगामी आणि दूरदृष्टीचे होते.

अर्थव्यवस्थेचा लोकजीवनाशी अतूट सबंध असावा असे डॉ. आंबेडकरांचे मत दिसून येते शिवाय त्यांच्या लिखानातून लोकसंख्या वाढीचा प्रश्न सुटलेला नाही. डॉ. आंबेडकर म्हणतात की, “लोकसंख्येच्या अतिरिक्त वाढीमुळे बरीचशी जमीन, जंगल आणि चराऊ कुरणे ही लागवडीखाली आणली गेली आहेत म्हणून शेतीला उपयुक्त गुरे आणि शेतीव्यवस्था सुधारणे कठीन होत चालले आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी संततीनियमनाद्वारे लोकसंख्या नियंत्रणावर एकांगी भर न देता दारिद्र्य निवारणही घडवून आणले पाहिज.”[25]

डॉ. आंबेडकर संतती नियमनाचे जोरदारपणे समर्थन करणारे एकमेव पुढारी होते. १० नोव्हेबर १९३८ ला संततीनियमनाबाबत एक बिनसरकारी ठराव त्यांनी मांडला होता. त्या ठरानुसार “कुटुंब मर्यादित करण्याची तातडीची गरज लक्षात घेता आपल्या प्रांतातील जनतेत संतती नियमनाबाबत एक अत्यंत प्रभावी असा प्रचार करणे अगत्याचे आहे आणि असे नियमन प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आवश्यक त्या सोयीसवलतीही उपलब्ध करणे गरजेचे आहे.”[26] विधिमंडळात या विधेयकास कडाडून विरोध करण्यात आला. तत्कालीन महसूल मंत्री मोरारजी देसाई यांनी विरोध करून आत्मसंयमाने संतती नियमन करता येते तेव्हा या विधेयकाची गरज नसल्याचे सांगितले. डॉ. आंबेडकरांचा ठराव ५२ विरुद्ध ११ मतांनी फेटाळण्यात आला.

जन्मदर नियंत्रित करण्याचा विचार राष्ट्राने स्वीकारावा त्यात मानवकल्याणाचा विचार आहे. डॉ. आंबेडकरांनी मानवकल्यानाचा विचार मांडला होता आणि तो जन्मदर नियंत्रित ठेवल्याने होणार होता. डॉ. आंबेडकरांच्या मनात सुद्धा आपले राष्ट्र स्वतंत्र व्हावे, राष्ट्राची स्वतंत्र घटना असावी आणि अशा लोकशाहीवर निष्ठा ठेवणाऱ्या देशात लोकांनी स्वतःच

जन्मदर नियंत्रित करण्याचा विचार आत्मसात करावा अशी ईच्छा होती. डॉ. आंबडकरांच्या मते –

१) जन्मदर नियंत्रणाची समस्या दारिद्र्याशी जुळली आहे.

२) जन्मदर नियंत्रणाची समस्या कुटुंबाच्या व समाजाच्या नीतिमत्तेशी जुळलेली आहे.

३) जन्मदर नियंत्रणाची समस्या समाजाच्या आर्थिक संपन्नतेशी जुळलेली आहे.

४) जन्मदर नियंत्रणाची समस्या निरनिराळ्या समाजात तनाव निर्माण होण्याचे कारण आहे.[27]

वरील चार दृष्टिकोणातून डॉ. आंबेडकरांनी विषयाची मांडणी केली आहे.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, जरी आमच्या देशातील जनता निरक्षर आणि अज्ञानी असली तरी आपले हित कशात आहे हे त्यांना चांगल्या प्रकारे समजते. म्हणून त्यांना कुटुंबनियोजनाच्या उपायाची जाणीव झाली तर ते जरूर त्याचा वापर करतील याबद्दल मला शंका वाटत नाही. नसबंधीची शस्त्रक्रिया काही लोकांना खचीतच हितावह ठरेल, म्हणून त्यासाठी शासकीय व कार्पोरेशनच्या रूग्णालयामधून व्यवस्था करण्यात यावी. ते पुढे असेही म्हणतात की, अनुसूचित जाती व जमातीच्या गरीब लोकांना कुटुंब नियोजनाची अत्यंत आवश्यकता आहे.[28]

डॉ. आंबेडकरांच्या जन्मदर नियंत्रित करण्याचा विचार तत्कालीन नेत्यांनी फेटाळून लावला. १९७० नंतर जेव्हा वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाचे गंभीर परिणाम घडू लागले तेव्हा भारत सरकारने लोकसंख्यावाढीच्या समस्येचा विचार करून कुटुंब नियोजनाला प्रोत्साहन दिले. २००१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १०२ कोटी ७० लाख ५ हजार इतकी होती. जागाच्या लोकसंख्येच्या १६.७% लोकसंख्या भारतात निवास करते आहे.[29] देशाच्या आर्थिक विकासात देशाची लोकसंख्या आळ येत आहे. लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रश्नाकडे वेळीच लक्ष दिले असते तर भारत आजही सुजलाम–सुफलात राहिला असता.

**श्रमीकांचे आर्थिक कल्याण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील प्रचलित असलेल्या खोती पद्धत व महार वतन इ. पद्धती नष्ट करण्याकरिता मोलाचे कार्य केले. त्याचप्रमाणे उद्योगातील श्रमिकांचा आर्थिक विकास व्हावा आणि मालक–मजूर सबंध सुधारण्याकरिता कायदे करून श्रमिकांचे आर्थिक विकासात मोलाचे योगदान केले. पहिल्या महायुद्धापूर्वी भारतातील श्रमीक कामगार कारखान्यांमध्ये दीर्घकाळपर्यंत अत्यंत खडतर परिश्रम करीत होते. अपुऱ्या मजुरीमुळे त्यांना अत्यंत निम्न जीवन जगावे लागत होते.

गौतम बुद्धांनी नोकरांना न्याय मजुरी मिळावी, त्यांना अन्न मिळावे याकरिता मालक–नोकर आचारसंहिता निर्माण करून नोकरांच्या हिताला जपण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी मानवतावादी दृष्टिकोणातून कामगारांच्या हिताकरिता काही योजना कायान्वीत करण्याचा प्रयत्न केला. त्या योजना खालील प्रमाणे –

१) कामगार उपस्थितीत सुधारणा :–

नियोजन काळात उत्पादन न वाढण्याचे एक कारण कामगारांची अनुपस्थिती होय. खेड्यातून शहरात आलेला श्रमीक परत जावू नये आणि अनुपस्थितीवर आळा येण्याकरिता त्यांना सेवायोजकांनी कारखाण्याच्या आत–बाहेर निरनिराळ्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात. कामगारांच्या मनातील परकेपणाची भावना नष्ट करावी.

२) औद्योगिक संबंधात सुधारणा :–

सेवायोजक जास्त लाभापोटी कामगारांची अनेक प्रकारे पिळवणूक करतात. सेवायोजकांनी कामगारांकरिता स्वतःकाही सोयी निर्माण करून दिल्यास आणि कामगारांनी या सर्व सोयींचा उपयोग केल्यास, कारखानदार आणि कामगारात तणाव निर्माण होणार नाही.

३) कामगारांच्या राहणीमानात वाढ :—

बहुसंख्य कामगार हे खेड्यातून शहराकडे विस्थापित झालेले असतात. त्यांना मिळणारी मजुरी इतकी अल्प असत की ते प्राथमिक गरजाही पूर्ण करू शकत नाही. सेवायोजकांनी कामगारांकरिता निशुल्क सोयी निर्माण करून दिल्यास कामगारांच्या जीवनमानात निश्चितच वाढ होईल.

४) कामगारांच्या कार्यक्षमतेत सुधारणा :—

कारखाण्याच्या आत व बाहेर कामगारांकरिता कॅन्टीन, स्वस्त जेवन, निशुल्क वद्यकीय सोय, रात्रीचे शिक्षण इ. अनेक सोयी, सवलती दिल्यास कामगारांच्या कार्यक्षमतेत निश्चितच वाढ होईल.

५) कामगारांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास :—

श्रम कल्याणाच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्यास कामगारांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यात मदत होईल.[30] डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले वरील पाचही उपाय श्रमिकांच्या सर्वांगिण विकासाकरिता अत्यंत गरजेच्या होत्या आणि आहेत.

## स्वतंत्र मजूर पक्ष व मजूर कल्याण

मजुरांच्या समस्यांना वाचा फोडण्याकरिता मजूर संघटना स्थापण करण्यात आल्याचे जगाच्या इतिहासात अनेक दाखले मिळतात. गौतम बुद्धाप्रमाणेच डॉ. आंबेडकरांचा पिंड हा मजूर कल्याणाचा होता. डॉ. आंबेडकरांनी मुंबईतील सफाई कामगारांना एकत्र आणले, शिवाय गिरणी कामगारांची संघटना उभारली. व त्यानंतर ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ या राजकीय पक्षाची स्थापना १५ ऑगस्ट १९३६ रोजी केली.[31] डॉ. आंबेडकरांनी ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ निर्माण करून भारताच्या राजकीय क्षितिजावर एका परिवर्तनशील सम्यक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. हे त्रिकालबाधीत सत्य आहे.

डॉ. आंबेडकरांनी श्रमीक कल्याणाचे तत्त्वज्ञान मांडतांना 'स्वतंत्र मजूर पक्षा'च्या जाहीरनाम्यात आर्थिक धोरणाचा समावेश केला होता. तो पुढीलप्रमाणे –

१) शेतीच्या प्रगतीसाठी पतपेढ्या सुरू करणे.

२) शेतीच्या कच्च्या मालाच्या अनुरोधाने नवीन उद्योग निर्माण करणे.

३) धंदे शिक्षणाची सुरुवात करणे.

४) उद्योगाची मालकी सरकारकडे द्यावी.

५) कुळाच्या संरक्षणाचे कायदे करणे.

६) कारखाण्यातील कामगारांच्या हिताकरिता नोकरो, बढती, पगारवाढ, सरकारी नियंत्रण, कामाचे प्रमाणित तास, पगारी रजा, बोनस, पेंशन, विमा, निवास इ. कामे हाती घेण्याचा प्रयत्न करणे.

७) बेकारी कमी करण्याकरिता सरकारवर दबाव आणने.[32]

वरीलप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या जाहीरनाम्यात श्रमिकांचे संरक्षण करणारी धोरणे अंतर्भूत होती.

बुद्धाने समाजातील हीन, दरिद्री लोकांचा संघात समावेश करून त्यांच्या विकासाकरिता धम्माचा मार्ग दिला त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी मजूर कल्याणाचे तत्त्वज्ञान मांडतांना अपृश्याचा अंतर्भाव 'कामगार' या संज्ञेत करून तत्त्वज्ञानाची निर्मिती केली. बुद्धाचा धम्म 'मानवी दु:खावर' आधारित होता अगदी त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान सुद्धा 'व्यक्ती' हे एकक मानून निर्माण झाले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात की,"अधिकार प्राप्ती ही कोणाच्याही जन्मावर अगर दौलतीवर अवलंबून न ठेवता ती त्याच्या–त्याच्या गुणावर अवलंबून ठेवावी. गुणाने समान असलेल्या माणसाला समानतेने वागविण्यात यावे ही समानतेची व्याख्या अधिकार देताना लागू करणे रास्त आहे. पण व्यक्तीतील अंगभूत गुणाचा विकास होऊन ते अधिकारास लायक होण्यापूर्वी सर्वांना मग ते कितीही असमान असोत, सारखे वागवावे हाच न्याय आहे."[33] डॉ. आंबेडकरांच्या ह्या समतेच्या तत्त्वज्ञानात गौतम बुद्धाचा समतेचा विचार अंतर्भूत आहे.

डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्षा' च्या माध्यमातून मजुरांच्या दृष्टीने काही मागण्या केल्या होत्या.

१) शेतमजुरांना किमान वेतन.

२) वर्षात २४० दिवस काम करणाऱ्या कामगारांना स्थायी करणे.

३) कामाचे तास निश्चित करून ते ८ तास करावे.[34]

## कामगारांचा संप व मोर्चा

१० जानेवारी १९३८ रोजी मुंबईत स्वतंत्र मजूर पक्षाने २०,००० शेतकऱ्यांचा मोर्चा आझाद मैदानावरून कौंसिल हॉलकडे नेला. या मोर्चाच्या वतीने डॉ. आंबेडकरांनी शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्या सादर केल्या. त्या पुढीलप्रमाणे –

१) शेतकऱ्यांसाठी किमान मजुरी कायदा करणे.

२) बेठबिगारी हा फौजदारी गुन्हा ठरवावा.

३) सर्व पडीत जमीन शेतकऱ्यांना मोफत द्यावी.[35]

वरीलप्रमाणेच महारवतन आणि खोती पद्धती विरुद्धची विधेयके त्यांच्या श्रमीक विषयक तत्त्वज्ञानाचीच पूर्वपिठीका सांगणारी आहे. जी बुद्धाच्या न्याय आणि समता गृहीत धरून सामाजिक शोषनाच्या मुक्ततेवर आधारित आहे.

## मजूरमंत्री असतांनाची कृती

२ जुलै १९४२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मजूरमंत्री म्हणून नेमणूक झाली. त्यांच्या अध्यक्षतेखाली ७ मे १९४३ रोजी झालेल्या बैठकीत दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यापैकी पहिला म्हणजे, युद्ध साहित्याचे काम करीत असलेल्या कारखाण्यातून एक संयुक्त कामगार समिती नेमणे. आणि दुसरा म्हणजे, सेवायोजन कार्यालयांची स्थापना करणे.

१० मे १९४३ रोजी डॉ. आंबेडकरांचे सत्कार करण्यासाठी 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' च्या आयोजित कार्यक्रमात डॉ. आंबेडकर म्हणाले की, "माझे स्पष्ट मत आहे की भारतात कामगारांनी कामगार मंत्रिमंडळ स्थापण्याचा प्रयत्न करावा. भारतास स्वातंत्र्य मिळणे एवढीच गोष्ट पुरेशी नाही. ते स्वराज्य कोणत्या लोकांच्या हातात पडते याला महत्त्व

आहे.”

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजूरमंत्री असतांना केंद्रीय सरकारात अस्पृश्यांसाठी ५ ते ६% जागा राखीव ठेवल्या होत्या. परदेशात तांत्रिक शिक्षण घेण्याकरिता अस्पृश्य विद्यार्थांना मदत केली. औद्योगिक कामगारांप्रमाणेच कृषीतील कामगारांसाठी कामाच्या अटी, नुकसान भरपायी, विमा इ. बाबी लागू कराव्यात असे म्हटले होते. ‘टाईम्स ऑफ इंडिया’ या दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते की, “मालक आणि कामगार यांच्या संघर्षात मी कामगारांची बाजू घेईन.”[३६] या विधानावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मजुरांविषयी काय मत होते ते स्पष्ट समजून येते.

## श्रमीक कल्याणाची संविधानात्मक बाजू

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेच शिल्पकार होते. भारतीय राज्यघटना ‘गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५’ या विधेयकावर संस्कार करून निर्माण करण्यात आली असली तरी या राज्यघटनेच्या काही प्रावधानामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वयंप्रज्ञेची प्रचीती आल्याशिवाय राहत नाही. भारतीय राज्यघटनेत डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञानाचे पूर्ण प्रतिबिंब उमटले नाहीत कारण सत्तरूढ कॉंग्रेस पक्षामुळे विचारांना मर्यादा पडत असत. हे जरी खरे असले तरी भारतीय संविधानाच्या ‘उद्देशिका’ व ‘मार्गदर्शक तत्त्वे’ ही डॉ. आंबेडकरांची विशेष देण आहे.

भारतीय घटनेत मानवी हक्क, कर्तव्ये, स्त्री पुरुषांना समान दर्जा अशा विविध तरतुदी आहेत. त्यांचे विस्तृतीकरण खालील प्रमाणे सांगता येईल.

१) भारतीय संविधानाची उद्देशिका :–

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत डॉ. आंबेडकरांनी अभिप्रेत समतेची तत्त्वे दिली आहेत. व्यक्तीला– सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य; दर्जा आणि संधीची समानता.[37]

२) भारतीय संविधानाची मार्गदर्शक तत्त्वे :–

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वात खालील बाबींचा समावेश डॉ. आंबेडकरांनी केला आहे.

अनुच्छेद **३८** (१) : ज्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय हा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था, होईल तीतक्या परिणामकारक रीतीने प्राप्त करून देऊन व तिचे संरक्षण करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

(२) : राज्य हे विशेषतः, केवळ व्यक्तीव्यक्तीमध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसमुहामध्ये देखील, उत्पन्नच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी झटून प्रयत्न करील, आणि दर्जा, सुविधा, व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्न करील.

अनुच्छेद **३९** : राज्य हे, पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखील –

(क) : उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा;

(ख) : जनसामान्याच्या हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामीत्वाधिकार व नियंत्रणाधिकार यांचे वाटप व्हावे;

(ग) : आर्थिक यंत्रणा राबवताना परिणामी धनदौलतीचा व उत्पादनसाधनाचा जनसामान्यास अपायकारक होईल अशा प्रकारे एकाच ठिकानी संचय होऊ नये;

(घ) : पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे;

(ङ) : स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकाचे कोवळे वय यांचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये

आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये;

(च) : बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांचे शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण व्हावे.[38]

अनुच्छेद **४१** : राज्य हे आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत, कामाचा, शिक्षणाचा अधिकार आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा व्यक्तींच्या बाबतीत सरकारी सहाय्याचा अधिकार उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतुद करील.

अनुच्छेद **४२** : राज्य हे कामाबाबत न्याय व मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसुतीसाहाय्यासाठी तरतुद करील.

अनुच्छेद **४३** : अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा आर्थिक व्यवस्था सुसूत्र करून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व मजुरांना काम; निर्वाहवेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा व सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग यांची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील आणि, विशेषतः राज्य ग्रामीण क्षेत्रांमध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

अनुच्छेद **४३** (क) : कोणत्याही उद्योगधंद्यात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी राज्य अनुरूप

विधिविधानाद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने उपाययोजना करील.

अनुच्छेद **४६** : राज्य हे दुर्बलतर जनवर्ग, आणि विशेषतः, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील.[39]

उपरोक्त कलमातून मजूर विषयक विचारांच्या छटा आढळतात. त्या येणेप्रमाणे :– १) न्याय २) स्त्री व पुरुषांना समान जीवन जगण्याची खात्री ३) अर्थव्यवस्थेचे केंद्रिकरण रद्द ४) समान वेतन ५) कामगार स्वास्थ ६) कामाचा अधिकार ७) प्रसुती काळ वेतन ८) कामगारांच्या राहणीमानाप्रमाणे वेतन ९) व्यवस्थापनात मजुरांचा सहभाग.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ हा ग्रंथ लिहला. या ग्रंथात ते लिहतात की, “ज्याची शक्ती नष्ट झाली आहे, भूक, तहान आणि थकवा यांनी जो गळून गेला आहे. थकल्यामूळे ज्याचे मन शांत राहिलेले नाही त्याला नवा प्रकाश प्राप्त होऊ शकत नाही.”[40] गौतम बुद्धाप्रमाणेच डॉ. आंबेडकरही श्रमप्रतिष्ठेचे पुरस्कर्ते होते. गौतम बुद्धाने श्रम आणि श्रमिकांचा नेहमीच आदर केला होता. श्रम करूनच जीविका करावी असा बुद्धाचा उपदेश होता. डॉ. आंबेडकरही नेहमीच श्रमिकांची बाजु घ्यायचे श्रमिकांच्या हित संरक्षणासाठी त्यांनी शेवटपर्यत लढा दिला. बुद्धानी मालक व नोकर ह्यांचे सबंध कसे असावेत याबाबत आचारसंहिता सांगितली होती त्याच आचरसंहितेचे विस्तृतीकरण करून डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या ‘उद्देशिका’ व ‘मार्गदर्शक तत्त्वात’ मांडणी केली.

भारतातील श्रमीक व शेतकरी यांच्या अवस्थेचा जेवढ्या गांभीर्याने आणि पोटतिडकेने डॉ. आंबेडकरांनी विचार केला व त्यावर उपाय योजना सुचविली त्या प्रमाणात अन्य भारतीय पुढाऱ्यांनी विचार केलेला नव्हता. श्रमीक व शेतकरी ही सुद्धा

माणसे आहेत आणि त्यांना माणुसकीचे अधिकार प्राप्त झाले पाहिजेत यासाठी त्यांनी प्रत्यक्ष आंदोलने केली.

## भारतीय रुपयाचा प्रश्न

डॉ. आंबेडकरांनी १९२१ 'लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स' या अत्युच्च पदवीसाठी लिहलेल्या 'रुपयाचा प्रश्न : उद्‌गम आणि उपाय' हा प्रबंधातून आणि भारतीय चलन व वित्ताचा विचार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या रॉयल कमिशनपुढे दिलेल्या आणि सादर केलेल्या निवेदनातून डॉ. आंबेडकरांनी मौद्रिक अर्थशास्त्र या अर्थशास्त्राच्या पोटशाखेत भर घातलेली दिसून येते.

रुपयाचा प्रश्न हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोणातून अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत रुपयाचा जन्म १८०५ मध्ये झाला. त्यापूर्वी संपूर्ण देशात जवळ–जवळ ६६६ संस्थाने आणि ९९२ विविध मुद्रा चलनात प्रचलित होत्या.[41] ब्रिटीश शासनाने इंग्रजी सरकारची वसाहत असलेल्या भारतात जाहिरनामा काढून देशात रुपया हे एकच नाणे असेल अशी घोषणा केली. हा रुपया १० ग्रॅम चांदीचा होता.

## ब्रिटीशपूर्व रुपया

मोगल साम्राज्याचा आर्थिक पाया घातला तो अकबराने. त्या काळापासून भारतात चलन म्हणून सोने व चांदीचा वापर होत असे. सोन्याच्या नाण्यांना 'मोहर' म्हणत व चांदीच्या नाण्याला 'रुपया' म्हणत. मोगल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर अनेक स्वतंत्र राज्ये उदयास आली आणि नाणी पाडण्याचा एकाधिकार समाप्त झाला. प्रत्येक राज्याचे स्वतंत्र चलन अस्तित्वात आले आणि नाण्यांच्या देवाणघेवाणीत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.

या काळात चलनाचे 'सार्वत्रिक आणि त्वरीत स्वीकारार्हता' हे वैशिष्ट्य नाहीसे झाले. त्यामुळे आंतरराज्य देवाणघेवाणीच्या हिशेबांची पूर्ती करण्यापूर्वी या वेगवेगळ्या नाण्यांच्या 'खऱ्या' मूल्याची खातरजमा करणे आवश्यक झाले

त्यातून पैशाची अदलाबदल करणारा दलालाचा वर्ग निर्माण झाला.[42] त्याचे पर्यवसान म्हणून निकृष्ट चलनातून उत्कृष्ट चलन विकसित करण्याची जबाबदारी भारतात मोगल साम्राज्याची जागा घेणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीच्या खांद्यावर येऊन पडली.

## चलनाचे एकसुत्रीकरण

ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी आपल्या २५ एप्रिल १८०६ च्या खलीत्यात भारतीय चलनासाठी एकधातुमानाच्या बाजूने कौल दर्शविला. भावी भारतीय चलनासाठी १८० ग्रॅम ट्रॅाय वजनाचा आणि १६५ ग्रॅम शुद्ध चांदी असलेला रुपया हा एकक ठरवून दिला. इ. स. १८३३ पर्यंत भारतीय चलनात एकसुत्रता आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. ब्रिटीशांनी ठरवून दिलेला रूपया सर्वसामान्य झाला त्या व्यतिरिक्त फक्त 'शिक्के रुपया' आणि काही भागात प्रचलित सोन्याची नाणी सुरू राहीली. १९३५ च्या कायन्वये भारतात एकधातुमाणावर आधारित चलन पद्धती सुरू झाली.[43] १८० ग्रॅम ट्रॅाय वजनाचा आणि १६५ ग्रॅम शुद्ध चांदी असलेला रुपया हे एकमेव चलन प्रस्थापित केले व भारतात रौप्यमानकाची सुरुवात झाली.

## अर्थव्यवस्थेवर परिणाम

रौप्यमान पद्धतीचा स्वीकार केल्यानंतर भारतामध्ये विदेशी व्यापार, कारखानदार वर्ग, शेतकरी वर्गावर कशा प्रकारे आर्थिक परिणाम घडून आले याचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी आपल्या ग्रंथात आकडेवारी प्रस्तुत करून विषद केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते अर्थव्यवस्थेमध्ये त्या सुमारास काही महत्त्वपूर्ण गुणात्मक फेरबदल झाले.[44] उदा– वस्तुविनीमय पद्धतीचा ऱ्हास, विदेशी व्यापारात वाढ. या प्रकारच्या संरचनात्मक बदलामुळे रौप्य धातुमान पद्धतीच्या मर्यादा जानवू लागल्या. रौप्य धातुमान पद्धती देशाच्या गरजा पूर्ण करू शकली नाही. डॉ. आंबेडकरांनी प्रश्न उपस्थित केला की, एक

धातुमान पद्धती स्वीकारायची होती तर सुवर्ण एक धातुमान पद्धतीचा स्वीकार का केला नाही.

## चलन वाढीची कारणे

भारतात चलनाची मागणी वाढण्याची खालील कारणे होती.

१) पैसे देऊन वस्तू खरेदीवर भर.

२) परदेशी व्यापारात वाढ.

३) नोकरांना रोख पगार.

४) नागरिकांचा रोखीचा व्यवहार. चांदी वितळवून अन्य कामासाठी उपयोग.[45]

या सर्व कारणामुळे चलनाची वाढती मागणी रौप्य धातुमान पद्धती पूर्ण करू शकली नाही.

## कागदी चलन आणि अपयश

सुरुवातीला प्रत्येक बॅकेला स्वतःच्या नोटा प्रचलित करण्याचे स्वातंत्र्य होते. बॅक ऑफ बेंगाल, बॉम्बे, मद्रास या तीन प्रेसिडेंन्सी बॅकांच्या नोटांना वरचा दर्जा होता. १९६१ साली बॅकांकडून नोटा छापण्याचा अधिकार काढून भारतासाठी कागदी चलन करण्याचा अधिकार ‘कागदी चलन खाते’ नावाच्या सरकारी खात्याच्या व्यवस्थापनाला देण्यात आले. कागदी चलनाला चांदीची आणि सरकारी कर्जरोख्याची हमी असे.

कागदी चलनाच्या अपयशाची कारणे डॉ. आंबेडकरांनी खालील प्रमाणे सांगितली.–

१) सर्वात कमी मूल्याची नोट १० रुपयाची असल्याने आणि लोकांचे व्यवहार ‘एक आणा’ आणि त्याहीपेक्षा कमी असा होता.

२) एका प्रभागातील नोटा दुसऱ्या प्रभागात वैध समजल्या जात नव्हत्या.

## रुपयाची अस्थिरता आणि परिणाम

डॉ. आंबेडकरांनी रुपयाच्या अस्थिरतेची खालील कारणे सांगितली.

१) भारत देश कृषी प्रधान असल्याने ऋतुमानानुसार शेती केली जाते. शेतकऱ्याला पावसाळ्यात अधिक चलनाची गरज असते तर उन्हाळ्यात कमी चलनाचो गरज असते. त्यामुळे चलनाच्या मागणीत अंतर निर्माण होते.

२) दिवसेंदिवस वाढणाऱ्या लाकसंख्येला अधिक चलनाची आवश्यकता असल्याने चलनाच्या निर्मितीचा वेग वाढवावा लागतो.

३) भारतात नवनवीन उद्योगांची निर्मिती होत असल्याने यंत्राच्या खरेदीकरिता आणि विदेशी देणे फडण्यासाठी जास्तीचे चलन हवे आहे.

४) भारतात धनादेश पद्धतीचा कमी उपयोग होत असल्याने लोकांचा रोखीवर भर असल्याने जास्त चलन आवश्यक असते.

५) नोटा छापण्यावर कडक बंधणे असल्याने नोटा निर्मितीस जास्त कालावधी लागतो. त्यामाणाने पुरवठ्यात वाढ होत नाही[46]

इत्यादी कारणामुळे चलन व्यवस्थेत लवचिकतेचा अभाव निर्माण होवून वटाव दरात चढ–उतार मोठ्या प्रमाणात होऊन मूल्य स्थिर ठेवण्यास अपयश आले.

मुद्रा हे वस्तूचे मूल्य मोजण्याचे अधिकृत व प्रमाणित साधन होय. विनिमयमूलक अर्थव्यवस्था निर्माण करण्याकरीता मूल्य स्थिर असणे आवश्यक असते. डॉ. आंबेडकरांच्या मते ज्या अर्थव्यवस्थेत उद्योजकाला कर्जाऊ भांडवलाची अवश्यकता असते तेथे वटाव दर वाढल्याने अचानक त्यांचा नफा कमी होऊन व्यापारात जोखीम वाढते. खर्च वाढतो आणि या सर्व गोष्टींचा परिणाम किंमत वाढण्यात होऊन ग्राहकांवर भार वाढतो. किंमती वाढून सट्टेबाजीला उत्तेजन मिळते.

## रुपयाचे अवमूल्यन आणि परिणाम

डॉ. आंबेडकरांनी अनेक सांख्यिकी पुराव्याचे विश्लेषण करून सोने व चांदीच्या तुलनात्मक उत्पादनाच्या आकडेवारीचा आढावा घेवून निष्कर्ष काढला की, रुपयाच्या अवमूल्यनाला चांदीचा अतिरिक्त पुरवठा जबाबदार नाही. अवमूल्यनाचे कारण म्हणजे अनेक देशांनी चांदीच्या नाण्यात, वजन व मापात एकसूत्रता आणण्यासाठी झालेल्या चळवळीमूळे घडून आले.

डॉ. आंबेडकरांच्या नुसार रुपयाच्या अवमूल्यनाचे परिणाम –

१) सरकारी कर्जाचा बोजा वाढला.
२) भारतात गुंतवणूक कमी झाली.
३) अंदाजपत्रकाला जुगाराचे स्वरूप आले.
४) व्यापार आणि उद्योगावर वाईट परिणाम झाले.
५) रूपयाच्या मूल्यात घट.
६) किंमती वाढून दुर्बलांचे दु:ख वाढले.[47]

## सुवर्णमाणक आणि सुवर्ण विनिमय परिमाण

डॉ. आंबेडकरांनी सुवर्णमाणक व सुवर्ण विनिमय परिमाणाबाबत सांगितले की, त्यावेळी जगातील सर्व प्रमुख देशांनी सुवर्णमाणकाचा स्वीकार केला होता. तेव्हा भारताला सुद्धा रौप्यमाणकाचा त्याग करून सुवर्णमाणकाचा स्वीकार करणे योग्य ठरले असते. परंतु दुर्दैवाने भारताने सुवर्ण विनिमय परिमाणाचा स्वीकार केला. डॉ. आंबेडकर म्हणतात की, भारतासाठी सोन्याच्या चलनात अदलाबदल करता येणारे चलन ठेवून कोणत्याही प्रकारचे फायद्याचे होईल असे वाटत नाही.

## प्रा. केन्स आणि डॉ. आंबेडकरांचा युक्तिवाद

प्रा केन्स यांचे मत होते की, सुवर्णमाणक हे फार कठोर आहे. सुवर्णमाणकावर आधारित अर्थव्यवस्थेत चलन निर्मिती किती व्हावी हे त्या देशाच्या सोन्याच्या साठ्यावर अवलंबून असते. त्यामुळे चलन निर्मितीत लवचिकता राहू शकत नाही तर सुवर्ण विनिमय परिमाणात लवचिकता असते.

वरील प्रा. केन्स च्या मताला डॉ. आंबेडकरांनी कडाडून विरोध केला. डॉ. आंबेडकर म्हणतात की, सुवर्ण विनिमय परिमाणात लवचिकता असते हे खरे आहे परंतु लवचिकता हे दुधारी शस्त्र आहे. सुवर्ण विनिमय परिमाणा मध्ये चलन निर्मिती हे सर्वस्वी सरकारच्या मर्जीवर असल्याने राज्यकर्ते जर बेजबाबदार असतील तर निरंकुश चलन निर्मिती होण्याची शक्यता असते. त्यामुळे चलन फुगवठा आणि भाववाढ होऊन सामाजिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.[48] या दृष्टीने सुवर्ण विनिमय परिमाण पद्धती ऐवजी सुवर्णमाणक पद्धती सुयोग्य ठरते. डॉ. आंबेडकरांनी भारतासाठी सुवर्णमाणक पद्धती योग्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, भारतीय रुपयाच्या रक्षणार्थ तीन गोष्टी आवश्यक होत्या. त्या म्हणजे –

१) नाण्याच्या संचालनार्थ स्वतंत्र व्यवस्था.

२) रुपया हा अपरिवर्तनीय ठेवावयास हवा होता.

३) रुपयाच्या निर्मितीवर मर्यादा ठेवून अर्थ संकल्पाच्या तुटीच्या मात्रा टाळणे.[49]

वर नमूद पार्श्वभूमी लक्षात घेता– डॉ. आंबेडकरांचा रुपयाच्या संदर्भात स्पष्ट केलेले विचार भारतीय अर्थव्यवस्थेत कायम आहे आणि तो विचार व्यवहारिक आहे.

**राज्य–समाजवाद**

बुद्धा प्रमाणेच डॉ. आंबेडकरांना वाटत असे की, भारताच्या आर्थिक उन्नतीसाठी दारिद्र्य व विषमता निर्मुलन आणि बहुजन समाजाची शोषणमुक्तता यावर भर दिला पाहिजे. १९३० व १९४० या काळात व पुढेही काही वर्षे त्यांनी आपल्या लेखनात व भाषणात बहुजन समाजाच्या शोषण मुक्ततेवर भर दिला. डॉ. आंबेडकरांना समाजवाद हवा होता, परंतु पारंपारिक समाजवाद त्यांना पसंत नव्हता. त्यांच्या दृष्टिकोणातून श्रमीक आणि शोषित वर्गाच्या आर्थिक सुरक्षेकडे अधिक लक्ष देऊन योजना तयार करायला पाहिजे. नैतिक प्रेरणा लोकांमध्ये असायला पाहिजे, आणि त्यांनी मिळून जे काही

आपल्या श्रमाने कमविले ती सर्व संपत्ती समान रूपात वाटली पाहिजे.

ही नैतिक प्रेरणा कोणती? या विषयी गौतम बुद्ध म्हणतात, मनुष्याला शारीरिक दुःख किंवा वेदना त्याच्या स्वतःच्या वाईट आचरणाने निर्माण होतात. दुःखाच्या या कारणाचे निवारण करण्यासाठी त्यांनी पंचशीलेचे पालन करण्याचा उपदेश केला.[50] वर्गसंघर्षातून समता निर्माण होत असली तरी ती तत्कालिक असते. शिवाय वर्गसंघर्षातून एक सुखी होत असला तरी दुसरा दुःखी होतो. आर्य आष्टांगिक मार्गाचा त्यांचा सिद्धांत या गोष्टीला मान्यता देतो की वर्ग संघर्षाचे अस्तित्व आहे. आणि हा वर्गसंघर्षच दुःख आणि दुर्दशेचे कारण आहे.

आर्य आष्टांगिक मार्गाच्या तत्त्वात मानवाच्या संपूर्ण विकासाचा मार्ग सांगितला आहे. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, या आर्य आष्टांगिक मार्गाचा मुख्य उद्देश पृथ्वीतलावर न्यायाचे साम्राज्य प्रस्थापित करणे हा असून या जगातून दुःख आणि दैन्य नष्ट करणे हा आहे. बुद्धाचा हा समाजवाद डॉ. आंबेडकरांना इतर समाजवादापेक्षा जास्त महत्त्वाचा वाटतो.

डॉ. आंबेडकरांनी राज्ये आणि अल्पसंख्यांक या शीर्षकाखाली एक पुस्तीका १९४७ साली प्रसिद्ध केली. यात मूळ अधिकार, अल्पसंख्यांकांचे अधिकार आणि अनुसूचित जातींच्या सुरक्षा उपायांची माहिती दिली आहे.

## राज्यसमाजवादातील तरतुदी

डॉ. आंबेडकरांच्या राज्यसमाजवादात पुढील तरतुदींचा समावेश होता.

१) शेतो हा राज्याचा उद्योग असावा.

२) विमा, उद्योग आणि जमीन ज्यांनो धारण केल्या आहेत त्या ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारला असावा. त्यांना कर्जरोख्यांच्या स्वरूपात मोबदला द्यावा.

३) कर्जरोखे धारकांना रोख रक्कम केव्हा व कशा प्रकारे घ्यावी, हे राज्य ठरवील.

४) कर्जरोख्यावर वरसा हक्क लावता येईल.
५) कर्जरोखे धारकांना शासकीय नियमाने रोख रक्कम मिळेल.
६) शेती व्यवसाय खालील प्रमाणे संगठीत केला जाईल –
अ) शासन शेतीचे योग्य भाग करून ते कसायला उपलब्ध करेल.

i) जमिनीवर सामुहिक शेती केली जाईल.

ii) शासकीय नियमाने शेती केली जाईल.

iii) शेती उत्पादकांनी ठरविल्या पद्धतीप्रमाणे कसणाऱ्या प्रत्येकास शेतीच्या मालात सवलतीचे पैसे देऊन सहभागी होता येईल.

ब) जमीन खेड्यातील लोकांना भाड्याने देण्यात येईल. ती देताना जात, पंथ असा भेद न करता दिली जाईल.
क) सामुहिक शेतीसाठी पैसे, पाणी, जनावरे, खते आणि बी इ. उपलब्ध करून देणे शासनावर बंधनकारक राहील.
ड) i) राज्य शेतीसाठी सवलती देवू शकतो.
अ) शेतसाऱ्याचा काही भाग.
ब) कर्जधारकाला द्यावयाचा काही भाग.
क) साधनांसाठी दिलेल्या पैशाचा काही भाग.

ii) सामुहिक शेतीच्या योजनेला बाधक होईल असे आचरण केले तर त्याला कोणता दंड द्यावा हे शासनाने ठरवावे.[51]

७) जे प्रमुख उद्योग आहेत ते राज्याच्या मालकीचे असावेत व ते राज्याने चालवावेत.
८) जे प्रमुख उद्योग नाहीत पण पायाभूत आहेत ते राज्याने चालवावे किंवा महामंडळाद्वारे चालवावे.
९) विमा क्षेत्रात राज्याची मक्तेदारी असावी आणि राज्याने प्रत्येक प्रौढाला त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणात तो घेण्यास भाग पाडावे.
१०) ही योजना जितक्या लवकर हाईल तितक्या लवकर अंमलात आणावी परंतु घटना अंमलात आल्यापासून दहा–वर्षापेक्षा अधिक काळ होता कामा नये

**राज्यघटना आणि राज्यसमाजवाद**

डॉ. आंबेडकरांनी घटना समितीला सादर केलेले निवेदन हे राज्यसमाजवादाचे प्रारूप होते. राज्य घटनेतच समाजवादाची तरतुद असावी असे त्यांचे मत होते. संविधानाच्या उद्देशिकेत आणि निर्देशक तत्त्वात डॉ. आंबेडकरांनी समाजवादाचा समावेश केलेला आहे. ज्यात बुद्ध तत्त्वज्ञानाच्या छटा स्पष्टपणे दिसून येतात.

१) उद्देशिकेतील समाजवादी तत्त्व :–

उद्देशिकेत नमूद सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष राज्य; नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता; व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मतेचे याच्या आश्वासन देणारी बंधुता निर्माण करणे.[52] इ. वाक्यांतून समाजवादी तत्त्वांचा बोध होतो.

२) मूलभूत तत्त्वे :–

संविधानात भाग ३ मध्ये मूलभूत अधिकार दिले आहेत.

समानतेचा अधिकार –

अनुच्छेद **१५ (४)** : कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतुद करण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही.[53]

स्वातंत्र्याचा अधिकार –

अनुच्छेद **१९ (छ)** : कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा चालविण्याचा अधिकार असेल.[54]

अनुच्छेद **२१** : कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.[55]

शोषणाविरूद्ध अधिकार –

अनुच्छेद **२३** (१) : माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठ यांना मनाई करण्यात आली आहे आणि उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यक्तीक्रम करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) : सार्वजनिक प्रयोजनांकरता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवा बंधन लादतांना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

अनुच्छेद **२४** : चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीस लावले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्याची योजना केली जाणार नाही.[56]

अनुच्छेद **२७** : ज्याचे उत्पन्न एखद्या विशिष्ट धर्माचे अथवा धार्मिक संप्रदायाचे संवर्धन करण्यासाठी किंवा तो चालू ठेवण्यासाठी निविर्दिष्टपणे विनियोजीत केलेले आहे असे कोणतेही कर देण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

अनुच्छेद **२८** (१) : पूर्णतः राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या अशा कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार –

अनुच्छेद २९ (२) : राज्याच्याखर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

अनुच्छेद ३१ (१) : धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.[57]

३) मार्गदर्शक तत्त्वे :–

संविधानाच्या ४ थ्या भागात राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीसाठी अत्यावश्यक बाबींच्या पूर्तीकरिता दिली आहेत.

अनुच्छेद ३८ (२) : राज्य हे विशेषतः, केवळ व्यक्तीव्यक्तीमध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसमुहांमध्येदेखील, उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी झटून प्रयत्न करील, आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

अनुच्छेद ३९ : राज्य हे विशेषतः पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखील –

(क) : उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा.

(ख) : जनसामान्याच्या हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामीत्वाधिकार व नियंत्राणाधिकार यांचे वाटप व्हावे.

(ग) : आर्थिक यंत्रणा राबवतांना परिणामी धनदौलतोचा व उत्पादनसाधनांचा जनसामान्यास अपकारक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ नये.

(घ) : पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे;

(ङ) : स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकाचे कोवळे वय यांचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये;

(च) : बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांचे शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण व्हावे.[58]

अनुच्छेद **४१** : राज्य हे आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत, कामाचा, शिक्षणाचा अधिकार आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा व्यक्तींच्या बाबतीत सरकारी सहाय्याचा अधिकार उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतुद करील.

अनुच्छेद **४२** : राज्य हे कामाबाबत न्याय व मानवोचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसुतीसाहाय्यासाठी तरतूद करील.

अनुच्छेद **४३** : अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा आर्थिक व्यवस्था सुसूत्र करून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व मजुरांना काम; निर्वाहवेतन, समूचित जीवनमान आणि फुरसतीचा व सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग यांची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील आणि,

विशेषतः राज्य ग्रामीण क्षेत्रांमध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

अनुच्छेद **४३** (क) : कोणत्याही उद्योगधंद्यात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी राज्य अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने उपाययोजना करील.[59]

अनुच्छेद **४७** : आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यापैकी असल्याचे मानील आणि विशेषतः, मादक पेये व आरोग्यास अपकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज एरव्ही सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.[60]

गौतम बुद्धाच्या धम्माचा पाया हा ‘नैतिक आचरण’ हाच राहिला आहे. नैतिक आचरण यांची सांगड ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या त्रयींत समाविष्ट आहे. डॉ. आंबेडकरांनी सुद्धा समाजवादात न्याय, बंधुता, समता आणि स्वातंत्राचा समावेश करून बुद्ध तत्त्वज्ञानाची पुनरावृत्ती केली आहे.[61] डॉ. आंबेडकर म्हणतात की, श्रमीक, दलित आणि मालकात संघर्ष चालत राहिला तर राष्ट्राचा विकास होणार नाही. विकासाकरिता स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, अहिंसा आणि न्याय आवश्यक आहे. राष्ट्राने या मूल्यांची रक्षा करावी.

डॉ. आंबेडकरांचे आर्थिक धोरण म्हणजे आर्थिकदृष्ट्या कल्याणकारी राज्याच्या निर्मितीला साह्यभूत ठरणारे ‘समृद्धीचे अर्थकारण’ आणि सामाजिकदृष्ट्या समतावादी समाजरचनेच्या प्रस्थापनेला गती देणारे ‘समाजोद्धाराचे अर्थकारण व कल्याणकारी राज्याचे अर्थशास्त्र’ आहे.

## जाती आणि अस्पृश्यतेचे अर्थकारण

भारतातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्यासारख्या सामाजिक समस्यांचे आर्थिक दृष्टिकोणातून विश्लेषण करणारे डॉ. आंबेडकर हे पहिलेच अर्थतज्ञ होते. बुद्धाच्या समतेच्या तत्त्वाचा हा परिपाक होय. बुद्धाने धम्मात सर्व जाती आणि उच्च–निच्च लोकांचा सहभाग केला होता. समाजातील निच्च आणि दरिद्री लोकांविषयी बुद्धाला विशेष काळजी होती. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता ही एक गुलामी मानली आहे. त्या गुलामीच्या विरोधात आपल्या तत्त्वज्ञानाची निर्मिती केली.

## जातीचे अर्थशास्त्र

डॉ. आंबेडकरांच्या मते जाती आणि वर्ग व्यवस्था ही अत्यंत दुष्ट पद्धत आहे. “ब्राम्हणांनी ज्ञानाची जोपासना करावी, क्षत्रियांनी शस्त्र धारण करावे, वैश्याने व्यापार करावा आणि शुद्रांनी सेवा करावी; यावरून ही श्रमविभागणीची पद्धत असावी असे भासते.” डॉ. आंबेडकर म्हणतात की, “ही श्रमविभागणी उत्स्फूर्त नाही, आणि ती नैसर्गिक कलावर किंवा प्रवृत्तीवर आधारलेली तर मुळीच नाही.”[62] जातिव्यवस्थेमुळे निर्माण श्रमविभागणी निवडीला वाव देणारी नाही. त्यात पसंती –नापसंतीला स्थान नाही.

डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, देशाच्या आर्थिक विकासातील जातिव्यवस्था एक फार मोठा अडथळा आहे. जातिव्यवस्थेमुळे देशाचा सर्वांगिण विकास होऊ शकत नाही. त्यांनी जातिव्यवस्थेच्या आर्थिक घटकाचे खालील प्रमाणे विश्लेषण केले –

१) प्रत्येक जातीच्या परंपरागत व्यवसाय.
२) उच्च जात अधिक मोबदला, कनिष्ठ जात कमी मोबदला.
३) जातिव्यवस्थेमुळे श्रमिकांचे विभाजन.
४) जातिव्यवस्थेमुळे श्रमाची अप्रतिष्ठा.
५) जातिव्यवस्था गतिशीलतेच्या विरोधी.
६) जातिव्यवस्था आर्थिक विकासाच्या विरोधी.[63]

आर्थिक विकासाच्या दृष्टीने ही अतिशय प्रतिकूल व्यवस्था होय. जातिव्यवस्थेचा वाईट परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. म्हणून जातिव्यवस्था नष्ट झाल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होऊ शकत नाही, असे डॉ. आंबेडकरांना वाटे.

## अस्पृश्यतेचे अर्थशास्त्र

डॉ. आंबेडकर म्हणतात, अस्पृश्यता ही एक धार्मिक रूढी आहे असा बऱ्याच लोकांचा समज आहे, आणि तो बरोबर आहे. तीला एक आर्थिक बाजूही आहे आणि त्यामुळे ती गुलामगिरीपेक्षाही भयंकर ठरते. गुलामगिरीत मालकावर किमानपक्षी गुलामाच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची जबाबदारी असे. असे केले नाही तर गुलामांची बाजारात किंमत कमी होईल ही भिती. परंतु अस्पृश्यतेच्या पद्धतीत हिंदू समाज अस्पृश्यांना जगवण्याची कोणतीही जबाबदारी घेत नसत. या आर्थिक पद्धतीत जबाबदारीशिवाय पिळवणूक करण्याची परवानगी होती. अस्पृश्यता केवळ आर्थिक शोषणाची पद्धत नव्हे तर अनियंत्रित आर्थिक शोषणाची पद्धत आहे.

डॉ. आंबेडकरांनी 'अस्पृश्यतेचे अर्थशास्त्र' ही संकल्पना मांडली. 'अस्पृश्यतेचे अर्थशास्त्र' पुढील पैलूंच्या आधारे त्यांनी स्पष्ट केले.

१) अस्पृश्यांचे व्यवसाय घाणेरडे, अशुद्ध आणि निकृष्ट दर्जाचे आहेत.

२) अस्पृश्यांचे व्यवसाय अधिक कष्टदायक आहेत.

३) अस्पृश्यांना कामाचा मोबदला कमी मिळतो.

४) अस्पृश्यांचे आर्थिक शोषण करायला कायद्याची मान्यता.

५) आर्थिक गतिशीलतेमधील अडथळा.

६) शारीरिक श्रम आणि बुद्धिमत्ता यांची फारकत.[64]

म्हणून अस्पृश्यता ही त्यांच्यावर लादलेली गुलामीपेक्षाही क्रुर अशी व्यवस्था होय.

गौतम बुद्ध वर्ग व्यवस्थेचे कट्टर विरोधक होते. त्यांचा धम्म समतेची शिकवण देणारा असा होता. डॉ. आंबेडकरांनी बुद्धा प्रमाणेच जाती आणि वर्ग व्यवस्था नाकारली. डॉ.

आंबेडकरांनी जातिव्यवस्थेच्या आणि अस्पृश्यतेच्या आर्थिक अंगाच्या या सखाल विश्लेषणावरून, पुढे भारतीय घटनेचा मसूदा तयार करतांना अस्पृश्यता निर्मुलनासाठी आणि राखीव जागांसाठी तरतुद केली.

## आर्थिक लोकशाही

जगात लोकशाहीचे पहिले समर्थक म्हणून गौतम बुद्धाच्या नावांचा उल्लेख होतो. जगाला आपल्या धम्माच्या माध्यमातून त्यांनी लोकशाहीची शिकवण दिली आहे. डॉ. आंबेडकर सुद्धा मानवी हक्क आणि लोकशाहीचे कडवे समर्थक होते. डॉ. आंबेडकरांना स्फुरलेली लोकशाहीची कल्पना सर्वसामान्यपणे राजकीय स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या ज्ञात कल्पनेपेक्षा अधिक व्यापक होती. जर सामाजिक व आर्थिक लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाही यशस्वी होवू शकत नाही असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

लोकशाही व्याख्या करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, "ज्या राज्यपद्धतीत शासनकर्त्यांना जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात मुलभूत बदल घडवून आणणे शक्य असते आणि जनताही रक्तपाताचा अवलंब न करता हे बदल विनातक्रार स्वीकारते, लोकशाहीची हीच खरी कसोटी आहे."[65] डॉ. आंबेडकर सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे एक अमोघ साधन म्हणून लोकशाही कडे पाहत होते. "सामाजिक व आर्थिक लोकशाही जणू काही राजकीय लोकशाहीच्या पेशी व तंतू असतात. पेशी व तंतू जेवढे मजबूत तेवढे शरीरही मजबूत" असा डॉ. आंबेडकरांचा विश्वास होता.

मे १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी 'व्हॉईस ऑफ अमेरीका' या संस्थेने आयोजीत केलेल्या एका संवाद–मालीकेत 'भारतातील लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर भाषण केले. त्यात ते म्हणाले "लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा सांसदीय सरकार नव्हे. लोकशाहीची मुळे सरकारी पद्धतीत, सांसदीय किंवा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीत नसतात. लोकशाही म्हणजे सहजिवणाने राहण्याची एक पद्धती. लोकशाहीची मुळे

सामाजिक संबंधात शोधायची असतात. जे लोक समाज बनवितात त्यांच्या सहजिवणाच्या संदर्भात तीची मुळे शोधायची असतात."[66]

डॉ. आंबेडकरांनी केवळ राजकीय हक्काशी लोकशाहीची बांधिलकी असू नये, तर सामाजिक व आर्थिक बाबतीत समान संधी हाच लोकशाहीचा खरा अर्थ असला पाहीजे असे स्पष्ट केले. डॉ. आंबेडकर म्हणतात की, समाजात उच्चनिचता असू नये, समाजात दडलेला वर्ग असू नये, शोषित वर्ग असू नये. समाजातील वेगवेगळ्या वर्गात असलेली विषमतेची खोल दरी लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीत मोठा अडथळा ठरू शकते.

स्वातंत्र्याच्या तत्त्वासारखीच बंधुता हे लोकशाहीचे दुसरे नाव होय. सामाजिक जुलूम, वेठबिगारी, वाईट वागणूक आणि असुरक्षितता हे लोकशाहीला मारक ठरतात. डॉ. आंबेडकरांनी आर्थिक बाबींमध्ये सरकारी हस्तक्षेपाचा पुरस्कार केला. समाजातील गरीब, पददलित, व दुर्बल वर्गाला आपले आर्थिक स्वातंत्र्य कायम ठेवणे शक्य व्हावे म्हणून सरकारने समान आर्थिक संधीची हमी द्यावी. लोकशाहीसाठी सदसद्विवेक बुद्धी आवश्यक असते असे डॉ. आंबेडकर सांगतात.

घटनासमितीसमोर भाषण करतांना डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, नवीन घटना निर्माण करण्यामागे दोन उद्दिष्ट्ये आहेत –

१) राजकीय लोकशाही रूढ करणे.

२) कुठलेही सरकार सत्तेवर असो आथिक लोकशाही आणणे बंधनकारक राहील.[67]

याप्रमाणे आर्थिक लोकशाहीची संकल्पना भारतीय राज्यघटनेत रुजविण्यात आली. गौतम बुद्धाप्रमाणेच डॉ. आंबेडकर ही लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. बहुजनहिताय– बहुजनसूखाय या बुद्धाच्या तत्त्वाप्रमाणेच डॉ. आंबेडकरांनी बहुजन वर्गाच्या हिताची जोपासना आर्थिक लोकशाहीच्या माध्यमातून केलेली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर व्यक्त झालेली मते

अस्पृश्यांच्या आर्थिक आणि सामाजिक मुक्तिसंग्रामाच्या काळात डॉ. आंबेडकरांना अनेक आघाड्यांवर लढावे लागले. समाज जीवनातील पारंपारिक तटबंद्या तोडून काढताना प्रत्येक सुधारकांच्या वाट्याला जो विरोध पत्कारावा लागतो तो डॉ. आंबेडकरांच्या वाट्याला येणे अपरिहार्य होते. तसेच अनेक महान तत्त्ववेत्यांनी त्यांच्या योगदानाचे मनपूर्वक स्वागतही केलेले आहे.

### प्रतिकूल मते

डॉ. आंबेडकरांचा लहानापासून मोठ्या पुढाऱ्यापर्यंत सर्वांनी विरोध केला. अनेकांची टीका एकाच साच्याची दिसून येते. त्यातील काही कायमचे विरोधक नव्हते. ज्याला आपण वैचारिक विरोध म्हणू अशाच विरोधाची दखल इथे घेण्यात आली आहे.

आपल्या देशाच्या आर्थिक आणि सामाजिक चळवळीच्या इतिहासाची पाने चाळली तर एक गोष्ट विशेषत्वाने आपल्या लक्षात येते की या देशातला हिंदूत्ववाद्यांचा वर्ग पारंपारिक मूल्यांचे पालन करण्यामध्ये जागरूक राहिलेला आहे. जातीयतेची सामाजिक चौकट, स्पृश्यास्पृश्य भेद आणि अंधश्रद्धा याचे अनुकरण वाखाणण्यासारखे आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'समाजसुधारकांचा मार्ग राजकीय कार्यकर्त्यापेक्षा अवघड आणि काटेरी असतो.' या गोष्टीची त्यांना व्यक्तिगत जीवनात प्रचीती आली. त्यांना जीवनाच्या अंतापर्यंत हिंदूत्ववादी, सनातनी आणि बुरसटलेल्या विचारांच्या लोकांना सततच तोंड द्यावे लागले.

डॉ. आंबेडकरांचा महाडचा सत्याग्रह हा मानवाधिकाराच्या संदर्भात होता. त्यासबंधी पुण्याचे भोपटकर यांनी ११ एप्रिल १९२७ च्या 'भाला' च्या अंकात लिहले की, "अस्पृश्यामध्ये महार आणि मांग या दोन जाती अत्यंत घाणेरड्या आहेत. ते ओल्या अन्नाची भिक्षा मागणारे आहेत. या अस्पृश्यांनी पाणवठे बाटविण्याचा प्रयत्न करू नये."[६८] बाबासाहेबांच्या

मानवमुक्तीच्या संग्रामातील ही पहिली सलामी होती.

गोळवलकर गुरूजी म्हणतात की, “स्वकीय पेशव्यांच्या विरुद्ध आणि परकीय इंग्रजांच्या बाजूने लढणाऱ्या महार सैनिकांचे व्यवहार गुलामीचे निदर्शक आहे. आपल्याच देशबांधवाच्या विरूद्ध लढणे ही स्वाभिमानाची बाब नव्हे.”[69] म. गांधींनी आपल्या राजकारणाला सुरुवातीपासूनच धार्मिक अधिष्ठान दिले, त्यामुळे जनसमुदायावर त्यांचे वजन जास्त पडत असे. म. गांधी वर्णाश्रमावर विश्वास ठेवत होते. तसे त्यांचे धोरणही दिसून येते. त्यांच्या सार्वजनिक कार्यक्रमात अस्पृश्यतानिवारण होते परंतु तो राजकारणाचा भाग होता. इंग्लंडमधील गोलमेज परिषदेत गांधी म्हणाले की, “इथे जमलेले अल्पसंख्यांकाचे प्रतिनिधी हे लोकांच्यामधून निवडलेले नसून सरकारकडून निवडले गेले आहेत, त्यामुळेच आपणास समझोता घडवून आणण्यामध्ये अपयश आले आहे.”[70] म. गांधी स्वतःच स्वतःला अस्पृश्यांचे पुढारी समजून घेत होते. अस्पृश्यांनी कधीही त्यांना आपला पुढारी किंवा उद्धारकर्ता मानले नव्हते.

सावरकर प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांचा मनःपिंड वैचारिक होता. ते क्रांतीकारक होते आणि त्या प्रवृत्तीला वैचारिक अधिष्ठान होते. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या समता–संघर्षाला निर्भयपणे आणि मनःपूर्वक पाठिंबा सुरुवातीला एकट्या सावरकरांनी दिला होता परंतु तो दुरूनच होता. डॉ. आंबेडकरांच्या कोणत्याच सत्याग्रहात त्यांनी स्वतःभाग घेतला नाही. त्यांना स्वतःभाग घेणे शक्य नाही म्हणून आपल्या अनुयायांना पाठविले, असे देखील घडले नाही.

आपल्या जातिभेद विषयक निबंधात सावरकर लिहितात की, “पोथीजात जातिभेदामुळे उच्चजाती नीच जातीवर जो अत्याचार करतात त्याचा दोष साऱ्या जातीकडे. ते पाप साऱ्या जातींचे. ते खापर ब्राम्हणापासून भंग्यापर्यंत साऱ्या जातीच्या माथ्यावर फोडले पाहिजे. केवळ ब्राम्हणावर नव्हे.”[71] डॉ. आंबेडकरांच्या धर्मांत्तरावर टीका करतांना सावरकर म्हणतात की, “खरोखर बौद्ध धर्म हा विश्वव्यापी तत्त्वांचा धर्म होता. तरी

देखील त्याला जगातील लोकांच्या अंतःकरणातून पाशवी मनोवृत्तीची बीजे नष्ट करता आली नाही. हिंदुस्थानला बिनधोकपणे तलवारीच्या ऐवजी जपमाळ हाती धरता यावी अशी परिस्थिती निर्माण करता आली नाही."[72] जी गोष्ट सावरकरांच्या हिंदू धर्माला साधता आली नाही ती गोष्ट केवळ बौद्ध धर्माकडून अपेक्षित करतात. श्री. शेषराव मोरे यांना धर्मांत्तरावर सावरकरांनी घेतलेल्या आक्षेपाचे आणि त्यांनी लिहिलेल्या तीन लेखातील ताठर भूमिकेचे आश्चर्य वाटते.

डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या 'म. गांधी आणि कॉंग्रेस यांनी अस्पृश्यांसाठी काय केले?' या ग्रंथातील मते खोडण्याकरिता राजगोपालचारींनी 'आंबेडकर रेफ्युटेड' नावाची पुस्तक १९४६ साली लिहिली. त्यात ते लिहितात की, "कडक कायदे करून किंवा घटनात्मक दबाव, या मार्गाने अस्पृश्यता निवारणाचे कार्य करावे अशी आंबेडकरांची इच्छा आहे, परंतु हा मार्ग चुकीचा आहे."[73] हल्ली अरूण शैरी यांनी Worshipping false gods : Ambedkar and the facts which have been erased. नावाचे पुस्तक लिहून डॉ. आंबेडकरांवर टीका केलेली आहे.

## अनुकूल मते

डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे आणि त्यांच्या विचाराचे समर्थन करणाऱ्यांची कमी नव्हती. काही विचारवंत त्यांच्या विचारांना प्रमाण मानून आपले विचार प्रगट करताना दिसून येतात.

डॉ. य. दि. फडके आपल्या 'आंबेडकरी चळवळ' या ग्रंथात लिहितात की, ज्या कुटुंबाच्या मागोल शंभर पिढ्यांना कुत्र्या—मांजरासारखी वागणूक मिळाली, जे अस्पृश्य होते आणि त्यांच्या सावलीनेही विटाळ होत असे अशा कुटुंबात जन्माला येऊनही डॉ. आंबेडकर जगातील अग्रगण्य विद्यापीठातील सर्वोच्च पदव्या प्राप्त करून परदेशातून परतल्यावर स्वतःच्या आर्थिक उन्नतीचा मोह टाळून गरीब जनतेच्या कल्याणाला वाहून घेतले. अशी सामाजिक बांधिलकी मानणारा अर्थतज्ज्ञ विरळाच.

धनंजय कीर म्हणतात की, “डॉ. आंबेडकरांचे नाव देशाच्या इतिहासाशी सदैव निगडित राहील. त्यांच्या ध्येयापैकी अनेक ध्येयांचा राज्यघटनेत समावेश झालेला आहे. त्यांनी मनू विरुद्ध बंड केले आहे आणि मनूला त्याच्या गादीवरून खाली ओढले. या विजयाला या देशाच्या इतिहासात तोड नाही.”[74] कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) म्हणतात की, “अस्पृश्यता म्हणजे माणसाला जनावरापेक्षाही हीन आणि अन्याय्य जीवन बांधून देण्याचा एक अघोरी प्रयोग. एखादा महान युगकर्ता, धन्वंतरीच समाजाला त्या व्याधीतून मुक्त करू शकतो. त्या निर्जीव, तेजोहीन मानवांना नवीन चेतना, नवीन प्राण निर्माण करू शकतो. भारतामधील कोट्यावधी लोकांच्या संबंधात हे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले.”[75]

प्रा. गंगाधर पानतावणे यानी तर डॉ. आंबेडकरांच वर्णन एक धगधगती ज्वाला असेच केले आहे ते म्हणतात की, “डॉ. आंबेडकर ही केवळ एक व्यक्ती नव्हती. ते विद्रोहाचे धगधगते रूप होते. मनुष्यत्वासाठी चाललेला तो अविरत लढा होता. ज्यांना नाकारले गेले आहे त्यांना ‘माणूस’ घडविणारी, त्यांना माणूसपण देणारी दाहक सजोवक शक्ती होती.”[76]

डॉ. प्राध्यापक रावसाहेब कसबे म्हणतात की, “बाबासाहेब हे भारताचे विसाव्या शतकातील असे एक सुपुत्र होते, की ज्यांनी केवळ भारतीय समसजाच्या जडणघडणीलाच योगदान केले असे नाही, तर जागतिक पातळीवरील विविध क्षेत्रांत त्यांनी आपले योगदान दिलेले आह”[77] श्री. कसबे यांनी बाबासाहेबांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्वाचा यात समावेश केलेला आहे.

डॉ. यशवंत मनोहर आपल्या कवितेतून डॉ. आंबेडकरांचे वर्णन करताना ‘महाबुद्ध’ असे करतात. ते म्हणतात की, “डॉ. आंबेडकर विश्वविचारवंताच्या मालिकेतील एक युगप्रवर्तक तत्त्वज्ञ आहेत. डॉ. आंबेडकर म्हणजे सुधारणावादी तत्त्वज्ञान नसून, ते कांतिकारी तत्त्वज्ञान आहे.”[78]

एकंदरीत डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान अष्टपैलू असे होते. त्यांची बुद्धिमत्ता न–गवसणारी अशी होती. त्यांच्यावरील

प्रतिकूल मतांचा विचार केल्यास असे लक्षात येते की, त्यांना विरोध करणाऱ्यांची कमी नव्हती तरीसुद्धा त्याची पर्वा न करता त्यांनी मानवमुक्तीचा संग्राम लढला तो आर्थिक, सामाजिक बाबींकरिता. आपले स्वतःचे तत्त्वज्ञान उभे करून समाजाला हे दाखवून दिले की ते विरोधकांची पर्वा करीत नाही. काही विचारवंतांनी डॉ. आंबेडकरांच्या सर्व क्षेत्रातील कार्याची योग्य दखल घेतलो आहे आणि म्हणूनच त्यांना आजही डॉ. आंबेडकरांच्या विचारात सामाजिक समतेचे प्रणेते गौतम बुद्ध दिसतात आणि डॉ. आंबेडकरांना 'महाबुद्ध' म्हणतात. डॉ. आंबेडकरांचे धर्मपरिवर्तन केवळ सामाजिक मुक्तीसाठी नव्हते तर ते आर्थिक मुक्तीसाठीही होते याची आज अनेक विचारवंतांनी दखल घेतली आहे.

<u>संदर्भ टीपा</u>

1. डॉ.नरेद्र जाधव— डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. १
2. संपादक, वामन निंबाळकर— डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ११
3. डॉ. नरेद्र जाधव— डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. २
4. तत्रैव पृ. ५
5. दिपक मेश्राम— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७—९८. पृ. ३
6. संपादक, वामन निंबाळकर— डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६. पृ. १२१
7. दिपक मेश्राम— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७—९८. पृ. ४
8. तत्रैव पृ. ४
9. तत्रैव पृ. ५
10. तत्रैव पृ. ५
11. सुदर्शन खापर्डे— डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा चिमुर तालुक्यातील गोंड जमातीवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८—९९. पृ. ३०
12. दिपक मेश्राम— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७—९८. पृ. ६
13. डॉ. नरेद्र जाधव— डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. ५०
14. दिपक मेश्राम— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७—९८. पृ. ७
15. संपादक, वामन निंबाळकर— डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६.पृ. १२०

16. दिपक मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८. पृ. ८
17. संपादक, लोकराज्य–महाराष्ट्र शासन, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, ऑक्टोबर २००६. पृ. १४३
18. संपादक, वामन निंबाळकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६.पृ. १२१
19. डॉ. नरेद्र जाधव– डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. ५३
20. संपादक, वामन निंबाळकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६.पृ. १२१
21. डी. एस. मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान आणि सामुहिक शेती, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९०. पृ. २८
22. सुदर्शन खापर्डे– डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा चिमुर तालुक्यातील गोंड जमातीवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध,
डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९. पृ. ३२
23. तत्रैव पृ. ३३
24. दिपक मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८. पृ. १०
25. सुदर्शन खापर्डे– डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा चिमुर तालुक्यातील गोंड जमातीवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९. पृ. ३६
26. संपादक, वामन निंबाळकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ११९
27. दिपक मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८. पृ. ११
28. तत्रैव पृ. १४

29. संपादक, वामन निंबाळकर— डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६. पृ. १२०
30. दिपक मेश्राम— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७—९८. पृ. ४५
31. कु.चंदा सोमकुवर— डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे श्रमीक कल्याण विषयक विचार, लघुशोध प्रबंध, डॉ.आंबेडकर विचारधारा, १९९०—९१. पृ. ५
32. तत्रैव पृ. २६
33. तत्रैव पृ. ८
34. सुदर्शन खापर्डे— डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा चिमुर तालुक्यातील गोंड जमातीवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८—९९. प. ३४
35. कु.चंदा सोमकुवर— डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे श्रमीक कल्याण विषयक विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९०—९१. पृ. १४
36. तत्रैव पृ. ४२
37. डा.बाबासाहेब आंबेडकर अनु. प्रा.देवीदास घोडेस्वार— भारताचे संविधान, समता सैनिक दल प्रकाशन, २०००. पृ. ४
38. तत्रैव पृ. ३८
39. तत्रैव पृ. १५८
40. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, अनु. प्रा.देवीदास घोडेस्वार —बुद्ध आणि त्यांचा धम्म, बुद्ध आणि त्यांचा धम्म सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, नागपूर, २००५. पृ. ५७
41. दिपक मेश्राम— डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७—९८. पृ. १६
42. डॉ. नरेंद्र जाधव— डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. ३४

43. सुर्यभान शेंडे– भारतीय रूपयाचे अवमल्यन आणि रूपयाच्या प्रश्नासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९. पृ. २८
44. तत्रैव पृ. २६
45. तत्रैव पृ. २६
46. तत्रैव पृ. २८
47. तत्रैव पृ. ३२
48. डॉ. नरेंद्र जाधव– डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा  प्रकाशन पुणे, १९९२. पृ. ४४
49. दिपक मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८. पृ. १७
50. पुरूषोत्तम लांडगे– डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ. ७
51. तत्रैव पृ. ९
52. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनु. प्रा. देवीदास घोडेस्वार – भारताचे संविधान, समता सैनिक दल प्रकाशन, २०००. पृ. ५
53. तत्रैव पृ. १४२
54. तत्रैव पृ. १४४
55. तत्रैव पृ. १४६
56. तत्रैव पृ. १४८
57. तत्रैव पृ. १४९
58. तत्रैव पृ. १५७
59. तत्रैव पृ. १५८
60. तत्रैव पृ. १५९
61. डॉ. ज्ञानचन्द्र खिमेसरा– डॉ. आंबेडकर का आर्थिक चिंतन, मध्यप्रदेश हिन्दी ग्रथ अकादमी, भोपाल, १९९५. पृ. ४३

62. डॉ. नरेद्र जाधव– डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. ६६
63. संपादक, वामन निंबाळकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ११७
64. तत्रैव पृ. ११८
65. डॉ. नरेद्र जाधव– डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. ८३
66. तत्रैव पृ. ८३
67. तत्रैव पृ. ८७
68. डॉ. दिनकर हेरलेकर– डॉ. आंबेडकरांचे विरोधक, आनंद प्रकाशन, जयसिंगपूरा, औरंगाबाद, १९८६. पृ. ११
69. तत्रैव पृ. २६
70. तत्रैव पृ. ३७
71. तत्रैव पृ. ४९
72. तत्रैव पृ. ५२
73. तत्रैव पृ. ५८
74. संकलन, डॉ. हरिभाऊ पगारे आणि ॲड. रंगनाथ डोळस – वैचारिकताः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची, पृ. ३५
75. तत्रैव पृ. ४२
76. तत्रैव पृ. ५१
77. तत्रैव पृ. ९८
78. तत्रैव पृ. १०१

3

# बुद्ध आणि डॉ. आंबेडकर : वर्तमान समस्या

स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रउभारणी म्हणजे तंत्रज्ञान व आर्थिक विकास आणि त्याद्वारे सार्वजनिक उपकमाचा विकास करणे या पर्यंतच मर्यादित होता. आज राष्ट्र उभारणे ही संकल्पना अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यामध्ये आर्थिक विकास, लोकसंख्यावाढ, शिक्षण, प्रसार माध्यमांची वाढ, सामाजिक विकास आणि लष्करी शक्ती यांचा समावेश होतो. डॉ. आंबेडकरांना विविध योजनांच्या माध्यमातून राष्ट्रउभारणीसाठी योगदान केले होते.

आज स्वातंत्र्य मिळवून ५० वर्षे झाली तरी खऱ्या अर्थाने राष्ट्रवादाची संकल्पना देशात रुजली नाही. केवळ बेगडी राष्ट्रवादावर जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहले जात आह. भारताचा जगात महासत्ता म्हणून उदय झाला तरी उच्चवर्गीयांसाठी इंडिया आणि बहुजनांसाठी भारत असे स्वरूप पहायला मिळेल.

आज रेल्वे भरतीवरून प्रादेशिक वाद निर्माण होऊन एक भारतीय दुसऱ्या भारतीयाची हत्या करतांना दिसतो. पाणी प्रश्नावरून एक राज्य दुसऱ्या राज्याशी संघर्ष करतांना दिसतो, हा राष्ट्रवाद नसून बहुसंख्य आपण आहोत म्हणून अल्पसंख्याकांवरील हल्ला आहे. दुसऱ्या महायुद्धात जपान, जर्मनी हे देश बेचिराख होऊन सुद्धा आज आपल्याला त्यांच्या आर्थिक शक्तीमुळे जागतिक राजकारण बदलण्याचे दिसते. कारण खऱ्या अर्थाने तेथील जनतेने राष्ट्रवाद अंमलात आणला.

डॉ. आंबेडकरांची राष्ट्रवादाची संकल्पना वेगळी होती. त्यांच्या विचाराप्रमाणे जातिरहीत व वर्गरहीत समाजाची निर्मिती करून सर्व दीनदुबळ्या जनतेला मुख्य प्रवाहात आणावयाचे होते. डॉ. आंबेडकरांच्या मते भारताच्या राष्ट्रवादाच्या नावाने बहुसंख्यांकाद्वारे अल्पसंख्यांकावर आपल्या मर्जीप्रमाणे राज्य करणे. राष्ट्रवाद हे गरीब जनतेचे केवळ स्वातंत्र्य नाही तर त्यांचे सर्व विषयाबाबत हक्क आहेत. राष्ट्रोय मूल्यातील लोकशाही, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रोय एकता आणि अखंडता,

जातिविरहीत व वर्णविरहीत समाज हे महत्त्वाचे घटक होय. जर कधी या मूल्यांना धोका निर्माण झाला तर राष्ट्राच्या सुरक्षेला व अखंडतेला धोका निर्माण होऊ शकतो.[1] म्हणून डॉ. आंबेडकर रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत भारताचे रक्षण करण्याचे सांगतात.

## जागतिक शांतता

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कांतीमुळे जागतिक शांतता निर्माण करण्याचे आव्हान आज आपल्यासमोर आहे. शीतयुद्धाच्या काळात लष्करी साधनसामुग्री व राष्ट्रांच्या सीमाव्यवस्थापन करणे म्हणजेच राष्ट्रीय सुरक्षा म्हणून त्याकडे बघितले जात होते.[2] आता एखाद्या राष्ट्राकडे आण्विक, जैविक, रासायनिक शस्त्रे, लष्करी शक्ती, आर्थिक शक्ती असूनही त्या राष्ट्राची सुरक्षेची हमी घेता येत नाही; हे अमेरिकेच्या ११ सप्टेंबर २००१ ला झालेल्या दहशतवादी हल्ल्यांनी सिद्ध केले. म्हणून राष्ट्रीय व जागतिक सुरक्षा कशा पद्धतीने निर्माण होऊ शकेल याकडे सर्वांचे लक्ष वेधलेले आहे. म्हणून बुद्धाच्या धम्मातून जागतिक शांतता निर्माण करण्याचे स्वप्न प्रत्येक देश पाहतो आहे.

तंत्रज्ञानाच्या कांतीमुळे जग हे एक वैश्विक खेडे होऊ पाहत आहे. अशा वैश्विक खेड्यात उपेक्षितांची जागा कुठे आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे.[3] आज जागतिक पातळीवरचे विशेषतः सुरक्षेचे आणि शांततेचे प्रश्न बिकट होत आहेत. दहशतवादी कार्यवाहीनंतर अमरिकेने इराक व अफगाणिस्तानवर केलेली लष्करी कार्यवाही, अमेरिका–इराण आण्विक प्रश्न, अमेरिकेद्वारे इराकमध्ये मानवी हक्काची पायमल्ली अशा कितीतरी प्रश्नांनी जागतिक शांतता भंग झाली आहे.

जागतिक पातळीवरचे जेवढे संघर्ष आहेत त्या संघर्षाचे निवारण आणि व्यवस्थापनासाठी बौद्ध धम्माचे महत्त्व असणार आहे. जागतिक पातळीवरचे जेवढे संघर्ष आहेत त्या ठिकाणी राजकीय नेतृत्वाद्वारे संवाद साधल्या गेला तर शांतता आणि सुव्यवस्था टिकविण्यासाठी बौद्ध धम्माचे महत्त्व निश्चितच राहणार आहे.

बौद्ध धम्मात हिंसेला कुठेही वाव नाही. शांतता आणि सुरक्षितता हेच धम्माचे बळ आहे. जगात जेवढे संघर्ष झाले त्यात बुद्ध धम्माचे महत्त्व निश्चितच आहे. अरब–ईस्राईल संघर्ष, इराक–ईराण युद्ध, भारत–पाकिस्तान युद्ध, आणि आशिया खंडातील काही सामरिक आणि असामरिक प्रश्न सोडविण्यासाठी बौद्ध धम्माचे आचरण करताना पाहावयास मिळतात. जिथे–जिथे संघर्ष झाले तीथे कालांतराने शांतता प्रस्थापित करण्यासाठी गौतम बुद्धाच्या शांततेचा मार्ग स्वीकारला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी बौद्ध धम्माचे महत्त्व निश्चितच आहे.

संध्या तंत्रज्ञानाचे पाच प्रवाह आपल्याला दिसतात.

१) नॅनो टेक्नालॉजी. (अतीसूक्ष्म तंत्रज्ञान)
२) बायो टेक्नालॉजी. (जैव तंत्रज्ञान)
३) स्पेस टेक्नालॉजी. (अंतरीक्ष तंत्रज्ञान)
४) न्युक्लिअर टेक्नालॉजी. (अणू तंत्रज्ञान)
५) इन्फॉरमेशन टेक्नालॉजी.[4] (माहिती तंत्रज्ञान)

जर या तंत्रज्ञानाचा वापर मानवी समुहाच्या विकासाकरिता वापरला गेला तर जागतिक सुरक्षेपुढे कोणताही प्रश्न उभा राहणार नाही. पण ज्या राष्ट्राला नीतिमत्ता नाही त्या राष्ट्राला जर असे तंत्रज्ञान उपलब्ध झाले तर त्या संपूर्ण मानवी समाजाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या ठिकाणी बुद्ध धम्माचे नवीन पद्धतीने मांडणी करून धम्माचे जागतिकीकरण कसे करता येईल? कोणत्या चौकटींचा वापर करावा? याचा विचार होणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेला ‘प्रबुद्ध भारत’ म्हणजे एकता, बंधुता, धर्मनिरपेक्ष समाज, जात आणि धर्म विरहित समाज होय.[5] डॉ. आंबेडकर याच्या राज्यघटनेमुळे ५० वर्षा पूर्वीचा जो समाज गावकुसाबाहर होता. तो आज राष्ट्राच्या मध्यभागी येऊन राष्ट्रबांधणीचे काम करीत आहे. व त्यामुळेच भारत आज महासत्ता बनण्याचे स्वप्न बघत आहे. माहिती तंत्रज्ञानाद्वारे ज्यांना – ज्यांना फायदे मिळालेले आहेत त्यांनी डॉ. आंबेडकरांचे विचार आणि बुद्धाचा धम्म जागतिक पाळीवर

मांडण्याचा पयत्न केला तर जागतिक पाळीवरचे संघर्ष निवारण्यासाठी त्याचा निश्चितच फायदा होईल.

## जागतिकीकरण

सध्या तंत्रज्ञानातील अमुलाग्र बदलाने जगात मोठ्या झापाट्याने परिवर्तन घडविले जात आहे. या बदलामुळेच जगाचे भौगोलिक अर्थशास्त्रही बदलत आहे. ह्याच परिवर्तनाचा एक भाग म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण हे दुसरे तिसरे काही नसून बलाढ्य भांडवलवादी राष्ट्रांनी विकसनशील देशांना आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक गुलामगिरीत जखडण्यासाठी विस्तारित केलेला ‘नवसाम्राज्यवाद’ होय. प्रगत भांडवलवादी राष्ट्र म्हणतात की, “सबंध जगाची एकच बाजारपेठ असली पाहिजे. बाजारपेठेवरील सर्व नियंत्रण काढून टाकणे, बाजारपेठेला मुक्तपणे अर्थव्यवहार निश्चित करू देणे आणि आर्थिक क्षेत्राला पिटाळून लावणे.”[6] म्हणजेच आरक्षण विरहीत मुक्त स्पर्धा निर्माण करण्याचा मानस होय.

जगामध्ये राष्ट्र खूप असली तरी प्रत्यक राष्ट्राच्या दृष्टीने जागतिकीकरणाचा अर्थ हा वेगळा आहे. विशेषतः भारतासारख्या देशामध्ये जिथे रोज ५० रुपये किंवा त्याहीपेक्षा कमी रुपये मिळविणारे ४० कोटी नागरिक राहतात. ज्यांचे आयुष्य दारिद्र्यरेषेवरच आहे, जे बेरोजगार किंवा अर्धबेरोजगार आहेत, त्या देशाच्या दृष्टीने जागतिकीकरणाचा अर्थ निश्चितच वेगळा आहे.

जगातील विविध अर्थशास्त्रज्ञांनी आणि विचारवंतानी जागतिकी– करणाच्या संदर्भात मांडलेल्या मताचे वस्तुनिष्ठ विचार केल्यास असे आढळून येते की, जागतिकीकरण हे अविकसित आणि विकसनशील देशाच्या दृष्टीने घातक आहे. जागतिकीकरणामुळे असे देश गुलाम बनणार आहेत.[7] असे काहींचे मत आहे.

आज जागतिकीकरणाच्या प्रकियेत भारतीय अर्थव्यवस्थेत विविध प्रश्न निर्माण होत आहेत. त्यामध्ये वाढती बेरोजगारी, गरिबीच्या प्रमाणात वाढ, सामाजिक तणाव, नैसर्गिक

साधनसामुग्रीचे असमान वाटप, आर्थिक विषमता, कामगार प्रश्न, स्त्री–पुरुष भेद, गरीब विरुद्ध श्रीमंत, वाढता बकालपणा, शेती आणि औद्योगिक विकासात फरक, शेती सुधारणा कार्यक्रमाला अपयश, वाढती लोकसंख्या, वाढती वित्तीय तूट, नैतिकतेचे पतन इ. अनेक समस्या आज भेडसावीत आहेत.

## मुक्त आर्थिक धोरण

१९९१ सालच्या जुलै महिन्याच्या मध्यापासून भारताने उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण यावर आधारित व्यापक आर्थिक फेरबदल केले. हीच मुक्त अर्थव्यवस्थेची सुरुवात होती. जी भारताने आर्थिक अरिष्टावरील एक उपाय म्हणून अवलंबिले.

भारत सरकारने २००१–२००२ या आर्थिक वर्षातील संरक्षणावर एकूण ५९,०१३.१९ करोड रुपये खर्च केले आणि २००२–२००३ वर्षाच्या अर्थसंकल्पात ६५,००० कोटींची तरतूद केली.[8] सन २००६–२००७ साली संरक्षण खर्चाकरिता ८९,००० कोटींची तरतुद करण्यात आली.[9] विद्यमान संरक्षण खर्च भारतीय तिजोरीला कंगाल करणारा असा आहे. त्यातच चुकोच्या आर्थिक धोरणामुळे भारतावरील परदेशी कर्ज दिवसेंदिवस वाढत चालला आहे. मार्च २००४ ला १,११,७१५ मि. डॉलर वरून मार्च २००५ च्या शेवट पर्यंत १,२३,२७८ मि. डॉलर पर्यंत पोहचले. विश्व बॅंकेच्या आकडेवारीनुसार भारताचे कर्ज ११३.५ बीलीयन अमेरिकन डॉलर म्हणजेच भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाचे २२% एवढे होते.[10]

वरील बाबींवरून असे निदर्शनास येते की, भारताचे कल्याणकारी बाबींवरील खर्च कमी व संरक्षणावर अफाट खर्च केल्याने देशाची आर्थिक स्थिती विकलांग होत चालली आहे.

५.२.२ : खाजगीकरण

१९९१ नंतर अवलंबिलेल्या आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून परदेशातील खाजगी गुंतवणूकदारांना जास्त वाव देणे आणि सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भांडवल स्वीकारणे म्हणजेच खाजगीकरण होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिश्र

अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. महत्त्वाचे उद्योग सरकारी मालकीचे तर इतर उद्योग खाजगी मालकीचे असावेत ही त्यांची भूमिका होती. त्यानुसार भारतीय अर्थव्यवस्था यशस्वीपणे वाटचाल करीत होती. परंतु समाज अर्थव्यवस्थेतील आत्यंतिक विषमतेमुळे कनिष्ठ जाती वर्ग व गरीब दडले तर उच्चवर्णीय आणि वर्गीयांनी आपली अधिसत्ता जातिव्यवस्थेचा आधार घेऊन पक्की केली. उच्च वर्गीय अधिकारी वर्गाचा भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणात वाढला आणि उद्योग–धंदे तोट्यात चालायला लागले.

कोणत्याही उद्योगाची कार्यक्षमता ही तीन निकषावरून ठरत असते. १) प्राप्त केलेला नफा. २) भांडवलावरील कमाई. ३ उद्योगाचे भांडवल आणि त्यावर दिलेले व्याज. हे निकष कार्यक्षमता आणि व्यवस्थापनाशी निगडित आहेत. ह्या निकषानुसार भारतीय सर्वजनिक क्षेत्राची कामगिरी अतिशय उत्तम राहिली असताना सुद्धा सरकारणे खाजगीकरणाची कास धरून ठेवली आहे.[11] देशातील सामान्य करदात्यांनी आपल्या कष्टाच्या आणि घामाच्या पैशातून जे सर्वजनिक क्षेत्राची उभारणो केली ते उद्योग सरकार मातीमोल किंमतीला विकत आहेत.

## निर्गुतवणूक

९ फेब्रुवारी २००२ रोजी सरकारने दोन मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाच्या भागाची खाजगी क्षेत्रात विक्री केली. **V.S.N.L.** च्या २५% भागाची टाटाच्या पेनाटॉन फिन्वेस्ट कंपनीला विक्री केली. **I.B.P.** च्या ३३.५८ % भागाची विक्री केली. त्याच दिवशी सार्वजनिक क्षेत्रातील इतर चार उपक्रमांची विक्री केली गेली.[12]

१) मुंबईचे सेन्टार एअरपोर्ट हॉटेल दिल्लीच्या बत्राला ८३ कोटी रूपयाला विकण्यात आले.

२) दिल्लीचे लोधी हॉटेल सिंगापूरच्या एस.एल.एच. ला ७६.२२ कोटीला विकण्यात आले.

३) भारतीय पर्यटन विकास निगमाचे भाग सुशील गुप्ता व सहकाऱ्यांना ३५.६५ कोटीला विकले.

४) उदयपूरचे लक्ष्मी विलास पॅलेस ची विकी भारत हॉटेलला ७. ५२ कोटीला करण्यात आली.[13]

सध्या सार्वजनिक क्षेत्रात फक्त ९ मोठे उपकम आणि ९७ लहान उपकम राखीव ठेवण्यात आले आहेत. टिकाकारांच्या मते सरकारने निर्गुंतवणूक केल्याने अपेक्षित भांडवलाची प्राप्ती झाली नाही. तोट्यात चालणारे उद्योग तर विकलेच परंतु इंडियन ऑईल कॉपोरेशन सारखे जागतिक पातळीवरील आणि नफ्यात चालनारे उद्योग विकले. भारत सरकारचे निर्गुंतवणूक धोरण सुरू झाल्यापासून फक्त १९९१–९२, १९९४–९५, १९९८–९९, २००३–०४ ह्या चार वर्षातच प्राप्तीचे उद्दिष्ट साधता आले.[14] इतर वर्षतील निर्गुंतवणुकीपासून सरकारला नुकसानच आले.

भारतीय घटनेच्या कलम ३९ सी. अन्वेय असे स्पष्ट केले आहे की, “देशाची अर्थव्यवस्था केंद्र सरकारने अशा पद्धतीने घडवावी आणि चालवावी, की कोणत्याही प्रकारच्या साधनसंपत्तीचे, तिच्या वापराचे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक सत्तेचे कोणत्याही स्वरूपात केंद्रिकरण घडून येऊ नये. ”[15] लोकसभेने संमत केलेल्या ठरावात म्हटले आहे की, सार्वजनिक क्षेत्राची निर्मिती करण्यामागचा उद्देश नफा कमवणे नसावा. असे असताना सुद्धा भारत सरकारने निर्गुंतवणूक धोरणाकरिता भारतीय घटनेची पायमल्ली केली.

भारत सरकारने निर्गुंतवणूक धोरणाच्या माध्यमातून भांडवलशाहीचा पुरस्कार केला आहे. भांडवलशाहीमध्ये ‘समानता’ मान्य नसते. भांडवलशाहीचे तत्त्व म्हणजे जे आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत त्यांना हाकललेच पाहिजे. मूठभर लोकांचा विकास म्हणजे संपूर्ण समाजाचा विकास नसतो. भांडवलशाही विरुद्ध लोकशाही ह्यामध्ये संघर्ष तर अटळ आहेच, त्यात लोकशाही नाममात्र शिल्लक राहून ती पूर्णतः नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. गौतम बुद्धाने जगाला दिलेली लोकशाही जगविली पाहिजे; डॉ. आंबेडकरांच्या राज्यसमाजवादाची अत्यंत गरज आज समाजाला आहे, तरच सार्वजनिक उद्योगधंदे जगतील म्हणजेच गरीब लोक जगतील.

## शिक्षणाचे खाजगीकरण

आज जागतिकीकरणाचे खरे रूप समाजाला दिसू लागले आहे. समाजातील गरीब–श्रीमंत दरी रोजच्यारोज रुंदावत आहे. नवनव्या विषमात जन्माला येऊ लागल्या आहेत. जागतिकीकरणाचे पहिले सूत्र आपल्या सरकारने स्वीकारले की, “शाळा चालविणे हे काही सरकारचे काम नाही.”[16] त्यामुळे सरकारी अनुदान बंद झाले आणि ‘शिक्षण फी आणि देणग्या जास्त’ असे स्वरूप शिक्षण क्षेत्राला आले आहे. ह्या सर्व प्रक्रियेत दलितांनी झगडून मिळवीलेल्या राखीव जागा अडचणीत आल्या आहेत.

जागतिकीकरणाच्या शर्यतीमध्ये गरीब विद्यार्थी त्यातही दलित, मासवर्गीय आणि आर्थिक मागासवर्गीय मागे पडत आहेत. त्यांच्या सवलतीही हळूहळू कमी करण्यात येत आहेत. डॉ. आंबेडकरांनी “१४ वर्षे वयपुर्ण होईपर्यंत प्रत्येक बालकास मोफत व सक्तीने शिक्षण द्यावे” अशी तरतुद राज्यघटनेच्या कलम ४५ मध्ये[17] केली होती. तसेच राज्यघटनेच्या ४६ व्या कलमानूसार “देशातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व जातींना शिक्षण देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे व त्यांचे काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करावे आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर सर्वप्रकारच्या शोषणापासून संरक्षण करावे”[18] अशी तरतुद केली.

सन १९९० च्या ‘जोमतियन सम्मेलन’ (थायलंड) येथे भारत सरकारने स्वाक्षरी करून संविधानाचे महत्त्व कमी केले. भारतीय संविधानाचे महत्त्व कमी होऊन तो जागा बाजार आधारित नीतिनियमांनी घेतली आणि भारत सरकारची जागा जागतिक बॅकेने घेतली.[19] शिक्षणाचे सार्वत्रीकरण होत असताना आपल्या मुलांना इंग्रजी शाळामधून शिकविणारी मंडळी गरिबांना मराठी शाळेचे उपदेश देतात. शासनाच्या शैक्षणिक धोरणाचा संक्षिप्त आढावा सांगावयाचा झाल्यास १९९७ ला शाळेत नाव दाखल असलेले २करोड ८०लक्ष विद्यार्थी शाळेत गेले नाही.[20]

भारतात सध्या २१ देशांनी आपली विद्यापीठे स्थापुन शिक्षण सेवांच्या व्यापाराला सुरुवात केली आहे.[21] ह्या विद्यापीठात विदेशी डिग्री मिळत असली तरी तेथील शिक्षण घेणे गरीब विद्यार्थांना आर्थिक बाबतीत परवडण्यासारखे नाही. खाजगी शिक्षण संस्था देशात मोठ्या प्रमाणात स्थापन होत आहेत. ह्यात मासवर्गीय विद्यार्थांना कोणतीही सुविधा देण्यात आली नाही. ज्यांकडे पैसा असेल त्यांनीच शिकावे अशी धोरणे खाजगी शिक्षण संस्था राबवित आहेत. याचा एकंदरीत परिणाम म्हणजे नव्याने शिकू लागलेला गरीब वर्ग शिक्षणापासून वंचित होत चालला आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया जसजशी तीव्र होत जाईल तसेच सरकार शिक्षण ह्या विषयातून बाजूला होईल यात शंका नाही.

सन १९०२ मध्ये शाहू महाराजांनी बहुजनांना ५०% आरक्षण देऊन "गाव तेथे शाळा व शाळा तेथे ग्रंथालय"[22] अशी योजना राबविली. शिक्षणाचे महत्त्व विषद करताना महात्मा ज्योतीराव फुले यांनी अविद्येने कसे अनर्थ घडतात ते स्पष्ट केले. पुरातन काळात शिक्षणापासून वंचित असलेल्या दीनदुबळ्या लोकांना गौतम बुद्धाने सर्वप्रथम शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला. डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत शिक्षणासबंधी अनुच्छेद २९(१), ३०(१), ३०(२), ४५, ४६. मध्ये दीनदुबळ्या आणि शिक्षणापासून वंचित असलेल्या लोकांकरिता तरतुद करून ठेवली आहे. आज शिक्षणाची होत चाललेली ही दैन्यावस्था इथेच थांबविण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी बुद्ध आणि डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा उपयोग करणे काळाची गरज आहे.

## शेतीचे व्यापारीकरण

देशाची अर्थव्यवस्था उभी आहे ती शेतीवर. देशातील ७०% लोकसंख्या उदरनिर्वाह आणि रोजगाराच्या बाबतीत शेतीवर अवलंबून आह. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यासातून शेती व्यवसायावर विशेष भर दिलेला आहे. स्वतंत्र भारतात ग्रामीण जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे–जे प्रयत्न

करील त्याचा पाया सामाजिक न्याय असावा. विकास कार्यातून प्राप्त लाभाचे न्याय तत्त्वावर समान वाटणी आणि आजवर जे वंचित म्हणून जगत आले त्यांना अग्रहक्क देण्याची गरज आज आहे असे डॉ. आंबेडकर म्हणाले. यातूनच हरितक्रांतीसारखे प्रयोग करून भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होऊ शकला.

१६ डिसेंबर १९९९ रोजी भारताने अमेरिकेसोबत कृषीविषयक करार केला. या करारानुसार भारताने कृषो मालाच्या आयातीवरील संख्यात्मक निर्बंध कमी केले त्याचा परिणाम म्हणजे भारतीय शेतमालाला किंमत मिळेनाशी झाली आणि अमेरिकेतील ३० लाख लोक प्रतिवर्ष ३० लाख रुपये उत्पन्न मिळवायला लागले.[23]

विविध प्रकारच्या डाळी या ग्रामीण जनतेचे आरोग्य टिकविण्यासाठी आवश्यक असणारे प्रोटिन रोजच्या आहारातून पुरविण्याचे मोठे माध्यम आहे. असे असताना सुद्धा भारतीय कृषी विज्ञान आणि संशोधन परिषदेने यापुढे डाळीच्या नव्या जाती शोधण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय घेऊन टाकला. सरकारने कृषीविषयक पत आणि आर्थिक धोरणे अशा चुकीच्या पद्धतीने राबविले की, शेतमालाच्या निर्यातीला जे–जे घटक वापरावे लागतात त्या–त्या सगळ्यांच्या किंमती खूप वाढविल्या आहेत. पण शेतमालाच्या किंमती त्या तुलनेत वाढलेल्या नाहीत.

शेतकी मालाची सन १९९९ च्या तुलनेत आजच्या किंमतीशी तुलना केल्यास किंमती घटताना दिसतात. जो चहा १९ रुपये किलो होता तो ५ रुपये किलो आहे. जे नारळ ८ ते १० रुपयाला शेतकऱ्यांकडून घेतले जात होते ते ३ रुपये दराने घेतेले जात आहे. भाताचे धान ६५० रुपये क्विंटल होते ते आज ४५० रुपये क्विंटल आहे. कॉफी ५८ रुपये किलो दराने शेतकरी विकायचा तीच कॉफी आज ३० रुपये किलो दराने विकावी लागत आहे. काळी मिरी २६०० रुपये क्विंटल होती ती आज १३०० रुपये क्विंटल झाली आहे. रबर ६० रुपये किलो वरून १६ रुपये किलो झाले आहे.[24] या सगळ्याचे कारण भारत

सरकारने शेतमालाच्या वस्तूच्या आयातीवर असलेले संख्यात्मक निर्बंध उठविणे हे होय.

अनेक राज्यात साखरेची कारखानदारी जोमाने फोफावली होती. हे कारखाने राजकीय पक्ष व नेते यांच्या हाती गेल्याने आज ती बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांची कितीतरी रक्कम करखान्यांवर पडून आहे असे असताना देखील बिहार आणि उत्तरप्रदेश मध्ये शेतकऱ्यांवर गोळीबार केला जातो. युरोपियन देशातून आयात साखरीवर प्रतिबंध लावले नाही तर सध्या सुरू असलेले कारखानेही बंद पडण्याची शक्यता आहे. भारतात मागणी व गरजेपेक्षा जास्त कापसाचे उत्पादन होऊनही कापसाची आयात सुरूच आहे. महाराष्ट्रात कापूस एकाधिकार योजना सरकारने राबवून अनेक शेतकऱ्यांचे देणे थकीत ठेवले त्यामुळे अनेक शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत.[25]

जागतिकीकरणाच्या वातावरणात भारत सरकार विदेशी गुंतवणूकदारांना १४-१६% परतावा देतो परंतु शेतकऱ्यांना कर्ज देत नाही. निर्यात पिकांची माहिती देण्याची कोणतीच स्थायी व्यवस्था निर्माण केली गेली नाही. काही शेतकऱ्यांना काही हजार रुपयापर्यंतच कर्ज दिले जाते, हे कर्ज दुष्काळ, पूर, अतिवृष्टी, रोगराई यामुळे फेडू शकत नाही तेव्हा बॅंका आणि वित्तसंस्था अशा शेतकऱ्यांवर बळजबरीची वसुली आणि संपत्ती जप्ती करतात आणि यालाच घबरून सध्या शेतकरी आत्महत्या करतो आहे.[26]

बुद्धाच्या काळात धम्माच्या आचरणातून शेतकरी वर्ग सुखी व संपन्न बनला होता. गौतम बुद्ध शासन कसे करावे या विषयी उपदेश करताना म्हणतात की, "दुर्बलांचे रक्षण करावे, त्यांची सुरक्षा करावी, त्यांना समाधानी ठेवावे." आज भारतीय शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला बुद्ध तत्त्वज्ञानाची गरज प्रकर्षाने जानवणार आहे. डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद हा शेतीच्या उत्थानासाठी मोलाचा ठरणारा असा आहे. तेव्हा राज्यकर्त्यांनी राज्य समाजवादाची कास धरूनच शेतीच्या प्रगतीसाठी प्रयत्न

करावे कारण याशिवाय दुसरा अन्य मार्ग सध्यातरी राहिलेला नाही.

## विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ)

एप्रिल २००० ला सेझ पॉलिसी चा प्रस्ताव भारतात आणल्या गेला. महाराष्ट्रात सेझ कायदा २००३ ला लागू केला गेला परंतु २००५ मध्ये बिल पास झाले.[27] भारतात निवडक प्रदेशात विश्वस्तरावरच्या सुविधा निर्माण करणे, त्यांना विविध सवलती देणे आणि निर्यात करणे म्हणजे सेझ होय.[28]

सेझ यशस्वी करण्याकरिता सर्वप्रथम मोठ्या प्रमाणात भूमी, पाणी, विद्युत आणि रस्ते इ. ची गरज आहे. भारतीय कृषी क्षेत्र विकलांग असून अल्पभूधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शेतीला सिंचनाच्या सुविधा नाहीत, विद्युत पुरवठा व्यवस्थीत नाही, अजूनही अनेक खेड्यांपर्यंत रस्ते पोहचले नसतानाही सरकार मोठ्या प्रमाणात शेती योग्य भूमी सेझच्या अंतर्गत बळजबरीने विदेशी कंपण्यांना विकत आहे.

सेझचा महत्त्वाचा दोष म्हणजे यावर सरकारचे कोणतेही नियंत्रण नसते. खाजगी मालक स्वतःच नियंत्रण प्रस्तापित करणार. सेझ म्हणजे आपल्याच देशात निर्माण झालेला नवीन देश असणार आहे. भारतीय शेतकऱ्यांना जिवंतपणी मारण्याचे साधन म्हणजे सेझ होय.[29] केवळ औद्योगिकरण हे विकासाचे साधन होऊ शकत नाही. असे असतानाही सेझच्या माध्यमातून औद्योगिकरणाची कास सरकार धरून आहे.

भारताची ७०% लोकसंख्या उदरनिर्वाह आणि रोजगाराच्या बाबतीत शेतीवर अवलंबून आहे. भारताचा औद्योगिक विकास विश्व स्पर्धेत टिकू शकेल याची शाश्वती नाही. भारताची लोकसंख्या पाहता सेझ रोजगार उपलब्ध करू शकेल असे वाटत नाही. कृषी क्षेत्रात बेरोजगारी निर्माण करण्याचे काम सेझ च्या माध्यमातून आज होत आहेत. चिन देशाच्या वस्तू ६० रुपये किंमतीला मिळूनही क्रयशक्ती अभावी ते विकत घेण्याची क्षमता अजूनही निर्माण झालेली नाही.

गौतम बुद्ध म्हणतात की, जो पर्यंत शेतकरी सुखी होत नाही तो पर्यंत देशही सुखी होत नाही. आज भारतात शेतकरीच दुःखी होत चालला असल्याने देश सुखी कसा होणार? भारत कृषिप्रधान देश असल्याने डॉ. आंबेडकरांनी कृषी आधारित अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे सांगितले होते. डॉ. आंबेडकरांच्या राज्यसमाजवादातून कृषी आधारित अर्थव्यवस्था निर्माण करून देशाचा विकास होऊ शकतो.

## कल्याणकारी राज्य

गौतम बुद्ध तत्कालीन समाजव्यवस्थेबाबत समाधानी नव्हते.चातुर्वण्याच्या नावाने ब्राम्हणी धर्माने केलेली समाजरचना बुद्धाला नैसर्गिक वाटली नाही. तिच्यातील वर्गरचना सक्तीची आणि जुलमी होती. विशिष्ट वर्गाच्या हिताकरिता ही समाजरचना तयार केलेली होती. बुद्धाला मुक्त आणि स्वतंत्र समाजव्यवस्था अभिप्रेत होती. कारण बुद्ध समतेचे समर्थक होते.

बुद्ध कल्याणाची व्याख्या करताना म्हणतात की, “आदि कल्याणकारी, मध्य कल्याणकारी आणि अन्त कल्याणकारी”[३०] आणि यासाठी ते आर्य आष्टांगिक मार्गाचा उपदेश करतात. बुद्धाच्या मते प्रज्ञा, शील आणि करुणा यांचा अवलंब करून मनुष्य कल्याणकारी जीवन जगण्यास प्रेरित होऊ शकतो. नवीन समाजाबाबतची बुद्धाची कल्पना ही समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांच्या हिताची होती. एक असा नव समाज ज्यात कुठेही दुःख वा अन्याय नाही; जेथे स्वातंत्र्य, समता व बंधुता मूल्याची जोपासना; ज्यात सदाचार, सहयोग व सद्‌भावना परस्परात प्रेम वाढवील.

बुद्धाने वेद, आत्मा, पुर्नजन्म, चातुर्वर्ण्य, ईश्वर, मोक्ष, यज्ञयाग, आदी गोष्टींचा विरोध करून वास्तविकता, सत्य, सामाजिक समता, विचारस्वातंत्र्य, सर्वांचे हित या गोष्टींना महत्त्व दिले. सामाजिक भेद आणि विषमता नष्ट करण्याकरिता बुद्ध खालील उपदेश करतात –

१) माणसा–माणसात भेद करणारे अडसर सोडून दिले पाहिजे.

२) माणसाचे मोठेपण जन्मावरून न ठरविता त्याच्या कार्यावरून ठरवावे.

३) माणसा–माणसातील समतेची भावना वृद्धिंगत केली पाहिजे[31]

बुद्धाने आपले सर्व तत्त्वज्ञान 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या विचारसरणीनुसार सर्वांच्या कल्याणाकरिता मांडले. बुद्ध धम्माबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात, 'बुद्धाचा धम्म म्हणजे माणसाच्या सत्प्रवृत्तीतून उद्भवणारा अत्यंत न्यायप्रधान धम्म आहे. धम्म एक कांती आहे.'

डॉ.आंबेडकरांची कल्याणाची संकल्पना प्रामुख्याने समाजातील सर्व माणसे समान आहेत, त्यांच्यात धर्म, वंश, जात, रंग आणि संप्रदाय असा भेद केला जाणार नाही. स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित आहे.[32] कल्याणकारी राज्य निर्माण करण्याकरिता शाश्वत अहिंसा, लोकशाही, नैतिकता, सामाजिक न्याय, बंधुत्व, चरित्र, सदाचार, शिक्षण, तंत्रज्ञान आणि जातिनिरपेक्ष श्रमविभाजन आवश्यक असते.

डॉ. आंबेडकरांनी न्यायाच्या तत्त्वाला राज्यघटनेच्या तिसऱ्या व चवथ्या भागात समाविष्ट करून गरीब आणि श्रीमंतात संतुलन चक निर्माण केले. समाजात मागासलेल्या लोकांना संरक्षण, सोयी आणि अधिकार दिल्याखेरीज कल्याण साधता येणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. आंबेडकरांचे विचार भारतीय समाजाच्या प्रत्येक सभासदाचे हित साधणारे आणि मानव–मानव, समूह–समूह, समुदाय–समुदायातील सकारात्मक आणि रचनात्मक सबंधावर आधारित आहेत.[33] समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही. डॉ. आंबेडकरांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची संकल्पना मुळात कल्याणकारी राज्यच्या निर्मितीचेच संकेत देतात.

अशाप्रकारे समाजहित जोपासणारे, सामाजिक स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचा पुरस्कार करणारे गौतम बुद्ध हे जगातील पहिले समतावादी, समाजवादी विचारवंत होते. बुद्धाच्या याच विचारांना प्रमाण मानून वैचारिक बळावर कांती निर्माण करणारे डॉ. आंबेडकर पहिले व्यक्ती आहेत.

## संदर्भ टीपा


1. डॉ. विजय खरे– (वृत्तपत्र सम्राट) राष्ट्र उभारणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धोरणे, २१ डिसेंबर २००६.
2. डॉ. विजय खरे–(वृत्तपत्र सम्राट) जागतिक सुरक्षा आणि बौद्ध धम्माचे महत्व, २६ नोव्हेंबर. २००६.
3. उत्तम कांबळे– जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, २००२. पृ. ९
4. डॉ. विजय खरे–(वृत्तपत्र सम्राट) जागतिक सुरक्षा आणि बौद्ध धम्माचे महत्व, २७ नोव्हेंबर. २००६.
5. डॉ. विजय खरे–(वृत्तपत्र समाट) जागतिक सुरक्षा आणि बौद्ध धम्माचे महत्व, २८ नोव्हेंबर. २००६.
6. पुरूषोत्तम लांडगे– डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ. २३
7. तत्रैव पृ. २८
8. तत्रैव पृ. ७७
9. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज– भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में, साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ. ३६
10. तत्रैव पृ. २८
11. ॲडमिरल विष्णू भागवत– जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. १३४
12. डॉ. आर. वाय. माहोरे – खाजगीकरण आणि निर्गुंतवणुक धोरण.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
13. तत्रैव
14. तत्रैव
15. ॲडमिरल विष्णू भागवत–जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ९९
16. उत्तम कांबळे– जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, २००२. १०

17. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनु. प्रा. देवीदास घोडेस्वार – भारताचे संविधान, समता सैनिक दल प्रकाशन, २०००. पृ. १५९
18. तत्रैव पृ. १५९
19. पुरूषोत्तम लांडगे– डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ. ६५
20. तत्रैव पृ. ६९
21. डॉ. आर. वाय. माहोरे– जागतिक व्यापार संघटना आणि सेवांच्या व्यापारासबंधी सामान्य करार.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
22. संपादक, वामन निंबाळकर– डॉ. बाबासाहेब आंबडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ५४
23. ॲडमिरल विष्णू भागवत– जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ३४
24. तत्रैव पृ. ५१
25. तत्रैव पृ. ६१
26. तत्रैव पृ. १३८
27. चित्रलेखा कौसल– सेझ, शून्यदीप प्रकाशन, नागपूर २००७. पृ. ५
28. तत्रैव पृ. ६
29. तत्रैव पृ. १९
30. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, अनु.डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन– भगवान बुद्ध और उनका धर्म, बुद्धभूमि प्रकाशन, नागपुर १९९७. पृ. २९४
31. डा. प्रदीप आगलावे– समाजशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१. पृ.३८
32. तत्रैव पृ. १९२
33. तत्रैव पृ. १९३

# संदर्भ ग्रंथसूची


१) विष्णू भागवत– जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६.

२) भदन्त राहुल बोधी– आदर्श बौद्धांची आचारसंहीता, भिक्खु संघाचे युनायटेड बुद्धिस्ट मिशन, मुंबई, १९९७.

३) कु. चंदा सोमकुवर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे श्रमीक कल्याण विषयक विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९०–९१.

४) चित्रलेखा कौसल–सेझ, शून्यदीप प्रकाशन, नागपूर २००७.

५) डी. एस. मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान आणि सामुहिक शेती, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९०.

६) दिपक मेश्राम– डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८.

७) डॉ. भरतसिंह उपाध्याय– बुद्धकालीन भारतीय भूगोल, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. १९९१.

८) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, अनु.डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन– भगवान बुद्ध और उनका धर्म, बुद्धभूमि प्रकाशन, नागपुर १९९७.

९) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, अनु. प्रा. देवीदास घोडेस्वार – बुद्ध आणि त्यांचा धम्म, बुद्ध आणि त्यांचा धम्म सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, नागपूर, २००५.

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनु. प्रा. देवीदास घाडेस्वार – भारताचे संविधान, समता सैनिक दल प्रकाशन, २०००.

११) डॉ. भदन्त सावंगी मेधंकर– पालि वाङःमय मे बोधिसत्व सिद्धांत, बुद्धभुमि प्रकाशन नागपूर १९९२.

१२) डॉ. ज्ञानचन्द्र खिमेसरा– डॉ. आंबेडकर का आर्थिक चिंतन, मध्यप्रदेश हिन्दी ग्रथ अकादमी, भोपाल, १९९५.

१३) डॉ. दिनकर हेरलेकर– डॉ. आंबेडकरांचे विरोधक, आनंद प्रकाशन, जयसिंगपूरा, औरंगाबाद, १९८६.
१४) डॉ. नरेद्र जाधव– डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२.
१५) डॉ. प्रदीप आगलावे– समाजशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१.
१६) डॉ. परमानंद सिंह– बौद्ध साहित्य मे भारतीय समाज, हलधर प्रकाशन, वाराणसी. १९९६.
१७) डॉ. आर. वाय. माहोरे– खाजगीकरण आणि निर्गुंतवणुक धोरण.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
१८) डॉ. आर. वाय. माहोरे– जागतिक व्यापार संघटना आणि सेवांच्या व्यापारासबंधी सामान्य करार.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
१९) डॉ. वंदना डांगे– भगवान बुद्धाचे आर्थिक जीवनाबद्दल विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००५–०६.
२०) डॉ. विजय खरे–(वृत्तपत्र सम्राट) जागतिक सुरक्षा आणि बौद्ध धम्माचे महत्व, २६, २७,२८ नोव्हेंबर. २००६.
२१) डॉ. विजय खरे– (वृत्तपत्र सम्राट) राष्ट्र उभारणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धोरणे, २१ डिसेंबर २००६.
२२) महास्थविर संघरक्षित अनु.धम्मचारी विमलकिर्ती– डॉ. आंबेडकर आणि बौद्धधम्म, बुद्ध एज्युकेशन सोसायटी, तायवान.
२३) पुरूषोत्तम लांडगे– डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२.
२४) आर. एस. सोनवणे– धम्मनिनाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.
२५) संपादक, लोकराज्य– महाराष्ट्र शासन, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, ऑक्टोबर २००६.
२६) संपादक, वामन निंबाळकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर २००६.

२७) संकलन, डॉ. हरिभाऊ पगारे आणि ॲड. रंगनाथ डोळस– वैचारिकता : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची, युगांतर प्रकाशन, नाशिक.
२८) संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज– भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में, साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६.
२९) सुदर्शन खापर्डे– डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा चिमुर तालुक्यातील गोंड जमातीवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९.
३०) सुनिल पुनवटकर– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर बुद्ध धम्माचा प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९.
३१) सुर्यभान शेंडे– भारतीय रूपयाचे अवमुल्यन आणि रूपयाच्या प्रश्नासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९८–९९.
३२) उत्तम कांबळे – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, २००२.



# लेखक परिचय

नाव : प्रा. डॉ. रक्षित मदन बागडे

शिक्षण : एम. ए. (अर्थशास्त्र), एम. फिल. (अर्थशास्त्र),
पीएच. डी. (अर्थशास्त्र)
नेट – जे.आर.एफ. (अर्थशास्त्र) (दोन वेळा),
एम. ए. आंबेडकर विचारधारा (पाच सुवर्ण पदके)
एम. ए. (समाजशास्त्र)

कार्य : सन 2010 पासुन अर्थशास्त्र विषयाचे अध्यापनाचे कार्य सुरू. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 2 परिषदांवर शोधनिबंधाचे लेखन आणि वाचन. राष्ट्रिय स्तरावरील 8 परिषदांमध्ये सहभाग आणि 3 परिषदामध्ये शोधनिबंधाचे लेखन आणि वाचन.


**लोटस ॲण्ड कोब्रा पब्लिशिंग हाऊस**
द्वारा अश्वजीत पाटील,
425, न्यु खदान, लष्करीबाग, नागपुर – 17.
मो. 9096924808, 9405238458
email : lotusandcobraph@gmail.com

ISBN-978-93-87250-25-3

मूल्य : 150/-